मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

भू-प्रवास स. १८९२

४७

ले. तुकाराम ...प्रसाद पाठक

शालोपयोगी भूगोल.

( श्री प्रिंटर्स अ‍ॅण्ड स्टेशनर्स, ठाणे )

सं. क्र.

शालोपयोगी भूगोल.

(भू-प्रवास)

# शालोपयोगी भूगोल.

हें पुस्तक


तुकाराम बहिरु प्रसाद पाठक,

हेडमास्तर सरकारी शाळा नसिराबाद नं० १,

तालुका जळगांव, जिल्हा खानदेश,


यांणीं केलें.


आवृत्ति १० वी.–१,००० प्रती.



(हें पुस्तक सन १८६७चा आक्ट नंबर २५प्रमाणें रजिस्टर केलें आहे.)



ठाणें येथें

अरुणोदय छापखान्यांत छापिलें.

सन १८९३ इसवी.

किंमत ४½ आणे.

# प्रस्तावना.

१. नवळ्या आवृत्तीपेक्षां ह्या आवृत्तींत पुष्कळ सुधारणा केली आहे. हें पुस्तक इयत्ता ६ पर्यंत शिकणारांस उपयोगीं पडेल.

२. हें पुस्तक पाठ करण्यास, नकाशे पहाण्यास, मागील विषयांची उजळणी करण्यास, आणि भूगोल विषयाची लेखी परिक्षा देणारे तरुण उमेदवारांस व विद्यार्थ्यांस उपयोगीं पडेल अशी उमेद आहे.

३. गुणज्ञ लोक पूर्वीप्रमाणें आश्रय देतील अशी आशा आहे.

मुक्काम नसिराबाद, तारीख १ एप्रिल सन १८९३ इसवी. } तुकाराम बहिरु प्रसाद पाठक.

स्वराज

# भूगोलाचें वर्णन.

## भाग १ ला.

### भूगोलाचें सामान्य वर्णन.

१. भूगोलविद्येमध्यें भूमीचें आणि तिजशीं संबंध ठेवणाऱ्या इतर पदार्थांचें वर्णन केलें आहे.

२. पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, ह्यास अनेक प्रमाणें आहेत; त्यांत तीन मुख्य आहेत. तीं:— १ लें प्रमाण, चंद्रग्रहणीं पृथ्वीची छाया चंद्रावर वर्तुल पडते; २ रें प्रमाण, दक्षिणेकडून उत्तरेकडे जाऊं लागलें असतां ध्रुव नक्षत्र उंच दिसूं लागतें; ३ रें प्रमाण, गलबतांत बसून, पृथ्वीच्या सभोंवतीं फिरून नाळ न फिरवितां निघालेल्या ठिकाणीं परत येतां येतें.

३. पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, पण दक्षिणोत्तर भागीं किंचित् चापट आहे.

४. पृथ्वीचा व्यास ७,९२५ मैल असून, परिघ सुमारें २४,८९९ मैल आहे.

५. पृथ्वीवर १ भाग जमीन आणि तीन भाग पाणी आहे.


६. पृथ्वीवरील जमिनीचें क्षेत्रफळ, पांच कोटी पंधरा

लक्ष चौरस मैल आहे, आणि समुद्राचें पृष्ठफळ, चवदा कोटी पन्नास लक्ष चौरस मैल आहे.

७. पृथ्वीला दैनंदिन आणि वार्षिक अशा दोन गती आहेत; दैनंदिन गतीच्या योगानें दिवस आणि रात्र होतात; आणि वार्षिक गतीच्या योगानें, ऋतु, अयनें आणि वर्षें हीं होतात.

८. दैनंदिन गति सुमारें २४ तासांनीं होते, आणि वार्षिक गति ३६५ दिवस, ५ आवर, आणि ५६ मिन्युटांनीं होते; पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे लोटत फिरते.

९. पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर ह्या चार मुख्य दिशा आहेत; आणि आग्नेयी, वायव्य, नैर्ऋत्य, आणि ईशान्य, ह्या चार पोटदिशा आहेत. हें बाजूच्या आकृतीवरून चांगलें लक्षांत येईल.




१०. पृथ्वीच्या मध्यांतून दक्षिणोत्तर काढलेली जी रेषा तिला पृथ्वीचा आंस म्हणतात. त्या रेषेच्या उत्तर टोंकास उत्तर ध्रुव आणि दक्षिण टोंकास दक्षिण ध्रुव म्हणतात.



११. भूगोलावर भूमध्यवृत्त, अयनवृत्त, ध्रुववृत्त, क्रांतिवृत्त, रेखांशवृत्त, आणि अक्षांशवृत्त, इत्यादि वृत्तें आहेत. भूगोलाचे ३६० अंश मानितात; एका अंशाच्या ६० कळा आणि एका कळेच्या ६० विकळा मानितात

१२. भूमध्यवृत्त म्हणजे—पृथ्वीच्या बरोबर मध्यावर पूर्व पश्चिम जें वृत्त कल्पितात, तें. ह्या वृत्तालाच विषुववृत्त. आणि मध्य रेषा वगैरे नांवें आहेत; ह्या वृत्तानें भूगोलाचे उत्तर गोलार्ध आणि दक्षिण गोलार्ध असे दोन भाग झाले आहेत.

१३. अयन वृत्तें म्हणजे—भूमध्यवृत्तापासून समांतरानें उत्तरेकडे २३½ अंशांवर कर्कवृत्त आणि दक्षिणेकडे २३½ अंशांवर मकरवृत्त, अशीं जीं वृत्तें आहेत तीं.

१४. ध्रुववृत्तें म्हणजे—प्रत्येक ध्रुवापासून आलीकडे २३½ अंशांवर जीं वृत्तें कल्पिलीं आहेत, तीं; त्यांत उत्तरेकडे उत्तर ध्रुववृत्त आणि दक्षिणेकडे जें आहे तें दक्षिण ध्रुववृत्त आहे.

१५. क्रांतिवृत्त म्हणजे-कर्कवृत्तापासून मकरवृत्तापर्यंत भूमध्यवृत्ताप छेदून जाणारें जें एक तिर्कसवृत्त कल्पिलें आहे तें; ह्याच वृत्तावरून सूर्य फिरतोसा दिसतो, व ह्याच वृत्तावर सूर्याचे किरण लंब रेषेनें पडतात.

१६. रेखांशवृत्त म्हणजे—भूमध्यवृत्तास व दोन्ही ध्रुवांस छेदून जाणारें जें दक्षिणोत्तर वृत्त कल्पितात, तें; ह्या

वृत्तानें भूगोलाचे दोन भाग होतात; त्यांस पूर्व गोलार्ध आणि पश्चिम गोलार्ध असें म्हणतात. ह्यास याम्योत्तर वृत्तें म्हणतात, व ह्यांवरच अक्षांश मोजितात. नकाशावर दक्षिणोत्तर ज्या रेषा काढलेल्या असतात, त्या सर्व रेखांशाच्या रेषा समजाव्या.

१७. अक्षांशवृत्तें ह्मणजे—भूमध्यवृत्ताशीं समांतर अशीं ध्रुवापर्यंत जीं अनेक वृत्तें कल्पितात, तीं अक्षवृत्तें होत, ह्यांवरच रेखांश मोजितात.

१८. भूमध्यवृत्तापासून प्रत्येक ध्रुवापर्यंत जे ९० अंश, ते अक्षांश होत, त्यांत उत्तरेकडील ते उत्तर अक्षांश आणि दक्षिणेकडील ते दक्षिण अक्षांश समजावे.

१९. रेखांशवृत्तांपैकीं जें वृत्त पहिलें मानिलें असेल, त्या वृत्तापासून पूर्वेकडे जे १८० अंश, ते पूर्व रेखांश, आणि पश्चिमेकडे जे १८० अंश ते पश्चिम रेखांश समजावे.

२०. पृथ्वीला ५ कटिबंध म्हणजे पट्टे आहेत. ते असे: १ उष्ण कटिबंध, दोन समशीतोष्ण कटिबंध, आणि दोन शीत कटिबंध; उष्ण कटिबंध, दोन अयन वृत्तांच्या मध्यें आहे. त्यांत उष्णता अतिशय असते, अयन वृत्तापासून ध्रुव वृत्तापर्यंत दोन्ही बाजूंस मिळून दोन समशीतोष्ण कटिबंध आहेत, ह्यांत शीत आणि उष्ण समान असतें; आणि प्रत्येक ध्रुववृत्तापासून प्रत्येक ध्रुवापर्यंत दोन शीत कटिबंध आहत, ह्यांत थंडी फार असते.



२१. पृथ्वीवर महासागर एकच आहे, पण त्याचे पांच भाग कल्पिले आहेत. त्यांचीं नांवें: पहिला, पासिफिक महासागर, एशिया आणि अमेरिका ह्यांच्या मध्यें आहे; दुसरा, अतलांतिक महासागर, आफ्रिका, यूराप आणि अमेरिका ह्यांच्या मध्यें आहे; तिसरा, हिंदी महासागर, आशियाखंडाच्या दक्षिणेस आहे; चवथा, आर्तिक महासागर, उत्तरध्रुवाभोंवता आहे; आणि पांचवा, अंतार्तिक महासागर, दक्षिणध्रुवा भोंवता आहे.

२२. जमिनीचे प्राचीन महाद्वीप आणि नवीन महाद्वीप असे दोन मोठे भाग आहेत. प्राचीन महाद्वीपांत, यूरोप, आशिया आणि आफ्रिका अशीं तीन खंडें आहेत; आणि नवीन महा द्वीपांत अमेरिका हें एकच खंड आहे; त्याचे उत्तर अमेरिका, आणि दक्षिण अमेरिका असे दोन भाग असून ते पनामा नांवाच्या संयोगी भूमीनें जोडिले आहेत.-हें खंड इ. स. १४९२ त कोलंबस नांवाच्या पुरुषानें शोधून काढिलें ह्मणून ह्यास नवीन महाद्वीप ह्मणतात. पूर्वी प्राचीन महाद्वीपांतील लोकांस ह्या खंडाची माहिती नव्हती.

२३. जमिनीच्या मोठ्या भागास चोहोंकडून महासागराचा वेढा असतो त्यास महाद्वीप ह्मणतात, जसें प्राचीन महाद्वीप.

२४. जमिनीच्या लहान भागास चोहोंकडून पाण्याचा वेढा असतो त्यास द्वीप किंवा बेट ह्मणतात. जसें सिलोन बेट

२५. जमिनीच्या भागास तिहीं कडून पाणी असून एका बाजूनें जमीन असते त्यास द्वीपकल्प ह्मणतात. जसें कोरियाचें द्वीपकल्प.

२६. दोहोंकडे पाणी असून दोन देशांचा संयोग करणारा जो भूमीचा अरुंद भाग असतो त्यास संयोगी भूमी ह्मणतात. जसें, क्रौ ची संयोगीभूमी.

२७. समुद्राचे लगत्यास जो जमिनीचा भाग असतो त्यास किनारा म्हणतात. जसें मलबारचा किनारा.

२८. जमिनीचा चिंचोळा भाग पाण्यांत जातो त्यास भूशिर ( केप ) ह्मणतात. जसें कुमारिका, केप.

२९. भूमीवर जे उंचवटे असतात. त्यांस डोंगर म्हणतात. जसें, राजमहालचे डोंगर.

३०. मोठे उंच आणि फार लांब गेलेले जे डोंगर, त्यांस पर्वत ह्मणतात. जसें, हिमालय पर्वत.

३१. टेंकड्या, डोंगर, किंवा पर्वत तळाशीं एकमेकांस जडलेले असतात त्यांस पर्वत किंवा डोंगर ह्यांच्या ओळी किंवा रांगा ह्मणतात. जसें सातपुडा पर्वताची ओळ

३२. पर्वत किंवा डोंगर ह्यांच्या मधील सखल प्रदेशास खिंड किंवा खोरें म्हणतात. जसें खैबरखिंड.

३३. डोंगरावरील सपाट जमिनीस डोंगरसपाटी किंवा पठार ह्मणतात.

३४. सपाट प्रदेशास मैदान ह्मणतात. आणि समु-



द्राच्या सपाटीपेक्षां फार उंच जो प्रदेश त्यास उंचवट्याचें मैदान ह्मणतात.

३५. जलमार्गानें व्यापाराच्या सोयीचें जें शहर किंवा ठिकाण त्यास बंदर म्हणतात. जसें मुंबई बंदर.

३६. भूगोलाच्या मोठ्या भागावर पसरणारा जो जलसमूह त्यास महासागर ह्मणतात. जसें हिंदीमहासागर.

३७. जमिनीच्या लगत्यास जो महासागराचा भाग असतो त्यास समुद्र किंवा सागर ह्मणतात. जसें अरबीसमुद्र.

३८ समुद्राचा भाग वांकण घेऊन जमिनीवर जातो त्यास उपसागर ह्मणतात. जसें बंगालचा उपसागर.

३९. पाण्याच्या भागास चोहोंकडून जमिनीचा वेढा असतो त्यास, सरोवर ह्मणतात. जसें, मानस, सरोवर.

४०. समुद्राचा भाग जमिनीवर लांब जातो त्यास आखात ह्मणतात. जसें, मानारचें आखात.

४१. दोहोंकडे जमीन असून दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा अरुंद भाग त्यास सामुद्रधुनी किंवा संयोगीजल ह्मणतात. जसें, पाल्कची समुद्रधुनी.

४२. उंच प्रदेशांत उत्पन्न होऊन, नीच प्रदेशाकडे वहात जाणारा जो गोड्या पाण्याचा प्रवाह असतो त्यास नदी ह्मणतात. जसें यमुना नदी.

४३. जेथून प्रवाह निघतो त्या ठिकाणास उगम ह्मणतात. आणि तो प्रवाह समुद्रास किंवा सरोवरास

मिळून संपतो, त्या ठिकाणास नदीचें मुख म्हणतात तसेंच ज्या ठिकाणीं नद्या मिळतात त्या ठिकाणास, संगम ह्मणतात.

४४. व्यापाराच्या किंवा शेतकीच्या सोयीसाठीं नदीचा किंवा समुद्राचा फांटा फाडून दूर नेतात त्यास कालवा ह्मणतात. जसें, सुवेज कालवा.

४५. समुद्राचें पाणी चढतें तेव्हां त्यास भरती म्हणतात, आणि तेंच पाणी उतरूं लागतें ह्मणजे त्यास ओहटी ह्मणतात.

४६. नदीचें पाणी उंच ठिकाणावरून मोठ्या वेगानें खालीं पडतें त्यास धबधबा ह्मणतात. जसें घटप्रभेचा धबधबा.

४७. डोंगराच्या कडेनें पाण्याचा प्रवाह जातो त्यास पाणलोट ह्मणतात.

४८. पृथ्वीचा अथवा तिच्या भागाचा कागदावर जो आकार काढितात, त्यास नकाशा ह्मणतात. जसें, यूरोपचा नकाशा.

४९. शत्रू पासून रक्षण करण्याकरितां जो तट बांधितात, त्यास किल्ला ह्मणतात.

५०. सपाट जमिनीवर जो बांधितात, त्यास भुईकोट किल्ला ह्मणतात. जसें, मुंबईचा किल्ला.

५१. उंच डोंगरावर जो तट बांधितात, त्यास डोंगरी किल्ला ह्मणतात. जसें दौलताबादचा किल्ला.



[stamp]

५२. पाण्यांत जो कोट बांधितात, त्यास जंजिरा म्हणतात, जसें, श्रीरंगपट्टणचा किल्ला.

# भाग २ रा.

## मुंबई इलाख्याचें वर्णन.

हिंदुस्थान द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील अरुंदपट्टीला मुंबईइलाखा ह्मणतात.

**सिमा**—वायव्येस बलुचिस्थान; उत्तरेस पंजाब इलाखा; ईशान्येस राजपुताना; पूर्वेस मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें, मध्यप्रांत, वऱ्हाड आणि निजामाचें राज्य; दक्षिणेस मद्रास इलाखा व म्हैसूर संस्थान; आणि पश्चिमेस अरबीसमुद्र आहे.

**विभाग**—भाषेच्या योगानें ह्या इलाख्याचे, सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र आणि दक्षिणमहाराष्ट्र असे पांच विभाग झाले आहेत.

**भाषा**—सिंध देशांत सिंधी, कच्छ आणि गुजराथ प्रांतांत गुजराथी, महाराष्ट्र देशांत मराठी, आणि दक्षिण महाराष्ट्र देशांत कानडी ह्या भाषा चालतात.

**जिल्हे**—सिंध प्रांतांत अपरसिंध फ्रांटीयर, शिकारपूर, हैदराबाद, कराची व थर आणि पारकर असे पांच जिल्हे आहेत. गुजराथेंत, सुरत, भडोच, खेडा, अमदाबाद आणि

पंचमहाल असे पांच जिल्हे आहेत. महाराष्ट्रदेशांत खानदेश, नाशिक, अहमदनगर, पुणें, सोलापूर, सातारा, ठाणें, रत्नागिरी, कुलाबा, आणि मुंबई असे दहा जिल्हे आहेत; आणि दक्षिणमहाराष्ट्र देशांत, बेळगांव, धारवाड, विजापूर आणि कारवार उर्फ सदाशिवगड असे चार जिल्हे आहेत.

**पर्वत**—सह्याद्रि पर्वत किंवा पश्चिमघाट, हा तापी नदीचे मुखापासून दक्षिणेकडे समुद्रापर्यंत गेला आहे. ह्या पर्वताच्या पश्चिमेकडील भागास कोंकण व पूर्वेकडील भागास देश असें ह्मणतात; सातपुडापर्वत नर्मदा आणि तापी ह्या दोन नद्यां मध्यें पूर्व पश्चिम पसरला आहे आणि हाला, पर्वत सिंध देशाचे पश्चिमेस, दक्षिणोत्तर पसरला आहे.

**डोंगर**—राज पिंपळ्याचे डोंगर, नर्मदा आणि तापी ह्या दोन नद्यांमध्यें आहेत; चांदवडचे डोंगर नाशिक जिल्ह्यांत आहेत; अजिंठ्याचे डोंगर खानदेशाच्या दक्षिण भागांत आहेत; शंभु महादेवाचा डोंगर साताऱ्याजवळ आहे; आणि जोतिबाचा डोंगर कोल्हापुराजवळ आहे.

**घाट**—थळघाट नाशिकाजवळ आहे, बोरघाट खंडाळ्याजवळ आहे, पारघाट महाबळेश्वराजवळ आहे, माळशिरसचा घाट, जुन्नराजवळ आहे, आंबेघाट कोल्हापुराजवळ आहे, आणि रामघाट दक्षिण महाराष्ट्रांत आहे.

स. ग्र. १६
ग्रंथालय

# श्रीवज्रेश्वरीवर्णन.

## पूर्वभाग.

### पूर्वीची आणि सांप्रतची स्थिति ह्यांचें वर्णन.

**नांव**—वज्रेश्वरी हें नांव प्राप्त होण्याचा उद्देश असा आहे कीं, इंद्राशीं कलिकाल नांवाचा दैत्य युद्ध करित असतां इंद्राचीं सर्व शस्त्रें त्या कलिकालानें गिळिलीं. तेव्हां इंद्राच्या हातांत फक्त एक वज्र राहिलें त्यानें इंद्रानें त्या राक्षसास मारिलें. त्या वेळेस राक्षसानें आपल्या शस्त्रानें त्या वज्राचे दोन तुकडे केले. त्या वेळीं त्या वज्रापासून ही देवी उत्पन्न झाली ह्मणून हिचें नांव वज्रेश्वरी ठेविलें.

**स्थल**—ही वज्रेश्वरी साधारण लोकांत वज्राबाई, व थोरले बाजीरावसाहेब यांचे बखरींत वज्रयोगिनी, ह्या नांवानें ठाणें जिल्ह्यांत प्रसिद्ध आहे. मूळगांव वडवली नांवाचें होतें; पण तें देवीच्याच नांवानें ह्मणजे वज्रेश्वरी किंवा वज्राबाई ह्या नांवाखालीं सध्यां मोडत आहे.

यात्रेच्छु किंवा स्थलावलोकनेच्छु मित्रांनीं जी. आय. पी. रेलवेच्या कल्याणस्टेशनावर उतरून तरींत बसून कल्याणची खाडी ओलांडावी; नंतर भिवंडी येथें यावें. भिवंडीहून बैलांची गाडी किंवा तांगा शक्त्यनुसार करून वा-

ड्याच्या सडकेनें अनगांवकवाडावरून वज्रेश्वरीस जाण्यास निघावें. कवाडगांवीं परमसाधु सखारामबोवा कवाडकर ह्यांच्या समाधीचें दर्शन घ्यावें. हें स्थल अति रमणीय असून प्रेक्षकांच्या अंतःकरणास तुष्ट करणारें आहे. हे सखारामबावा नासिकच्या रघुनाथभटजींचे शिष्य असून मोठे सिद्ध होते. त्यांचें वेगळें चरित्र आहे तें पहा.

अनगांवकवाडाहून जातांना पुढें वाड्याच्या सडकेवरचा भिवंडीपासून ११ वा मैल, ह्या मैलापासून पश्चिमेकडे वळून तेथून ४ मैलांवर वज्रेश्वरी लागेल. हे चार मैल जाणें गाडींतून किंवा टांग्यांतून अति कष्टदायक व मोठ्या दगदगीचें होतें. पण ह्या दगदगीपासून सर्व लोकांस ज्या महात्म्यांनीं वांचविलें त्यांचा नामनिर्देश करणें एथें अप्रासंगिक होणार नाहीं, असें जाणून, त्यांचीं नांवें आपणांसमोर मोठ्या प्रेमानें आणितों. १ मे. शिलकाकसाहेब कलेक्टर ठाणें, २ रा. ब. गणेश कृष्ण अपटे, इंजीनियर, ठाणें, ३ रा० ब० दाजीसाहेब गुप्ते, व ४ रा० सा० रा० ब० आचार्य व लोकलबोर्ड कमिशनर. ह्या चौघांच्या दीर्घ परिश्रमानें लोकल बोर्डांतून १७ हजार रुपयांची मंजुरी घेऊन ह्या चार मैलांत यात्रेकऱ्यांना खस्ता खाव्या लागत, तो रस्ता सडकेचा करण्याचा विचार ठरला. हल्लीं झाडें तोडून, सडक आंखून, खडीचे गंज राखून ठेविले आहेत. वाडे सडकेच्या ११ व्या मैलाजवळ उंबरपाडागांव आहे, त्याच्या दक्षिणबाजूकडून ह्या सडकेची



योजना रा० ब० अपटेसाहेबांनीं केली आहे. वाटेंत सैतानी ( भुताळी ) नांवाची नदी नामाप्रमाणें कृति करणारी लागते, तिला फरशी करण्याचा विचार दिसतो. सारांश, हें रस्त्याचें महत्संकट अपटेसाहेबांच्या खटपटीनें झटपट नाहींसें होणार, हें फार चांगलें आहे. आतां थेट भिवंडीहून निघून एकसारखें वज्रेश्वरीपर्यंत बिनतक्रार न उतरतां, आंगास हिसके न बसतां १९ मैल वज्रेश्वरीस आपण जावें. अशी ही नवीन व्यवस्था झाली आहे.

**सीमा**—वज्रेश्वरी भिवंडीच्या वायव्येस आहे. वज्रेश्वरीगांव डोंगराच्या उत्तरेकडील उतरणीवर आहे. ह्या गांवाच्या पूर्वेस अकलोलीगांवची हद्द, दक्षिणेस उसगांवची शींव डोंगरास लागून, पश्चिमेस गणेशपुरी नांवाचें गांव, आणि उत्तरेस तानसानदी व तिच्या पलीकडे वाडें तालुका. ह्याप्रमाणें सीमांच्या मध्यें वज्रेश्वरी आहे.

**वज्रेश्वरीसंस्थानाकडे असलेलीं गांवें**—ह्या संस्थानाकडे ९ गांवें श्रीमंत पेशवेसरकारापासून हल्लींच्या कृपाळू सरकारपावेतों चालत आहेत. त्यांत भिवंडी तालुक्यांत ३; तीं:– १ वडवली ऊर्फ वज्रेश्वरी, हें पुरातन आहे. २ कण्हेरी आणि ३ फेणें. वसई तालुक्यांत ३ गांवें आहेत; तीं:– १ भिनार, २ अंबोडें आणि ३ वडघर. हीं पेशवेसरकारांतून मिळालीं आहेत. ह्याप्रमाणें ह्या संस्थानास एकंदर ६ गांवें श्रीमंत पहिले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांनीं दिलीं असून, ती देणगी ह्या

वेळेपर्यंत अबाधित चालू आहे. ह्या गांवांची देणगी इसवी सन १७३१ च्या सुमारास आहे. ह्या सर्व गांवच्या उत्पन्नांतून ह्या संस्थानचा खर्च आजपावेतों चालत आहे. वज्रेश्वरीगांव ७९ घरांचा आहे. सर्व गांवें ह्याचप्रमाणें लहान लहान आहेत.

**वज्रेश्वरीचें देऊळ**—हें देऊळ पहिले बाजीराव पेशवे ह्यांनीं बांधिलें आहे. अगदीं बरोबर पूर्वाभिमुख साधून अग्रभागीं मोठा थोरला कमानी दरवाजा केला आहे. व चोहोंबाजूंनीं बळकट कोट बांधिला आहे. तो कोट पहातांच प्रथमदर्शनीं हा मोठा किल्ला असावा असें वाटतें. हें देवालय अजमासें १९० वर्षांचें जुनें असून अद्याप फार मजबूत आहे. ह्यास दोन गाभारे आहेत. ह्याचा प्रथममजला दगडी माठीव केलेला असून दुसरा मजला ह्मणजे शिखर हें सर्व चुनेगच्ची केलेलें आहे. नवीन केलें तेव्हां उत्तम रंगीत असावें. हल्लीं तो रंग कांहीं बेरंग झाला आहे. देवीच्या मूर्ति जेथें आहेत, तेथील जागा मेघडंबरी घांटाची असून तो गाभारा अजमासें शंभर लोक उभे राहतील असा आहे. हा पश्चिमेकडचा गाभारा होय. ह्याचे पूर्वेकडचा गाभारा मोठा असून त्यांत २०० मनुष्यांचा समावेश होईल इतकी जागा आहे. देवालयांतील दोन गाभाऱ्यांचे पूर्वेस देवालयास लागून उत्तम प्रकारचा सभामंडप श्रीमंत सेनाखासखेल समशेरबाहादूर कै० खंडेरावमहाराज गायकवाडसरकार, बडोदें, ह्यांनीं संवत् १९२० ह्या सालीं बांधिला आहे. त्याचप्रमाणें पूर्वबाजूच्या कमानी दरवाजावर नगारखाना हाही गायकवाडसरकारांनीं ह्याच वर्षी बांधिला आहे.



कमानी दरवाजांत आल्याबरोबर जो रमणीय देखावा, भोंवतालची गर्द झाडी, उत्तरेस तानसानदी, ईशान्येस रामेश्वर महादेवाचें देवालय, पूर्वेस बारा कोसांवरचा माहुलीचा किल्ला, इ० चहूं बाजूंची वनशोभा पाहिल्यावर ह्या सृष्टिसौंदर्याची रमणीयता नेत्रांस आल्हादित करिते. कमानी दरवाजाचे पूर्वेकडे अजमासें ६० हात खोली आहे. ह्या जागीं कैलासवासी श्रीमंत गोपाळराव वासुदेव ऊर्फ नानासाहेब चांदवडकर नासिकचे प्रसिद्ध सावकार ह्यांनीं ५२ पायऱ्या दगडी चिरेबंदी बांधिल्या आहेत. पायऱ्यांचे पूर्वबाजूस उत्कृष्ट दीपमालाही त्यांनींच बांधिली आहे. ही दीपमाला मोठी विस्तीर्ण असून तिच्यावर जाण्यास आंतून फिरता जिना केला आहे. हें काम श्रीमंत चांदवडकर ह्यांनीं शके १७७० सालीं केलें आहे. हे चांदवडकर मोठे धर्मशील व उदार असे होते. ह्यांनीं ३० लक्ष रुपये धर्मादाय केले, अशी आमच्या नासिकास गोष्ट सांगतात. प्रत्यक्ष पहाणारे कांहीं लोक आहेत.

**देवालयांतील मूर्ति**—पश्चिमेकडील दुसऱ्या गाभाऱ्यांत मेघडंबरी जागा जी वर सांगितली त्या जागेंत मध्यभागीं श्रीवज्रेश्वरीची मूर्ति अतिरमणीय, सिंदूरवर्ण,

सालंकार, सुवस्त्रमंडित, हातीं गदा व खड्ग घेऊन उभी आहे. खड्ग हातीं असण्याचें कारण असें दिसतें कीं, जे दुराचारी, नास्तिक, वगैरे लोक ह्यांचा नाश व्हावा ह्मणून खड्गशस्त्र घेतलें आहे. गदा हातीं घेण्याचें कारण, जे धार्मिक, सच्छील नरवर त्यांना सौख्य होऊन त्यांच्या शत्रूंचा नाश व्हावा, ह्यासाठीं हातांत गदा घेतली असावी. वज्रेश्वरीच्या उजवे बाजूस रेणुकेची मूर्ति; ही पण वज्रेश्वरीएवढी व वज्रेश्वरीसारखींच आहे; शिवाय महालक्ष्मी व्याघ्र, सप्तशृंगदेवीची मूर्ति ह्या सर्व उजवे बाजूस आहेत. डाव्या बाजूस कालिकेची मूर्ति वज्रेश्वरीसारखीच आहे. शिवाय, भार्गवरामाची मूर्तीही डावे बाजूस आहे. ह्या सर्व मूर्ति ज्या स्थानावर आहेत तें स्थान उत्तम शृंगारलेलें सुवर्णमय केलेलें आहे. देवीच्या पुढें मर्यादेस्तव दक्षिणोत्तर आडवा स्तंभ लाविला आहे, तो सर्व पितळेनें मढविलेला असून त्यावर नवसाचे अनेक रुपये ठोकलेले आहेत. पण ते जसे सराफाचे घरीं खोटे रुपये खिळे मारून ठोकलेले तसे मात्र नाहींत हो! तर खरे रुपये खऱ्या भावानें खऱ्या नवसांचे खरोखर आहेत.

दुसऱ्या मोठ्या गाभाऱ्यांत दक्षिणबाजूस श्रीवक्रतुंड गणराज, कालभैरव, वेताळ हे असून उत्तरबाजूस सरस्वती, महादेव व पार्वती ह्यांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यांत प्रतिशब्द होतो. गाभाऱ्यांतून दक्षिणोत्तरपूर्व असे रस्ते असून प्रदक्षिणेकरितां उत्तम पाषाणमय मार्ग पूर्वींच



देवालयकारांनीं व्यवस्थित बांधिला आहे. देवालयाचे दक्षिणेस प्राकाराचे आंत श्रीमहादेवाचें लहान देवालय असून एक सव्यशुंडादंडमंडित गणराजमूर्ति विराजमान आहे.

प्राकाराचे पूर्वबाजूस ह्मणजे कमानी दरवाजाचे दक्षिणोत्तरभागीं दोन भव्य बुरूज असून परशत्रुभयरक्षणार्थ त्या बुरुजांस गोळया मारण्याकरितां जंग्या ठेविल्या आहेत. ह्या बुरुजांची भव्यता! प्राकारांचा मजबूतपणा! कमानी दरवाजाची ठेवण, हें पाहिल्यावर एवढाले दगड अशा अवघड जागीं वर कसे चढविले ह्याजबद्दल पूर्वींच्या कारागिरीचें नवल वाटतें! देवालयाचे बाजूस कोटाचे आंत आंबे, सोनचांफा, मुचकुंद, रामफळीचीं वगैरे झाडें असून तीं झाडें फारच उंच उंच वाढलीं आहेत. जणू काय, श्रीदेवीस ऊन लागेल ह्मणून तिच्या देवालयावर आपल्या डाहाळया हींच छत्रें त्या वृक्षांनीं धरलीं आहेत. दक्षिणेकडे कोटाच्या लगतच एक मोठा अश्वत्थवृक्ष असून त्याचे पश्चिमेस डोंगरावर चढून जाण्याचा मार्ग आहे. डोंगरावर एक सिद्धाचें स्थान असून त्या सिद्धास गोदडबोवा असें ह्मणतात. ह्या अश्वत्थाचे पूर्वेस उतरून गेल्यावर वज्रेश्वरीसंस्थानचे वहिवाटदार ह्यांचें राहण्याचें घर, कचेरी वगैरे आहेत.

प्राकारामध्यें महादेवाचें देवालय जें वर सांगितलें त्याच्या पूर्वेस ह्या संस्थानच्या पूर्वींच्या मालकांचे व इतर सिद्धजनांच्या समाधींचें स्थल आहे. ही जागा

व्यवस्थित ठेविलेली असून प्राकारांत जरी आहे तरी अगदीं वेगळी आहे.

**वज्रकुंड**—वज्रेश्वरीच्या देवळापासून अजमासें ५० हातांवर वज्रकुंडनांवाचें तळें आहे. हें चहूं बाजूंकडून उत्तम तऱ्हेचें बांधिलें आहे. ह्याची ही बांधणी कै० नानासाहेब चांदवडकर ह्यांनीं करविली. ह्या तलावाची मरामत उत्तम प्रकारची असल्यानें ह्याचें पाणी चांगलें असतें. ह्या तलावाचे कांठीं जगदंबेच्या पूजेकरितां लागणारीं पुष्पें विपुल मिळतात. तलावाच्या चहूं बाजूंनीं उत्तम प्रकारचा बगीचा केला आहे. त्यांत गुलाब, मोगरा, जाई, जुई, सेवंती, अनंत, तगर, अगरु, हरितचंपक, पीतचंपक, श्वेतचंपक, कण्हेर पांढरा तांबडा, जास्वंदी पांढरी तांबडी भगवी, पिंवळा कण्हेर, कोरांटी, शेंदरी, मखमाल, निशीगंध, दवणा, पाच, आंबे, डाळिंबें, फणस, निंबें, बदाम, चंदन, अननस, सुपारी, नारळ, केळी, कर्दळी, जांभळी, अशा जातीचीं झाडें आहेत. ह्या बागेस तलावाचें पाणी मोटेनें मिळण्याची सोय आहे. तलावांत उतरण्यासाठीं दोन जागीं उत्तम सोय आहे. चहूं बाजूंस बांधकाम उत्तम असून शिवाय बाहेरचे बाजूस उत्तम भराव करून काम मुस्तकीम केलें आहे. ह्याच्या पाण्याचा उपयोग जगदंबेच्या स्नानाकरितां, यात्रस्थानच्या पानाकरितां करितात. जर कां यात्रस्थ यांत स्नान करते तर मग श्रीत्र्यंबकेश्वर कनखलतीर्थत्वच ह्या तलावास येतें.



**रामेश्वर महादेव व उष्णोदकाचीं कुंडें**—वज्रेश्वरीच्या देवालयाचे ईशान्येस अर्ध्या मैलावर तानसानदीच्या दक्षिणकिनाऱ्यावर रामेश्वर महादेवाचें देवालय बांधिलें आहे. हें देवालय पहिले बाजीराव ह्यांचे कारकीर्दीत वसईचे सुभे शंकराजी केशव यांनीं बांधिलें. देवालयांतील पिंडी फारच उत्तम आहे. पुढें नंदिकेश्वर असून देवालयाचे अगदीं सन्निध ह्मणजे दोन हातांवर पूर्वबाजूस एकासएक लागून अशीं तीन कुंडें उत्तम रीतीनें दगडी बांधिलेलीं आहेत. पश्चिमेकडील कुंडांतील पाणी चांगलें उष्ण, त्याचे पूर्वेकडील कुंडांतील त्याच्यापेक्षां थोडें उष्ण व अगदीं पूर्वबाजूच्या कुंडांतील पाणी साधारण कोमट असें आहे. हीं कुंडें तानसानदीच्या दक्षिणकिनाऱ्यावर नदीपासून वीसपंचवीस हातांवर आहेत व नदीपेक्षां १० हात उंचीवर आहेत. पाण्यास गंधकासारखा वास येतो. आठ वर्षांच्या मुलास कुंडांत उभें केलें तर त्याच्या गळयाइतकें पाणी दरएक कुंडांत आहे. ह्या कुंडांस अनुक्रमें राम, लक्ष्मण व सीता अशीं नांवें आहेत. ह्या कुंडांचे उत्तरेस मारुतीकुंड ह्मणून चवथें कुंड आहे. कुंडाचे पूर्वबाजूस एक तलाव बेमरामत पडला असून त्यांत अत्यंत सुशोभित अशीं तांबडीं कमळें आहेत. हें स्थल फार रमणीय आहे. मी स्वतां तिन्ही कुंडांत दोन कलाक खुशालपणें बसलों होतों; नंतर बाहेर आल्यावर मला क्षुधेनें फार त्रास दिला. असाच प्रकार सर्वांचा होतो,

म्हणून मला तेथें कळलें. हा बहुधा त्या उष्णोदकाचा गुण असावा, असें वाटतें. ह्यावरून ज्यांना भूक लागत नसेल त्यांनीं ह्या कुंडांचीं स्नानें करून जठराग्नि प्रदीप्त करावा. हें देऊळ व हीं कुंडें अकलोली गांवच्या हद्दींत आहेत, पण वज्रेश्वरीच्या अगदींच जवळ आहेत.

**रामेश्वराचे देवळाजवळचीं कुंडें**—रामेश्वराचे देवळाच्या उत्तरेस व पश्चिमेस तानसानदीच्या कांठावर व नदीच्या पात्रांत अनेक उष्णोदकाचीं कुंडें आहेत. एक तर नदीच्या वाहत्या धारेंत मीं चमत्कारिक कुंड पाहिलें. तें असें कीं वर वाहून येणारें पाणी गार व जेथें ती उष्णोदकाची उकळी निघते तेथें पाणी कढत होतें. ईश्वरनिर्मित चमत्कार आहे!

ह्या तानसानदीच्या दक्षिणबाजूस नदीपासून एक दोन हातांवर अशीं लहान लहान कुंडें पूर्वींच्या महात्मे लोकांनीं बांधिलीं आहेत. त्यांत अग्निकुंड अत्यंतच उष्णोदकाचें आहे; तें इतकें कीं त्यांत बोट घालवत नाहीं. ह्याचप्रमाणें सूर्यकुंड, वायुकुंड, चंद्रकुंड, ब्रह्मकुंड, वगैरे पुष्कळ कुंडें उष्णोदकाचीं आहेत. हीं रामेश्वराचे देवालयापासून शंभर हातांच्या अंतरावर आहेत.

**भीमेश्वर महादेव, त्याचे सन्निधचीं, व तानसानदींतील कुंडें आणि उष्णोदकाचे झरे**—भीमेश्वरमहादेवाचें देऊळ वज्रेश्वरीच्या वायव्येस अजमासें दोन मैलांवर भिवाळी गांवच्या शिवारांत तानसानदीच्या

सं.ग्र.भू.२६
म.ग्रं.सं.ठाणें



दक्षिणेस नदीपासून अजमासें दोनशें हातांवर आहे. हें देवालय दगडी व चुनेगच्ची फार मजबूत बांधिलें आहे. भोंवतीं पुरुष दीड पुरुष उंचीचा कोट चहूं बाजूंस आहे. हें देऊळ पहिले रावबाजी ह्यांचे कारकीर्दींत वसईचे सुभे शंकराजी केशव ह्यांनीं बांधिलें. देवालयांत सर्वोत्कृष्ट पिंडी, बाहेर नंदिकेश्वराची स्थापना केली आहे. देवालयाचे पूर्वबाजूस मांड्याबरोबर पाणी असलेलीं दोन उष्णोदकाचीं कुंडें आहेत. ह्या कुंडांतील उदक अतिशय उष्ण आहे. ह्यांत बहुधा स्नान करणारीं शेंकडा १० मनुष्यें सांपडतील. शिवाय देवालयाचे उत्तरेस, ईशान्येस तानसानदीमध्यें पुष्कळ उष्णोदकाचे झरे आहेत. गोरख मछिंदर नांवाचा उष्णोदकाचा झरा तर इतका उष्ण आहे कीं, त्यांत बोट घालवत नाहीं. ह्या नदींत अशा प्रकारचे उष्ण झरे पन्नास साठ आहेत. शिवाय यात्रेच्या वेळेस पुष्कळच पैदा करून त्यांस ज्या साधूचें जें उपास्यदैवत ते साधु त्या झऱ्यास आपल्या दैवताचें नांव देऊन त्या यात्रेकरूंकडून तेथें पैसा, सुपारी, तांदूळ वगैरे ठेववितात. ह्या तानसानदींत ह्या दोन मैलांत अशीं शेंकडों उन्हाळीं पैदा व्हावीं हा ईश्वरी चमत्कार आहे. भूगर्भशास्त्रवेत्ते ह्याजबद्दल बारीक शोध लावितील तर उत्तम होईल.

**वज्रेश्वरीभोंवतालची वनशोभा**—कोणतेंही स्थळ असो, जेथें वृक्षांची घनदाट छाया तेथें प्रेक्षकांचें, सिद्धांचें, राजापासून रंकापावेतों लोकांचें मन लोभावें,

हें स्वाभाविक आहे. वज्रेश्वरीच्या आसमंतात् पाहिलें तर जिकडे तिकडे गर्द छायामय स्थलें दृग्गोचर होतात. साग, तिवस, शिसव, धामोडा, सादडा, कुडा, शिळंद, आंबे, जांभळी, पिंपळ, वड, वेळू, करवंदी, बाभळी, हेदी, निंब, करंज, खैर, भोकरी, तोरणें, आवळी, आळवी, हिरडे, गेळ, रिठे, मोह, वगैरे ह्यांच्या योगानें तें सर्व अरण्य जणू काय देवीस चहूं बाजूंनीं विंजणवारा घालीत आहे असें वाटतें. ह्या सर्व गर्द झाडींतून श्रीवज्रेश्वरीचें देवालय आपलें श्वेतशीर्ष उच्च करून जसें काय यात्रेच्छु-जनांस दोन कोसांवरून आपलेकडे हांका मारीत आहे असें वाटतें. ह्मणजे पूर्वेस उंबरपाड्यापासून हें देवालय वज्रेश्वरीस जाणारांस दिसूं लागतें. आतां अशा निबिड अरण्यांतून दोन कोसांवर हें देवालय कसें दिसावें, अशी आमच्या चतुर वाचकांस शंका येणें साहजिक आहे, पण शंकेचें कारण नाहीं. कां तर हें देवालय मुळींच उंच जागेवर ह्मणजे डोंगराच्या उतरणीवर जमिनीपासून सरासरी तीनशें फुटांच्या वर बांधिलें आहे. त्या मानानें तें सहज दृष्टीस पडतें. ह्या दोन कोसांतील बिकट वाटेनें गाड्यांची फारच फजिती होत असे, पण ती टाळण्याचें यश अपटेसाहेबांनीं घेतल्याचें मागें सांगितलेंच आहे. ह्या अशा बिकट अरण्यांत हिंसक पशूंचें भय पण निर्विवाद आहे. तत्राप चमत्कार असा कीं, वज्रेश्वरीच्या यात्रेनिमित्त आलेल्या मनुष्यांस आजपावेतों दगा



झाल्याचें उदाहरण निश्चयानें नाहीं, असें कळतें. योगीजनांस निरामय अरण्यवास फार आवडतो, त्याप्रमाणें साक्षात् वज्रयोगिनी देवी जर आहे तर तिला हा असा निबिड वृक्षाच्छादित वास कां न आवडावा? मी ज्या वेळेस वज्रेश्वरीस गेलों त्या वेळेस मार्गशीर्ष महिना असल्यामुळें हें सर्व अरण्य जणू काय थंडीची बाधा होईल ह्मणून आपल्या पर्णवस्त्रांनीं पूर्ण झांकलेलें होतें, त्यामुळें विशेष शोभा दिसत असे. हेंच अरण्य उष्णकाळांत पहावें तर जणू काय उकाडा होऊं लागला ह्मणून आपलीं सर्व पर्णरूप वस्त्रें टाकून उघडे होऊन बसलेले वृक्षसाधु दृष्टीस पडतात. पर्जन्यकाळांत ह्या अरण्यांतील वृक्ष आपल्या नूतन पल्लवछत्रांनीं भूषित होऊन संततधार सहन करितात असें वाटतें. पर्जन्यकाळ ह्मटला ह्मणजे वज्रेश्वरीस पूर्णपणानें होतो. जसी आपणास पेंठ हर्सूल, विगतपुरी, ह्यांचीच आजीबाई वज्रेश्वरी! तेव्हां तेथील पर्जन्यातिशयाविषयीं ज्यास्त सांगणें नको व लिहिणेंही नको.

## वज्रेश्वरीची यात्रा केल्याचें फळ.

वज्रेश्वरीच्या यात्रेपासून सर्व प्रकारच्या व सर्व धर्मांच्या लोकांस फलश्रुति कांहींतरी होईल हें खात्रीनें सांगतों. ह्या यात्रेस कट्टा सुधारक जर गेला तर तेथील वनश्री पाहून ईश्वरलीलेचें कौतुक करील. भाविक जर यात्रेस गेला तर देवीस अनन्यभावें शरण जाऊन देवीची प्रातः-

कालीं होत असलेली काकडआरती, दोन प्रहरीं होत असलेला नैवेद्य, सायंकाळची शेजारती इत्यादिकांनीं त्याचें अंतःकरण तल्लीन होऊन जाईल. आतां परधर्मी लोक ह्या स्थळीं आले तरी तेथील अरण्यांत नदीच्या कांठीं असलेलीं उन्हाळीं पाहून त्यांना परमेश्वरकृत चमत्कृतीचें नवल वाटेल.

सारांश काय कीं, ह्या स्थलीं सर्व लोकांचें चित्तरंजन व्हावें असा ईश्वरी संकेत दिसतो. जसें तुकारामांच्या अभंगांत एखादें चरण असतें; तसें हें स्थल सर्व व्यक्तींचें रम्यस्थान होय. आतां तुकारामांच्या अभंगांतील एक चरण आपणांस ह्या प्रसंगीं सांगितल्यास तें समयोचित होईल; करितां तें सांगतों. "लांचावलें मन लागलीसे गोडी" हें चरण कोठेंही योजिलें तरी जसा कोंदणांत हिरा शोभतो तसें शोभेल. मोठमोठे राजे हजारों लष्कर घेऊन शत्रूवर चाल करतात, त्याचें कारण वरचें चरण. मोठमोठे योगी, मोठमोठे मौलवी, फकीर, साधु, बिशप, पुंगी, जैनसाधु, संसार सोडून गिरिकंदरीं कपाटांत बसले ह्याचें कारण वरचें चरण. ह्याप्रमाणें हजारों चरण सर्वव्यापक जसे तुकारामांनीं आपल्या अभंगांत ठेविले, त्याचप्रमाणें हें स्थल सर्वव्यापक व सर्व प्रकारच्या लोकांचें मनोरंजन होण्यास परमेश्वरानें निर्माण केलें आहे.

### श्रीवज्रेश्वरीस आणखी दिलेल्या देणग्या.

पेशवेसरकारांनीं दिलेल्या देणग्या हल्लींच्या दयाळू



सरकारांतून अव्याहत चालू असून कोणत्याही प्रकारचा त्यांत खंड नाहीं. सहा गांवें व त्यांतील जंगल वगैरे सर्व उत्पन्न श्रीकडे चाललेंच आहे. ह्याशिवाय ज्या ज्या थोर श्रीमानांकडून व्यवस्थित देणग्या मिळाल्या असून चालू आहेत त्याः—

**गायकवाडसरकारचा चौघडा**—संवत् १९२० सालापासून श्रीमंत सेनाखासखेल समशेरबहादर गायकवाडसरकार ह्यांनीं चवघडा सुरू केला; आणि त्याची वार्षिक सनद श्रीयुत कैलासवासी खंडेरावमहाराजांनीं करून दिली. प्रत्यहीं हा चवघडा त्रिकाळ झडतो. हा चवघड्याचा ध्वनि होतो असें नाहीं, तर तो श्रीमंत गायकवाडसरकारच्या कृत्यांस "धन धन" (धन्य धन्य) असें ह्मणून सर्व अरण्य दणाणवून सोडतो!

कै० श्रीमंत खंडेरावमहाराजांची औदार्यशक्ति अतितर असून कोणीही त्यांच्यासमोर जाऊन रिक्तहातांनीं परत आलाच नाहीं. एकवेळ एक कन्हय्या भांड त्यांच्याकडे येऊन त्यानें आपलें नृत्यकौशल्य दाखविलें. त्यास सवालक्ष रुपये देणगी दिली! मला वाटतें हल्लीं असें औदार्य क्वचितच दृष्टीं पडेल. असो. ह्या महाराजांच्या औदार्याचें, धर्मकृत्यांचें, देणग्यांचें स्मरण होतांच कवि अनंतफंदीच्या "उदार स्वामीसेवक त्यांना कर्णाची उपमा साज" ह्या चुटक्याचें घटकाभर स्मरण होऊन त्याचा घुटका घ्यावासा वाटतो. व हल्लींच्या लटक्या काळांत चुटक्यांचे मांडव

घालणारांपुढें कोरड्या मिटक्या मारीत बसावें लागतें. असो. हेही दिवस जाऊन सुदिन प्राप्त होईल असें आजपावेतों झालेल्या कालाच्या इतिहासावरून वाटतें. हा चौघडा हल्लींच्या कारकीर्दीपावेतों गायकवाडसरकारांनीं अबाधित चालू ठेविल्याबद्दल त्यांचें यशचिंतन करणें हेंच ग्रंथकाराचें कर्तव्य आहे.

**जव्हारसंस्थानांतून वार्षिक नेमणूक**—श्रीदेवीस महापूजा करणें ह्यासाठीं जव्हारसंस्थानचे श्रीमंत पतंगशहा महाराज यांनीं वार्षिक नेमणूक करून दिली आहे, व तीही अव्याहत चालत आहे. त्या नेमणुकीचा प्रभाव, पुत्र, कन्या, सद्गुणी कलत्र, अचल संपत्ति, निरोगी काया. हा अनुभव हल्लींच्या राजमुकुटमणीस पूर्णपणें असून निकटसाहचर्यानें श्रीदेवीचा आणखी पूर्ण आशीर्वाद ते घेतील अशी जव्हारसंस्थानचे श्रीमंतांस विनंति आहे.

**धारचे पवारसरकारांतून नेमणूक**—श्रीवज्रेश्वरीपुढें सतत नंदादीप चालू राहण्याकरितां धारचे श्रीमंत पवारसाहेब यांची वार्षिक नेमणूक आहे.

**इंग्रजसरकारांकडून मोबदला**—वज्रेश्वरीसंस्थानच्या ६ गांवचें अपकारी उत्पन्न आपल्या परम उपकारी सरकारनें घेऊन त्याचा मोबदला १४९ रुपये श्रीदेवीस सरकारांतून मिळतो. सहा गांवांत अपकारीसंबंधीं ह्या संस्थानास कांहींच बोलणें नको; कारण तो हक्क सरकारांत घेऊन त्याचा मोबदला वरच्या रकमेंत आला!



**वज्रेश्वरीस पाणी पिण्याची सोय**—वज्रकुंड नांवाचें तळें ज्याचें वर्णन वर केलें, त्याशिवाय गांवांत विहिरी, आड वगैरे आहेत. हे पर्जन्यकाळांत अगदीं पाण्यानें डबावलेले असतात; पण जसा जसा उन्हाळा येतो तसे तसे ते पातालगामी होत जातात. मग त्यांस उकरून, दगड फोडून, मलमा काढून, जलाकर्षणाची सोय होत असते. तानसानदी पाव कोसावर आहेच. तिचें पाणी जनावरांस मुख्यत्वें पिण्याच्या उपयोगास येतें.

**वज्रेश्वरीसंस्थानची पंचवीस वर्षांपूर्वींची स्थिति**—सांप्रतचे संस्थानचे वहिवाटदार ह्यांचेपूर्वीं त्यांचे गुरु महंत रामचंद्रगिरी ह्यांचे कारकीर्दींत ह्या संस्थानची स्थिति अत्यंत शोचनीय होती. "ज्याच्या हातीं ससा तोच पारधी" ह्याप्रमाणें सगळ्याच लोकांच्या हातीं कारभार; मग काय? जहागीरदार महंतसाहेब भिवंडीस किंवा कोठें वज्रेश्वरीच्या बाहेर निघाले कीं, पुढें शिंग वाजायाचें, दोन स्वार गाडीमागें घोड्यावर बसून दवडत चालायाचे; ह्याशिवाय गडीमाणसें वगैरे मोठ्या लवाजम्यासुद्धां जाऊन जेथें तळ पडेल तेथें "उधाराचें पोतें सवाहात रितें" उचापत उधार ह्यांशीं गांठ! अशा योगानें संस्थानावर पुष्कळ कर्ज होऊन सावकारांचीं आर्जवें करण्याचा प्रसंग येत असे. वास्तवीक विचारदृष्टचा पाहिलें तर, ज्या संस्थानिकांस ह्याप्रकारें कर्जानें वेढिलें त्यांनीं डामडौलास फांटा देऊन कोणातरी इमानी मनुष्याकडे संस्थानाची

वहिवाट देऊन अनृणी स्थिति येईपर्यंत स्वस्थ कोठेंतरी जाऊन बसावें, सावकारांची व्यवस्था लावावी; पण आह्मी जहागीरदार ह्या अभिमानानें ते ग्रस्त झाल्यामुळें "बुडत्याचे खोल पाय" ह्याप्रमाणें दिवसेंदिवस ते कर्जाच्या पेंचांत येतात. मग काय? कर्ज अति झाल्यावर "अतिखरूज त्यास खाज नाहीं, व अतिकर्ज त्याला लाज नाहीं" अशी त्यांची स्थिति होते. शिवाय "कर्जाच्या पाठीवरी, बसते असत्याची स्वारी." ह्याप्रमाणें असले अविचारी जहागीरदार स्वतां आपण तर बुडतातच, परंतु शिवाय आपल्या पुत्रपौत्रांपावेतों दैन्य भोगण्यास लावितात. ह्याकरितां अशा जहागीरदार, संस्थानिक, किंवा इतर उत्पन्नदार सज्जनांस, विनंति करितों कीं, हें कर्ज गळ्यापर्यंत आल्यास सावकारांचे हप्ते करून किंवा व्याज खुंटवून सवाई करून आपल्या उत्पन्नाचा भाग कांहीं व्यवस्थेनें नियमित दर वर्षास देऊन आपण स्वतां कर्ज फिटेपर्यंत साध्या स्थितींत राहिल्यास कर्जाची बाधा होणार नाहीं. नाहींपेक्षां हें कर्जरूप खरें विष प्राशन करून वंशाचें निर्मूल करण्यास आपल्या हातानें विषाच्या वाट्या पुत्रांकरितां अथवा नातवांकरितां भरून ठेवणें चांगलें नाहीं. एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे कीं,

"न विषं विषमित्याहुर्ब्रह्मस्वं विषमुच्यते ॥
विषमेकाकिनं हंति ब्रह्मस्वं पुत्रपौत्रिकम् ॥ १ ॥

मी विषास विष ह्मणत नाहीं, तें साधारणपणें एका माणसास (जो सेवील त्यास) मारितें, पण हें कर्जरूप विष स्वतांस, पुत्रांस, नातवांस ठार करितें.



ह्या कर्जाच्या चपेट्यांत वज्रेश्वरीसंस्थान सांपडून उत्पन्नाच्या चौपट कर्ज झालें होतें. ह्याचप्रमाणें कांहीं कांहीं खमंग कर्जबाजारी पहाण्यांत येतात कीं, त्यांना वार्षिक उत्पन्नाच्या वीसपट कर्ज असूनही स्वतः चैनबाजींत राजी आहेत. अशा लोकांस जर कोणी उपदेश करण्यास गेला तर तो उपदेशक मूर्ख ठरतो. असो! आपल्या देशामागें जर दैन्य हात धुवून लागलें आहे तर आपली उच्चस्थिति यावी कशी?

ह्या वज्रेश्वरीसंस्थानची स्थिति लिहीत असतां इतर उत्पन्नदार कर्जबाजाऱ्यांकडे वळलों, ह्याबद्दल क्षमाशील वाचक मजवर कृपा करतील अशी आशा करितों.

वज्रेश्वरीसंस्थानास कर्ज झाल्यामुळें व अव्यवस्थेमुळें फारच दैन्यस्थिति प्राप्त झाली, ती इतकी कीं, श्रीस नैवेद्यास शेरभर साखर पाहिजे तर वाण्याचें घर! ह्यापासून मग वरच्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास लागलेल्या सर्व पदार्थांकरितां सावकारांच्या घरांवांचून गत्यंतरच नव्हतें. अशा स्थितींत हे रामचंद्रगिरीबोवा असून त्यांना संतती नव्हती. ह्यामुळें आपल्यापुढें ह्या संस्थानची स्थिति कशी होईल ह्याचा विचार त्यांच्या मनांत घोळत असे. हा विचार त्यांनीं नासिक एथील तपोनिधि कैलासवासी जोगिंद्रगिरी भवानगिरीबोवा यांस कळविला. जोगिंद्रबोवांची

भगिनी कै० अंबाबाई ह्या रामचंद्रगिरीबावांचें कुटुंब होत्या. ह्या त्रिवर्गांचा विचार ठरून रामचंद्रगिरिबावांनीं माझ्यामागें ह्या संस्थानचे व्यवस्थापक जोगिंद्रबावांचे चिरंजीव बळिरामगिरी हे व्हावे, असें लिहून ठेवून ते शके १७९४ सालीं समाधिस्थ झाले. पुढें ह्याप्रमाणें व्यवस्था होऊन ह्या संस्थानास नवीन वहिवाट बळिरामगिरी हे अज्ञान असल्याकारणानें त्यांचे जनक तीर्थरूप जोगींद्रगिरिबावा पाहूं लागले. तोंपर्यंत ह्या संस्थानच्या मालकिणी कै० अंबाबाई ह्यांचें, नवीन आपले भाचे व हल्लीं झालेले वहिवाटदार बळिरामगिरी ह्यांच्यावर, प्रेम असून शुद्धमन होतें.

वज्रेश्वरीचे हल्लींचे वहिवाटदार तपोनिधि **बळिरामगिरी रामचंद्रगिरी** यांचें संक्षिप्त चरित्र आणि **संस्थानची सांप्रतची स्थिति**—बळिरामगिरी ह्यांचे तीर्थरूप जोगिंद्रगिरीबोवा नासिक एथील राहणारे होते. त्यांचें कापडाचें दुकान असून हे बोवा संसारदक्ष व मोठे व्यापारी होते. रहाणी साधी, संसारव्यवस्था चोख, व्यापार बेताचा, असा होता. जोगिंद्रबोवांचें कुटुंब मुनियाबाई ह्या प्रसिद्ध आनंदगीरबावा आनंदवल्लीचे इनामदार ह्यांची कन्या असून ह्या आनंदगीरबावांस पेशवाईंतील वंशपरंपरेचें पेनूशन एक हजार रुपये इंग्लिश सरकार देत असत. त्यांचे कन्येबरोबर जोगिंद्रबावांचे लग्न होऊन श्वशुरांनीं ह्या जामातांस आंदणदेणगी वगैरे पुष्कळ दिली. ह्या मु



नीयाबाईच्या पोटीं बळिरामगिरी ह्यांचा जन्म शके १७८४ भाद्रपद वद्य १२ रोजीं नासिकपंचवटींत झाला. ह्यांचा बालाभ्यास नासिकपंचवटींत कै० सितारामपंत दंडनाईक मास्तर ह्यांच्या शाळेंत झाला. बळिरामगिरी ह्यांस आह्मी लहानपणापासून पाहतों. ते फार चपलबुद्धीचे व हुशार विद्यार्थी होते. त्यांवर त्यांचे जनक तीर्थरूप जोगिंद्रगीर ह्यांची सुशिक्षा असल्यानें हे दहावे वर्षांपासून जमाखर्च, खर्डा वगैरे लिहूं लागले. चांगल्या मुलांची संगती, आईबापांची उत्तम शिकवणूक आणि व्यापारी वळण, ह्या गोष्टींचें बाळकडू बळिरामगिरी ह्यांस लहानपणापासून मिळाल्यामुळें सांप्रत ते उन्नतावस्थेप्रत पोंहोंचले आहेत. बळिरामगिरी ह्यांना थोडें इंग्लिश शिक्षण मिळालें, परंतु पुढें ते दत्तकसंबंधानें वज्रेश्वरीस गेल्यानें तें शिक्षण अर्धकच्चें राहिलें. रामचंद्रगिरीबावांनीं मरणाच्या पूर्वीं ठाण्याचे कलेक्टरसाहेबांस यादी लिहिली कीं, माझ्या पश्चात् ह्या वज्रेश्वरीसंस्थानाची वहिवाट बळिरामगिरी यांनीं करावी. ह्या त्यांच्या पत्रानें बळिरामगिरी हे वज्रेश्वरीसंस्थानांत सन १८७२ सालीं गेले. तेव्हां त्यांचें वय १० वर्षांचें होतें. संस्थानांत जसे हे गेले तसे ह्यांची आत अंबाबाई (ह्या संबंधांत ह्यांची आई) ती ह्यांच्याशीं वाईट बुद्धीनें वागूं लागली. वाईट वाईट माणसांच्या सल्ल्यानें नानाप्रकारचीं कुलंगडीं उत्पन्न करून, बळिरामगीर माझा दत्तक नाहीं, यास्तव त्याला वहिवाटदार करूं नये, वगैरे भान-

गडी तिनें कोर्टापर्यंत नेल्या. पण कै० रामचंद्रगिरी ह्यांचें पत्र कलेक्टरास गेलेलें तें जेव्हां कोर्टांत आलें तेव्हां अंबाबाईचे वेदमंत्र सरले. ह्या सर्व कामांत बळिरामगिरी ह्यांच्या साह्यास त्यांचे जनक जोगिंद्रगीरबोवा होते. ह्या जोगिंद्रबोवांनीं बळिरामगिरी ह्यांस नासिक एथें ठेवून ह्यांच्या अभ्यासक्रमांत व्यत्यय न येऊं देतां आपल्या दुकानावर माधवराव नांवाचे कारकून ठेवून अंबाबाईच्या भांडणाकरितां भिवंडी, ठाणें, मुंबईपावेतों सर्व कोर्टांत दावा जिंकून बाईस हयातीपावेतों अन्नवस्त्र देण्याचा ठराव करून बळिरामगिरी ह्यांस सन १८८० सालीं वज्रेश्वरीसंस्थानचा अधिकार मिळाला. ह्या वादाच्या परिणामामुळें श्रीवज्रेश्वरीस नेसावयास पांढऱ्या पातळाची पंचाईत! मग नाकांतल्या नथेविषयीं गोष्ट कशाला पाहिजे! मठांत झाडावयाच्या कुंचाची अडचण, मग पाणी पिण्यास तांब्या व भोजनास ताट कोठून आणावें? बसावयास शिंदीच्या फडांची चटई मिळण्याची मारामार! मग सत्रंजीगादीची गोष्ट तर दूरच! अस्ताव्यस्त स्थितींत फक्त काय ती मठाची इमारत व श्रीजगदंबेचें संस्थान ह्या आमच्या बळिरामगिरीबोवांच्या स्वाधीन केलें! कर्जाचा बोजा पाटीभर डोकीवर ठेवून अंबाबाई परलोकवासी झाल्या.

वज्रेश्वरीसंस्थान ताब्यांत आल्यावर जोगिंद्रगिरीबोवांनीं अश्रांत परिश्रमानें बळिरामगिरीबोवांच्या क-



र्जाची कमी करण्याची तजवीज केली. जहागीरदारीस समयानुसार रजा देऊन साधा बेत ठेविला. गाडी, घोडें, गाई, ह्मशी, जशी जशी वेळ येईल तशा तशा प्रसंगास घेऊन संस्थानचें कर्ज निवारण केलें. संस्थानच्या ६ गांवांतील जंगल तोडवून एकदम पुष्कळ रक्कम हातांत राहील अशी तजवीज ठेविली. अशी पुत्रवात्सल्यानें मेहनत करून जोगिंद्रगिरीबावांनीं शके १८०७ ह्या सालीं श्रीवज्रेश्वरीसन्निध देह ठेविला. ह्यांच्या श्रमानें वज्रेश्वरीचें संस्थान चांगल्या स्थितींत आलें.

हल्लीं ह्या संस्थानची स्थिति फारच उत्तम आहे. श्रीदेवीस त्रिकालपूजा, नैवेद्य, धूप, दीप इत्यादि राजोपचार नियमित होऊन चार नंदादीप सर्वकाळ असतात. संस्थानाच्या सोईकरितां वेगळी कचेरी, बैठकीची जागा, कोठी, देवडी इत्यादि नवीन इमारती तपोनिधि बळिरामगिरींनीं करून उत्तम व्यवस्था ठेविली आहे. संस्थानच्या व्यवस्थेसाठीं १ दिवाण, १ कारकून, १ मदतनीस, ३ शिपाई, १ पुजारी गोसावी, १ मराठा, इतर गडीमाणसें ह्याप्रमाणें आहेत. श्रीवज्रेश्वरीस चिंचपेटी, मोत्यांचें पेंडें आणि पुतळयांच्या माळा ह्या श्रीमंत गायकवाडसरकारनीं दिल्या आहेत. ह्या संस्थानिकांनीं खऱ्या मोत्यांच्या नथा तिन्ही मूर्तींस केल्या आहेत. शिवाय लहान लहान दागिणे, लुगडीं, पातळें, पैठण्या, पूजेचीं चांदीचीं भांडीं इत्यादि सामान उत्तम व्यवस्थेनें ठेविलें असून श्रीच्या

गडी तिनें कोर्टापर्यंत नेल्या. पण कै० रामचंद्रगिरी ह्यांचें पत्र कलेक्टरास गेलेलें तें जेव्हां कोर्टांत आलें तेव्हां अंबाबाईचे वेदमंत्र सरले. ह्या सर्व कामांत बळिरामगिरी ह्यांच्या साह्यास त्यांचे जनक जोगिंद्रगीरबोवा होते. ह्या जोगिंद्रबोवांनीं बळिरामगिरी ह्यांस नासिक एथें ठेवून ह्यांच्या अभ्यासक्रमांत व्यत्यय न येऊं देतां आपल्या दुकानावर माधवराव नांवाचे कारकून ठेवून अंबाबाईच्या भांडणाकरितां भिवंडी, ठाणें, मुंबईपावेतों सर्व कोर्टांत दावा जिंकून बाईस हयातीपावेतों अन्नवस्त्र देण्याचा ठराव करून बळिरामगिरी ह्यांस सन १८८० सालीं वज्रेश्वरीसंस्थानचा अधिकार मिळाला. ह्या वादाच्या परिणामामुळें श्रीवज्रेश्वरीस नेसावयास पांढऱ्या पातळाची पंचाईत! मग नाकांतल्या नथेविषयीं गोष्ट कशाला पाहिजे! मठांत झाडावयाच्या कुंचाची अडचण, मग पाणी पिण्यास तांब्या व भोजनास ताट कोठून आणावें? बसावयास शिंदीच्या फडांची चटई मिळण्याची मारामार! मग सत्रंजीगादीची गोष्ट तर दूरच! अस्ताव्यस्त स्थितींत फक्त काय ती मठाची इमारत व श्रीजगदंबेचें संस्थान ह्या आमच्या बळिरामगिरीबोवांच्या स्वाधीन केलें! कर्जाचा बोजा पाटीभर डोकीवर ठेवून अंबाबाई परलोकवासी झाल्या.

वज्रेश्वरीसंस्थान ताब्यांत आल्यावर जोगिंद्रगिरीबोवांनीं अश्रांत परिश्रमानें बळिरामगिरीबोवांच्या क-



र्जाची कमी करण्याची तजवीज केली. जहागीरदारीस समयानुसार रजा देऊन साधा बेत ठेविला. गाडी, घोडें, गाई, ह्मशी, जशी जशी वेळ येईल तशा तशा प्रसंगास घेऊन संस्थानचें कर्ज निवारण केलें. संस्थानच्या ६ गांवांतील जंगल तोडवून एकदम पुष्कळ रक्कम हातांत राहील अशी तजवीज ठेविली. अशी पुत्रवात्सल्यानें मेहनत करून जोगिंद्रगिरीबावांनीं शके १८०७ ह्या सालीं श्रीवज्रेश्वरीसन्निध देह ठेविला. ह्यांच्या श्रमानें वज्रेश्वरीचें संस्थान चांगल्या स्थितींत आलें.

हल्लीं ह्या संस्थानची स्थिति फारच उत्तम आहे. श्रीदेवीस त्रिकालपूजा, नैवेद्य, धूप, दीप इत्यादि राजोपचार नियमित होऊन चार नंदादीप सर्वकाळ असतात. संस्थानाच्या सोईकरितां वेगळी कचेरी, बैठकीची जागा, कोठी, देवडी इत्यादि नवीन इमारती तपोनिधि बळिराम-[illegible]ांनीं करून उत्तम व्यवस्था ठेविली आहे. संस्थानच्या [illegible]स्थेसाठीं १ दिवाण, १ कारकून, १ मदतनीस, ३ शि-[illegible], १ पुजारी गोसावी, १ मराठा, इतर गडीमाणसें ह्या-[illegible]णें आहेत. श्रीवज्रेश्वरीस चिंचपेटी, मोत्यांचें पेंडें [illegible]णि पुतळयांच्या माळा ह्या श्रीमंत गायकवाडसरका[illegible]ीं दिल्या आहेत. ह्या संस्थानिकांनीं खऱ्या मोत्यांच्या [illegible]नथा तिन्ही मूर्तींस केल्या आहेत. शिवाय लहान लहान [illegible]गिणे, लुगडीं, पातळें, पैठण्या, पूजेचीं चांदीचीं भांडीं [illegible]ादि सामान उत्तम व्यवस्थेनें ठेविलें असून श्रीच्या

मूर्तीस मुगुट करण्याकरितां सिद्धता आहे. ह्या कामाक-
रितां नासिक एथील कुशल स्वर्णकार रा० रामचंद्र रा-
वजी शेट यांस मूर्तिदर्शनार्थ मुद्दाम वज्रेश्वरीस एक म-
हिन्यापूर्वी नेलें होतें.

संस्थानाकडे हल्लीं इतके नौकरलोक असून शिवाय
आप्तमंडळी, जातीची मंडळी, ह्यांचा जमाव पुष्कळ
आहे. बळिरामगिरी ह्यांचे पूर्वघरचे बंधु विठ्ठलगिरि
जोगिंद्रगिरी हे ह्यांच्याजवळ असून बंधुप्रेम तिळभर कम
झालेलें नाहीं. हे गृहस्थ २७ वर्षांचे आहेत. चांगले बोल-
आहेत. समयोचितपणा चांगला दिसला. मीं त्यांना वि-
चारलें, नाना, ह्या आपल्या वज्रेश्वरीस परीट नाहीं काय
तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें " धोबी बैठे क्या करेंगा दीग-
बरके गांव " ह्या त्यांच्या प्रसंगोचित बोलण्याचें मल
कौतुक वाटलें.

वज्रेश्वरीसंस्थानाकडे आल्या अतीतास, बैराग्यास,
पांथस्थास, फकिरास सदावर्त चालू आहे. कोणीही येवो
त्यास गुजाऱ्यापुरती खिचडी प्रत्यहीं मिळते.

वज्रेश्वरीची अर्चा शके १८०९ सालीं बळिरामब-
वांनीं नासिक येथून वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणमंडळी
ऊन यथाशास्त्र केली. ह्या अर्चेस कमींत कमी पांच
जार रुपये लावून श्रीदेवी संतुष्ट केली.

वज्रेश्वरीसंस्थानांत हल्लीं गाई, म्हशी, घोडे, बैल, गाड्या
वगैरेचा बिलकुल कमीपणा नसून व्यवस्था चांगली



सून संस्थानिक निगर्वी, साधे, सद्व्यसनी, लिहिणारे, वाच-
नेच्छु असे आहेत. सहा वर्तमानपत्रें, तीन मासिक पुस्तकें
हे घेतात. पण वर्तमानपत्रें, नुसतीं नांवास घेऊन घरांत
पुड्या बांधण्यांत ते कागद देणारे नाहींत; तर पत्रें आलीं
कीं तीं वाचून नंतर फैलीस लावून संग्रहीं ठेवणारे आहेत.

वज्रेश्वरीचे मुख्य संस्थानिक हे फड्यां कारकुनासारखे
मराठी लिहिणारे असून हिशेबी कामांतही फारच हुशार
आहेत. आल्यागेल्यांचा सत्कार करणें, योग्य तजवीज
ठेवणें, गोड बोलणें, योग्य मनुष्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें
मदत करणें, हें त्यांच्या आंगवळणीं पडलें आहे. ह्यांना
ह्या सर्व कामांत त्यांचे कनिष्ठ बंधु विठ्ठलगिरी ह्यांची म-
दत विशेष असते. ऐन तारुण्याचा भर असून जो पुरुष
रंडीबाजीपासून दूर रहातो तोच खरा महंत व तोच खरा
गोसावी. ह्याप्रमाणें बळिरामगिरींची वागणूक ह्या विषया-
पासून दूर रहाण्याची मला दिसली. अशीच वागणूक ह्या
रंडीब्रांडीपासून राहिल्यास संसारांत चांगलें ह्मणवून घे-
ण्याची वेगळी शिफारस नको आहे. हीं दोन व्यसनें
ज्यांच्या आंगांत पूर्णपणानें वास करितात, ते नरपशु प्र-
संगीं काय काय न करतील बरें ? एक ब्रांडी किंवा
दुसऱ्या प्रकारची दारू कोणीही मनुष्य पिऊं लागला कीं,
तो त्या दारूच्या योगानें पंचमहापातक्यांतील अग्रगण्य
होतो. मग काय ! जाति नाहीं ! धर्म नाहीं ! कर्म नाहीं !
कोणाच्याही हातचें तो खाईल, कोठेंही तो जाईल, व

घाटेल तें करण्यास तो प्रवर्तक होईल. ह्यास्तव अशा
व्यसनांतून आमचे बळिरामबावा दूर आहेत, हें फा
चांगलें आहे. ह्यांची रहाणी साधारण आहे. डामडौल
किंवा गाडीपुढें शिंग वाजविणें, स्वारांचे घोडे गाडीमागें
दौडविणें, हें त्यांना अगदीं खपत नाहीं. निगर्वीपणानें ह
वज्रेश्वरीची सेवा करून संस्थानची वहिवाट उत्तम प्रक
रची ठेविली आहे. ह्यामुळें आह्मांस मोठें भूषण व फ
आनंद वाटत आहे.

**वज्रेश्वरीची यात्रा**—शारदीय नवरात्र व वासंति
नवरात्र ह्या प्रत्येक नवरात्रांत वज्रेश्वरीची यात्रा भर
परंतु मोठी यात्रा प्रत्येक वर्षीं चैत्र वद्य ११ पासून वैशा
शुद्ध प्रतिपदेपर्यंत असते. ह्या पांच दिवसांत हजारों यात्
जमते. ही पांचच दिवस राहते असें नाहीं, पर्जन्यकाळा
आरंभ होईपर्यंत ही यात्रा असते. त्यांत पांच दिवस य
त्रेचा मोठा भर असतो. ह्या यात्रेंत व्यापाऱ्यांचीं दुक
अजमासें चारशेंपावेतों येतात. तशाच गाड्या, छक
तांगे इत्यादि वाहनें ५००० पावेतों जमतात. मनुष्
संख्या अजमासें तीस चाळीस हजारपावेतों होते. पा
प्यावयास ९ विहिरी व तलाव असून स्नानाकरि
तर ईश्वरानें आयतीच उष्णोदकाची सोय करून ठेवि
आहे. तें उष्णोदक कधीं संपावयाचें नाहीं व को
त्याही ऋतूंत कधींही थंड व्हावयाचें नाहीं. अ
जगद्वंद्य परमेश्वरानेंच योजना करून ठेविली अ



यात्रेंत दररोज देवीस राजोपचारपूजा होऊन दर्शनाची
अतोनात गर्दी जमते. ती गर्दी इतकी कीं, बंदोबस्ताक-
रितां दरवर्षीं पोलिसचे लोक पन्नास येत असतात. ह्या
लोकांची व इतर गुणी लोकांची जेवणाची व्यवस्था
वज्रेश्वरी संस्थानांतून होत असते. ह्या यात्रेंत शेंकडों
लोकांचे नवस वगैरे असतात. पूर्वीं बगाड (गळ) टोंचून
घेणें हे कडक नवस होते. ते हल्लीं कायद्यानें बंद केले आ-
हेत. यात्रेंत दररोज रोषनाई देवीच्या देवालयांत आणि स-
मोर होऊन दारूकामही पाहाण्यासारखें सुटतें. छडीपट्टेवाले,
आखाडेवाले, तमाशेवाले, गाणारणी, भजनी मेळे, आराधी,
व आराधिणी ह्यांच्या झुंडी, मस्तवान पहिलवानांच्या
कुस्त्या हे सर्व प्रकार रात्रंदिवस चालून प्रेक्षकांस ज्याची
ज्याविषयीं प्रीति, त्याला त्या त्या प्रकारांत तोष होऊन
मोठी करमणूक होते. उष्णोदकाच्या कुंडांकडे ब्राह्मणांचे
संकल्प, गोसाव्यांचे आशीर्वाद ह्यांची गर्दी होऊन जाते.
उजाडल्याबरोबर पाउड आलारे आला! दान आलेंरे
दान आलें! ह्यांचे सूर, वासुदेवाच्या टाळांचा खणखणाट,
देवीसमोरच्या चौघड्याचा दणदणाट, ह्यांच्या योगानें
हा सर्व प्रदेश मोठा दुमदुमून जातो. देवीच्या देवाल-
तांत जुन्या आर्त्या व भजन ह्यांचा थाट पाहून नास्तिक
द्धां मान डोलवील अशी भावना होते. मग सज्जनाची
ष्ट कशाला! देवी वज्रेश्वरी, रेणुका आणि कालिका
ा तिन्ही रमणीय मूर्ति पाहिल्याबरोबर जशा आपणास

घाटेल तें करण्यास तो प्रवर्तक होईल. ह्यास्तव अशा व्यसनांतून आमचे बळिरामबावा दूर आहेत, हें फार चांगलें आहे. ह्यांची रहाणी साधारण आहे. डामडौल किंवा गाडीपुढें शिंग वाजविणें, स्वारांचे घोडे गाडीमागें दौडविणें, हें त्यांना अगदीं खपत नाहीं. निगर्वीपणानें ह्या वज्रेश्वरीची सेवा करून संस्थानची वहिवाट उत्तम प्रका- रची ठेविली आहे. ह्यामुळें आह्मांस मोठें भूषण व फार आनंद वाटत आहे.

**वज्रेश्वरीची यात्रा**—शारदीय नवरात्र व वासंतिक नवरात्र ह्या प्रत्येक नवरात्रांत वज्रेश्वरीची यात्रा भरते. परंतु मोठी यात्रा प्रत्येक वर्षी चैत्र वद्य ११ पासून वैशाख शुद्ध प्रतिपदेपर्यंत असते. ह्या पांच दिवसांत हजारों यात्रा जमते. ही पांचच दिवस राहते असें नाहीं, पर्जन्यकाळाचा आरंभ होईपर्यंत ही यात्रा असते. त्यांत पांच दिवस या- त्रेचा मोठा भर असतो. ह्या यात्रेंत व्यापाऱ्यांचीं दुकानें अजमासें चारशेंपावेतों येतात. तशाच गाड्या, छकडे, तांगे इत्यादि वाहनें ५००० पावेतों जमतात. मनुष्य- संख्या अजमासें तीस चाळीस हजारपावेतों होते. पा- ण्यावयास ९ विहिरी व तलाव असून स्नानाकरितां तर ईश्वरानें आयतीच उष्णोदकाची सोय करून ठेविली आहे. तें उष्णोदक कधीं संपावयाचें नाहीं व कोणत्याही ऋतूंत कधींही थंड व्हावयाचें नाहीं. अ... जगद्वंद्य परमेश्वरानेंच योजना करून ठेविली अ...



यात्रेंत दररोज देवीस राजोपचारपूजा होऊन दर्शनाची अतोनात गर्दी जमते. ती गर्दी इतकी कीं, बंदोबस्ताक- रितां दरवर्षी पोलिसचे लोक पन्नास येत असतात. ह्या लोकांची व इतर गुणी लोकांची जेवणाची व्यवस्था वज्रेश्वरी संस्थानांतून होत असते. ह्या यात्रेंत शेंकडों लोकांचे नवस वगैरे असतात. पूर्वी बगाड (गळ) टोंचून घेणें हे कडक नवस होते. ते हल्लीं कायद्यानें बंद केले आ- हेत. यात्रेंत दररोज रोषनाई देवीच्या देवालयांत आणि स- मोर होऊन दारूकामही पाहाण्यासारखें सुटतें. छडीपट्टेवाले, आखाडेवाले, तमाशेवाले, गाणारणी, भजनी मेळे, आराधी, व आराधिणी ह्यांच्या झुंडी, मस्तवान पहिलवानांच्या कुस्त्या हे सर्व प्रकार रात्रंदिवस चालून प्रेक्षकांस ज्याची ज्याविषयीं प्रीति, त्याला त्या त्या प्रकारांत तोष होऊन मोठी करमणूक होते. उष्णोदकाच्या कुंडांकडे ब्राह्मणांचे संकल्प, गोसाव्यांचे आशीर्वाद ह्यांची गर्दी होऊन जाते. उजाडल्याबरोबर पाउड आलारे आला! दान आलेंरे दान आलें! ह्यांचे सूर, वासुदेवाच्या टाळांचा खणखणाट, देवीसमोरच्या चौघड्याचा दणदणाट, ह्यांच्या योगानें ह्या सर्व प्रदेश मोठा दुमदुमून जातो. देवीच्या देवाल- यांत जुन्या आर्त्या व भजन ह्यांचा थाट पाहून नास्तिक सुद्धां मान डोलवील अशी भावना होते. मग सज्जनाची गोष्ट कशाला! देवी वज्रेश्वरी, रेणुका आणि कालिका ह्या तिन्ही रमणीय मूर्ति पाहिल्याबरोबर जशा आपणास

कांहीं विचारतील अशी भावना होते. यात्रेंत उत्पन्न जे
होतें तें यात्रेच्या आलेल्या मंडळीच्या खर्चाकडेसच ब
हुधा जातें. यात्रस्थांत संभावित लोकांस उतरण्यासाठीं
कैलासवासी जगन्नाथ शंकरशेट ऊर्फ नानासाहेब ह्या
मुंबापुरस्थ गृहस्थांनीं दोनमजली धर्मशाळा बांधिली आहे,
ती अद्याप दुरुस्त आहे. हिच्याच समोर उत्तरेस दुसरी
एक धर्मशाळा रखमाबाई पाताणे प्रभु ह्या परोपकारी
बाईनें बांधिली आहे. अशीं कामें करणारे लोक ह्यांचे देह
जातात, परंतु परोपकारार्थ केलेलीं कृत्यें ह्यांच्या योगानें
ते लोक जोंपर्यंत त्यांचीं कृत्यें कायम तोंपर्यंत ते लोक
जीवमान आहेत, असें सर्व लोक ह्मणतात. ह्यासाठीं
थोर लोकांनीं निपुत्रिकांस आठ पुत्र दिले आहेत तेः—

" तटाकं धननिक्षेपं लोकस्थाप्यं शिवालयं ॥
आरामक्रतुकूपाश्च संतानाष्टं प्रकीर्तितः ॥ १ ॥"

पहा बरें, कैलासवासी श्रीमंत अहल्याबाई होळकर
ह्यांचे कितीतरी पुत्र बदरिकाश्रमापासून सेतुबंधरामे-
श्वरापर्यंत जीवमान आहेत! सवाशें वर्षे झालीं, परंतु
अहल्याबाई ह्या आबालवृद्धांपर्यंत सर्व आर्यवासी जनांस
ठाऊक आहेत; ह्याचें मुख्य कारण निरपेक्ष धर्मवासना
ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं!

चैत्र वद्य एकादशीपासून यात्रा भरून वद्य ३० रोजीं
अतिशय दाटी होते. वैशाख शुद्ध १ रोजीं श्रीदेवीची पा-
लखी मिरवून तें दर्शन घेऊन मग यात्रेंतील लोक गांव



गांव जाण्यास तयार होतात. मात्र जे व्यापारी व पदार्थ
वगैरे विकण्यास आलेले, व ते पदार्थ घेणारे ह्यांचा क्रम
पर्जन्य पडेपर्यंत चाललेला असतो.

यात्रेंत हजारों लोक येऊन त्या समयीं हें सर्व क्षेत्र
मनुष्यमय होऊन जातें. हलवाई, वाणी, सराफ, बोहरी,
फळफळावळवाले, भाजी विकणारे, माळी, तेली, तांबोळी,
सोनार, शिंपी, गुजराथी, पटवेकरी, सुतार, लोहार, वि-
ड्या विकणारे, पागोटीं, टोप्या, कुंच्या वगैरे आयतीं स-
नगें तयार करून विकणारे, ओतारी, कातारी, कांसार,
तांबट, वगैरे व्यापारी ह्यांच्या दुकानांच्या रांगा लागून
राहतात. घडशी, वाजंत्री, ताशेमर्फेवाले, शिंगाडे, तुतारे
ह्यांच्या वाद्यांचे कर्णमनोहर स्वर सर्व दिक्प्रांत दणाणवून
सोडतात. वासुदेव, पांगुळ, ढोंगी, धुतारे, गोंधळी,
तुतारे ह्यांच्या समेळ टाळादिकांनीं प्रातःकाळपासून
एकच गर्दी होऊन जाते. यात्रस्थांपाशीं वासुदेवाचें
दान मागणें, जोगिणींचा जोगवा मागणें, ह्यांची सदो-
दित धुमश्चक्री चालते. वासुदेवास पैसा, आणा मि-
ळाल्यावर स्वांगाभोंवतीं गिरक्या मारून पाउडपाव-
ल्याचा पाडा वाचणें इत्यादि चालू असतें. नवस फेडण्यास
आलेले लोक, कोणी निंब नेसून, कोणी मूकव्रतानें, कोणी
दंडवत घालीत, वाद्याच्या गजरानें जगदंबमंदिरांत नवस
फेडण्यास जातात. अशी एकच गर्दी पाहून प्रेक्षकांतःकरण
तल्लीन होऊन जातें. यात्रेंत बहुधा कोंकणच्या प्रजेचा

भरणाच असतो. त्यांच्या त्या पोषाखाची चमत्कृति ह्म-णजे सोळा हात लांबीचें जरी लुगडें स्त्रीवर्ग नेसला तरी जसा पहिलवानानें लंगोट कसावा ह्याप्रमाणें त्या लुग-ड्याची स्थिति होते.

पुरुषांचा पेहराव तर ह्यापेक्षां विलक्षण ! कोंकणचे पाटील लोक ह्मणजे घांटावरचेच मराठे; परंतु शें दोनशें वर्षांच्या सुमारास उदरपोषणनिमित्यें कोंकणची वस्ती करून हल्लीं कोंकणचे पाटील बनलेले आहेत. हे पाटील चांगले उत्पन्नदार असतात. त्यांना आपल्या पोषाखाची सुधारणा करितां येणार नाहीं, असें नाहीं. पण देशसं-प्रदाय ! पाटील लोक बहुधा ब्राह्मणी पागोटें घालितात. एक अंगरखा किंवा कोट व कंबरेच्या कडदोऱ्यास संसा-राच्छादनापुरती लंगोटी ! कां, ब्राह्मणी पागोट्याचें कसें मा-तेरें केलें पहा ! ह्यासाठीं ह्या पाटील लोकांनीं ही ब्राह्मणी पागोटीं घालण्याची वाईट चाल सोडून देऊन मराठी चालीचीं पाटीलपागोटीं घालावीं, अशी त्यांस आमची विनंति आहे. असेच कोणी कोणी चैनी मराठे, माळी, वं-जारी, वगैरे ह्या ब्राह्मणी पगड्या वापरतात, तेंही अत्यंत लाजिरवाणें आहे ! ब्राह्मणांसारखी वाणी सुधारा, त्यांच्यासारखी विद्या करा, त्यांचें अनुकरण चांगल्या कामांत करा, पगडीनें ब्राह्मणपणा न येतां "डोमका वळा ज्यानें मोराचीं पिसें अंगास लाविलीं" ह्या इसाप नीतींतील गोष्टीसारखी, ही थडी ना ती थडी, असें व करितां ?



मराठे लोकांशिवाय जे कोंकणी, वारली, कोळी, ठाकूर, कातकरी वगैरे लोक येतात, त्यांची तर गोष्टच बोलाव-यास नको आहे. प्रसंगोपात पुरुषाच्या लंगोटीइतकी चिंधी स्त्रिया नेसतात !!!

**संस्थान वज्रेश्वरीचे प्रथम संपादक**—सुमारें ती-नशें वर्षांपूर्वी देवगिरीबावा नांवाचे तपोनिधि महंत ह्यांनीं हें संस्थान संपादन केलें. हे बावा मोठे कडकडीत वैराग्य-शील असून सत्पुरुष होते. हे ज्याप्रमाणें बोलत त्याप्रमाणें वागत असत; ह्यामुळें ह्यांची मोठी कीर्ति होऊन वज्रेश्वरी-संस्थान त्यांना शके १५०० च्या सुमारास मिळालें. हे बावा आमरणांत ब्रह्मचर्यव्रतानें होते. त्यांच्या पाठीमागें ५ पुरुषांपावेतों ही गादी ब्रह्मचर्य सांभाळूनच होती; पण पुढें ह्या गादीस ब्रह्मचर्यव्रताचा भार असह्य होऊन ह्या गादीवरील पुरुष गृहस्थाश्रमधर्मानें वागूं लागले. हल्लींचे गादीवरील पुरुष हे देवगिरीबावापासून नववे आहेत; ह्मणजे तीनशें वर्षांत नऊ पिढ्या झाल्या. साधा-रण मानानें पंचवीस वर्षांत एक पिढी होते. परंतु ह्या गादीवर पांच पुरुष ब्रह्मचर्यव्रताचे असल्यामुळें त्या पांच पुरुषांनीं २०० वर्षें गादी चालविली; व ह्या १०० व-र्षांत हे चवथे पुरुष सांप्रत तपोनिधि बळिरामगिरी आहेत. ह्याप्रमाणें हें संस्थान तीनशें वर्षें ह्या तपोनिधि गिरीधरा-ण्याच्या ताब्यांत आलें आहे. तीनशें वर्षांपासून हकी-कत कळते; नाहींपेक्षां त्याच्याही पूर्वी हें संस्थान ह्या

तपोनिधींच्या स्वाधीन आहे. आतां हें संस्थान जावत्काल पावेतों ब्रह्मचर्यव्रतानें चालणाऱ्या सत्पुरुषांकडे होतें, तावत्काल एकेक पिढी सुमारें पन्नास वर्षें चालत आली. पण जसें ब्रह्मचर्य लोपून गृहस्थाश्रमी पुरुष ह्या संस्थानावर आले, तसतसें आयुष्यमान कमीच होत गेलें. वास्तविकच आहे, ब्रह्मचर्य हें आयुष्यवर्धनाचें मुख्य साधनच आहे. महाभारतांत पूर्णप्रतापी इच्छामरणी भीष्माचार्य ह्यांचा पराक्रम वाढून प्रसंगीं श्रीकृष्णमहाराजांस हातीं शस्त्र धरण्याचा प्रसंग आणिला. हें ब्रह्मचर्याचेंच फळ आहे. ह्याचप्रमाणें श्रीकार्तिकस्वामी, मारुती, शुकाचार्य, ह्या सत्पुरुषांच्या ब्रह्मचर्याचे पवाडे आमचीं पुराणें गात आहेत. दोनशें वर्षांपूर्वी होऊन गेलेले सत्पुरुष समर्थ श्रीरामदासस्वामी ह्यांच्या ब्रह्मचर्याचा प्रभाव सर्व महाराष्ट्रीय जनांस विदित आहे.

**वज्रेश्वरी संस्थानिकांस विनंति**—आतां ह्यासंबंधानें आह्मांस ह्या वज्रेश्वरीच्या संस्थानिकांस एक विनंति करावयाची आहे ती अशी कीं, जर श्रीवज्रेश्वरीच्या कृपेनें ह्या संस्थानिकांस औरसपुत्र झाले तर त्यांत जो निःसीम ब्रह्मचर्यानें राहील, त्यानें ह्या संस्थानची "महंताई" करावी, व त्याजकडून तसें वर्तन न झालें तर असें वर्तन ठेवणाऱ्या योग्य शिष्यास महंत नेमावें. अशा प्रकारची वहिवाट झाल्यास श्रीदेवीच्या सेवेवांचून इतर व्याप संस्थानचेमागें लागणार नाहींत. पहा बरें, जेथें



संसारदुःखच नाहीं तेथें ईश्वरी सेवन कसें निर्वेध होतें! नाहींपेक्षां,

"मूर्खांमाजी परम मूर्ख ॥ जो संसारीं मानी सुख ॥
संसारदुःखायेवढें दुःख ॥ आणिक नाहीं ॥ १ ॥"

ह्या समर्थांच्या ओवीप्रमाणें जेथें संसार तेथें सर्व दुःखें पूर्णपणें वसतात. कारण, लाभ, मृत्यु, हानि इत्यादि वारंवार होणारे प्रसंग पाहून हर्ष, शोक, खेदातिशयानें मनुष्याची बुद्धि अस्थिरत्व पावून त्याजकडून परमेशसेवन योग्य होत नाहीं.

ह्यासाठीं हें संस्थान जसें पूर्वीं ब्रह्मचर्य पालन करणारांचे हातीं होतें, तसेंच ह्यापुढें चालण्याची व्यवस्था व्हावी; पण नुसतें ब्रह्मचर्याचें सोंग घेऊन

"किरवाहे एक नीमका चाखत चाहे खांड,
मन तो धरे बेरागमे घरमे रखिये रांड."

ह्या भगवद्भक्तांच्या वाणीप्रमाणें प्रकार झाल्यास अशा ब्रह्मचाऱ्यांपेक्षां सहस्रपट संसारी चांगले! हेंही पण त्यांनीं लक्षांत वागवून योजना करावी, अशी सविनय प्रार्थना आहे.

## वज्रेश्वरीस शके १८२० सालीं केलेलीं नवीन कामें.

मीं हें चरित्र लिहून तें वज्रेश्वरीच्या महंतांस दिलें. परंतु प्लेगच्या त्रासामुळें हें छापण्यांत आजपर्यंत आलें नाहीं. सरासरी एक वर्षांत वहिवाटदार महंतानीं पुष्कळ

कामें केलीं. ह्मणजे तटाची दुरुस्ती केली. हा तट ह्मण
किल्ल्यासारखा मजबूत आहे. हें मीं वर सांगितलेंच आ
परंतु पुष्कळ वर्षांचा असल्यामुळें जागजागीं थोडा न
दुरुस्त झाला होता, तो दुरुस्त केला.

महाद्वारापासून खालीं उतरण्याच्या पायऱ्या ह्या कै०
श्रीमंत नानासाहेब चांदवडकर ह्या धर्मात्म्यांनीं केल
होत्या, त्या जागोजाग अतिवृष्टीनें नादुरुस्त झाल्या
होत्या, त्याही दुरुस्त केल्या. आतां पुनः पायऱ्या आणि
तट हीं दोन्ही कामें नवीन कामासारखीं झालीं.

धर्मबुद्धि आणि परोपकार हीं ज्याच्या मनांत खऱ्या
रीतीनें वास करितात, त्यास ईश्वर खरोखर यश देतो.
ह्या ह्मणण्याची प्रचीति आणखी दोन कामें नवीन केलीं
त्यावरून दिसून येते.

पाणी पिण्याची अडचण जाणून आणखी दोन आड
खणावे, असें बळिरामगिरी ह्यांनीं मनांत आणून ते दोन
आड खणविले. त्यांत भर वैशाख महिन्यांत एका आडास
अठरा फुटांवर ह्मणजे सरासरी बारा हातांवर उत्तम पाणी
लागलें. दुसऱ्यासही त्याचप्रमाणें मुबलक पाणी लागून
पिणाऱ्या लोकांस सुखावह झालें.

माझ्या विनंतीस संस्थानच्या वहिवाटदारांची संमति
मिळाली, असें मला हें पुस्तक छापण्याच्या अगोदर ह्मण
ण्याचा प्रसंग आला, हें मोठें सुदैव आहे, असें मी समजतो
कारण, ही गादी ब्रह्मचाऱ्यानें चालवावी ह्या उद्देशा



वहिवाटदार ह्यांनीं नवीन मठ बांधिला. त्या मठांत महंत मठाधिपति पूजाधिकारी ह्यांनींच अगदीं तुटक रहावें, अशी योजना करून योग्य पुरुष मिळाल्यास त्यास तेथें स्थापावें, असा त्यांचा हेतु दिसतो. तसेंच संस्थानचे वहिवाटदार ह्यांनीं स्वतंत्र राहून मठाधिपतीस कोणताही उपसर्ग न लागावा अशी योजना केली आहे.

वर सांगितलेल्या कामांस दोन तीन हजार रुपये ह्या वर्षीं खर्चून हीं कामें केलीं, हें फार चांगलें झालें. ह्या वर्षीं आणि मागचे वर्षीं प्लेगरोगामुळें वज्रेश्वरीची यात्रा सरकारांनीं भरूं दिली नाहीं; ह्यामुळें सरासरी दोन तीन हजार रुपयांचें नुकसान झालें. तरी व्यवस्थितपणाच्या खर्चानें त्यांतले त्यांत वरचीं कामें झालेलीं पाहून कोणीही वहिवाटदारांची स्तुति करील.

असो, हें पुस्तक श्रीजगदंबेच्या कृपेनें शेवटास गेलें. तिच्या चरणीं अनन्यभावें मस्तक ठेवून आमच्या सर्व देशबांधवांस लीनपणानें प्रणामरूप रामराम करून त्यांची आज्ञा घेऊन पूर्ण करितों.

**पूर्वभाग समाप्त.**

# श्रीवज्रेश्वरीचरित्र.

## उत्तरभाग.

### भाग पहिला—कैलासवर्णन.

श्रीभारद्वाजऋषि एके समयीं तीर्थाटण करीत अ-सतां त्यांची व श्रीवेदव्यासांची गांठ पडली. व्यासांस भारद्वाज ह्मणाले कीं, मीं पूर्वीं अनेकविध तीर्थें पाहिलीं. द्वादश ज्योतिर्लिंगांची पूजा केली; अयोध्या, काञ्ची, म-थुरा, माया, वाराणशी, द्वारकादि सप्तपुऱ्या पाहिल्या. सर्व सिद्धक्षेत्रें जितकीं ह्या पृथ्वीतलावर आहेत तितकीं पाहून त्या त्या क्षेत्रांत त्यांच्या महात्म्यानुरूप दानें केलीं; कृष्णा, वैतरणी, गंगा, यमुना, सरस्वती, कावेरी, नर्मदा मही इत्यादि नद्यांचीं स्नानें करून त्यांच्या कांठीं वास केला; इष्टहेत्वर्थ विविध यज्ञ, व्रतें इत्यादिकांचें सेवन केलें; अनेक पुराणें ऐकिलीं; नित्यशः इतिहासांचें श्रवण केलें; श्रीकेदारास जाऊन गंगोत्रीचें जलपान केलें; सप्त गोदावरी प्रांतांत जाऊन समुद्रसंगमाच्या ठिकाणीं स्नान केलें; अनेकविध शास्त्रांचें पठण केलें; बहुविध मंत्रतंत्र दिकांचें साधन केलें; परंतु माझें अंतःकरण ह्या सर्व त्यांनीं अद्यापि समाधान पावलें नाहीं. ह्यास्तव आपल मुखानें श्रीवज्रेश्वरीदेवीचें माहात्म्य श्रवण करावें मी इच्छितों. कारण जी आदिशक्ति, महामाया, विश्व



व्यापिनी ह्या भूतलावर अवतीर्ण होऊन तिनें कलिकाल, वज्रासुरनामक दैत्यांचें हनन करून, महातपोधन ऋषि व देव ह्यांना आश्वासन देऊन त्यांचें संरक्षण केलें; ह्मणून अशा श्रीजगदंबचरित्राचें श्रवण आपल्या मुखानें व्हावें, ही माझी फार इच्छा आहे; ती आपण पुरविल्यास मजवर आपला प्रसाद होईल. हें श्रीभारद्वाजऋषींचें वचन ऐकून श्रीव्यास ह्मणाले—

पूर्वीं द्वापारयुगाचे शेवटीं उग्रासुरनामक मोठा दारुण योद्धा शस्त्रविद्याविशारद व मोठा तेजस्वी होता. त्याचा एक पुत्र सिंहमार नांवाचा उदार बुद्धीचा होता; त्याचा धाकटा भाऊ जो होता तो मोठा युद्धकलेंत प्रवीण असून संग्रामांत सिंहासारखा तेजस्वी, व आपल्या शत्रूंस मोठा भयप्रद वाटत असे. त्याचें नांव कलिकाल असें होतें. त्याच्या त्रासामुळें सर्व देव दाही दिशांस पळूं लागले. इंद्रानें भयभीत होऊन उत्तरदिशेकडे पळ का-ढिला. अग्नि, यम, निर्ऋति, वायु, वरुण, ईशान, कुबेर इत्यादि देव त्या दैत्याची सेवा करिते झाले. वायु मंद-गतियुक्त वाहूं लागला, चंद्रसूर्य परिमित प्रकाशूं लागले, यमधर्म थरथरां कांपूं लागला, अग्नि हा आपली उष्णता लोपवून शीतता धारण करूं लागला. कुबेरानें दारिद्र्य स्वीकारिलें. त्या कलिकालाच्या त्रासामुळें कोणालाही सुख ह्मणून नव्हतेंच. सर्व तपोधन ऋषि भयकंपित हो-ऊन गिरिगव्हरांत लपून राहिले. योगीजनांनीं योगा-भ्यास सोडून ते वाणिज्यादि व्यापार करूं लागले.

इकडे कलिकालानें मोठमोठ्या यज्ञांचा विध्वंस केल
ह्याप्रमाणें पृथ्वीतलावरील यज्ञविध्वंसनानंतर स्वर्गन
इंद्राच्या यज्ञविध्वंसनास्तव तो कैलासपर्वतावर श्रीशं
प्रसन्न होण्याकरितां तपश्चर्या करण्याकरितां गेला.

भारद्वाजऋषि व्यासांस ह्मणाले, ज्यावर नाना दे
वता वास करितात; अनेक सिद्ध, साधक, मुनी राहतात
असा देवस्वरूपी जो कैलास तो कशा प्रकारचा आहे
हें कृपा करून मला आपण सांगा. हें ऐकून व्यासांनीं
त्या कैलासपर्वताचें वर्णन केलें. तें असें:—व्यास ह्मणाले
कैलासनामक विख्यात पर्वतेश्वर मोठ्या उंच शिखरांनीं
युक्त, नानाप्रकारच्या रत्नमय शृंगांनीं शोभायमान, सुवर्ण
रौप्यमय असा देवरूप धारण करून दिग्मंडळावर शोभ
आहे. त्या पर्वतावर कोठें सोन्याची, कोठें रत्नमय अ
भूमि आहे. नानाप्रकारच्या धातु तेथें असून त्याये
पर्वत फारच शोभा देत आहे.

ज्या कैलासाच्या मध्यभागावर अनेक प्रकारच्या स्फ
टिकांतून नानाविध निर्झरप्रवाह वाहत आहेत; ज्या कै
लासावर साक्षात् श्रीशिव गौरीसहवर्तमान वास करितात
अशा पर्वताची शोभा कितीतरी वर्णावी ? ज्या पर्वता
चहूंकडे वृक्षांची व वेलींची दाटी होऊन गेली आहे.
वंग, लतिका, वसंतऋतूंत फुलणारे मोगरे, जाई, जु
केतकी, चंपक, चंदन, साग, शिसव, हेदी, कुंकुमाग
पीतचंदन, ताड, शिंदी, अर्जुन, बेलांचे वृक्ष, फणस, आं



तमालवृक्ष, निंब, बकुळी, जांभळी, जांब, केळी, कर्दळी, नारळी, सदाफळयुक्त सुपाऱ्या, कोशिंबांचीं झाडें, भूर्जवृक्ष, अनेकविध लिंबें, नारिंगें, देवदार, डाळिंबें, महाळुंगें इत्यादि वृक्षांची निबिड छाया पडून, जणू काय, सर्व कैलासपर्वत हिरवें वस्त्र परिधान करून बसला आहे. असें दिसत असे. ह्याचप्रमाणें त्या पर्वतावर कोकिलां, कलहंस, राजहंस, चक्रवाक, चातक, चकोर इत्यादि पक्षी आपल्या मधुर स्वररूपी वाद्यांनीं प्रेक्षकांचीं अंतःकरणें मोहून घेत होते. तसेच सिंह, व्याघ्र, रानगवे, चितळ, सांबरें, हरणें इत्यादि पशु आपापल्या गुहांतून गर्जना करीत होते. वनवराह व वनगाई ह्या स्वेच्छ फिरून ह्या सर्व पशुसमुदायांत वैरभाव अगदीं दिसत नसे. ह्मणजे हरिणीचें पाडस वाघिणीनें पाजावें, व गाईचें वांसरूं सिंहिणीनें पाजावें, असा क्रम त्या पर्वतावर होता. तेथें सिद्ध, साधक, गण, गंधर्व, यक्ष, किन्नर, निर्मल मनाचे योगी इत्यादि अनेक तपसाधनें करीत.

अशा त्या कैलासपर्वतावर जो महाप्रतापवान्, मोठा बलिष्ठ, अतियोद्धा असा तो कलिकालनामक दैत्य प्राप्त झाला. त्यानें चार कोस लांबीची स्फटिकमय शिला सरोवरांनीं वेष्टिलेली अवलोकन केली. त्याला ती शिला पाहून असें वाटलें कीं, आपणास तपश्चर्या करण्यास हेंच स्थळ योग्य आहे; त्याप्रमाणें तो कलिकालदैत्य त्या शिलातलावर बसून, शंकराच्या ठिकाणीं आपलें लक्ष्य लावून, माझ्यावांचून दुसरा कोणी थोर नाहीं, अशा अ-

भिमानानें देवादिकांचा पराभव करीन, त्यांचे यज्ञ वि
सीन आणि इंद्रास जिंकीन अशा आशेनें तपश्चर्या
ण्यास उद्युक्त झाला. ह्याप्रमाणें वज्रेश्वरीमहात्म्यांत
प्रथम अध्यायांत कथा वर्णिली आहे. ह्यास कैलास
र्णन ह्मणतात.

---

## भाग दुसरा—इंद्रादि देवांचें पलायन.

भारद्वाज श्रीव्यासांस ह्मणाले, त्या कलिकालदैत्यानें कैलासपर्वतावर आपलें मन निश्चल करून, दयानिधि शंकरास कसें वश केलें? शंकरांनीं त्यास कोणते दिले? तें सर्व मला आपण सांगा. हें भारद्वाजऋषि वाक्य ऐकून श्रीव्यास ह्मणाले, ऐकाः—तो कलिकालदै बारा वर्षें उपोषण करून राहिला; साठ वर्षें पायांच्या अं ष्ठांवर उभा राहून, चोवीस वर्षें इंद्रियें स्वाधीन ठेवून त्या दुग्धाहार केला. पुनः साठ वर्षें मौनव्रत धरून, बारा व हातापायांचीं नखें वाढविलीं. सोळा वर्षें शुद्धाचरणा ऊर्ध्वबाहुव्रत केलें. हजार वर्षेपर्यंत एकसारखा शि नामाचा जप केला. असा त्या दैत्याचा तपःप्रभाव झा त्यावर सर्व जग कंपायमान झालें. सर्व हाहाःकार करू पुढें काय होईल हें सांगवत नाहीं असें ह्मणूं लाग त्या वेळीं तो दयाळू सदाशिव प्रत्यक्ष त्या कलिकाल त्याच्या पुढें प्रगट होऊन त्यास ह्मणाला—हे निशाचर वर माग, वर माग. हें शंकराचें वचन ऐकून दैत्यानें डो उघडून शंकराचें मुख अवलोकन केलें; व प्रेमभाव



तमाति करूं लागला. दैत्य ह्मणाला—हे शंभो, हे महारुद्र, रळी चंद्रार्धशेखर, हे गौरीपते, आज माझा जन्म आणि त- कांस्या सफल झाली. कारण तूं सर्व जगतावरील मनुष्यांचा, क्षांवांचा आणि ऋषींचा गतिदाता आहेस. तुझ्याच आ- धीन हें सगळें चराचर आहे. तुझ्या दर्शनानें आज मी कृतार्थ झालों आहें. तूं एखाद्यास थोडें जरी देशील री तें देणें त्यास सर्वकाल सुखप्रदच होईल. आतां जवर जर तूं प्रसन्न झालास तर मला हजार भुजा, याप्रमाणें महान् भयंकर राक्षसांची चतुरंगसेना दे. मला नेक शत्रूंनीं जरी समरभूमींत गांठिलें, व ते शत्रु इं- द्रादिदेव जरी असले, तरी त्यांच्यापासून माझा पराजय व्हावा. ऋषींचा शाप मला न बाधावा. मी सर्व ऋषींचे विध्वंसीन. मला सर्व भुवनांपेक्षां विशेष बल दे. मजवर दिकांनीं टाकिलेलीं शस्त्रास्त्रें विफल होऊन तीं शस्त्रास्त्रें सबंध गिळून टाकीन ही मला शक्ति दे. हे शंकरा, जर मजवर प्रसन्न आहेस, तर हे वर सांगितलेले सर्व वर मला पाळू होऊन दे. हें दैत्याचें भाषण ऐकून गिरिजार- शंकर बोलला—हे भक्ता, तुला युद्धाचे समयीं सहस्र- हु देऊन मागितलेले सर्व वर दिले आहेत. असें बो- शंकर तेथून अंतर्धान पावला.

शंकर अंतर्धान पावल्यानंतर मिळालेल्या वराच्या योगानें लिकालदैत्य मोठा आनंदित झाला व पुढें त्या वर- भावानें तो लोकांना अत्यंत ताप देऊं लागला. त्यानें

अनेक दैत्यसेना जवळ बाळगल्या. तो दैत्य आपल्या से
सहवर्तमान मोठ्या आनंदांत असे. तो एक वेळ तुंग
ण्यांत आला; तेव्हां ऋषिगणांनीं त्या दैत्यास शंकर
वरप्रदान दिल्याचें वृत्त ऐकून फारच ते विव्हळ झाले,
न जाणों, आतां हा आपला समाचार घेईल असें त
सर्व ऋषिगणांस वाटलें. ऋषींनीं, साधकांनीं, अग्निहो
त्र्यांनीं आपापल्या आराध्यदेवतांच्या मुद्रा, विभूती, स
मिधा, कुश, स्मार्तपात्रें, स्त्रिया, मुलें, गाई, वांसरें घेऊन
त्या दैत्याच्या भयानें गहन अशा अरण्यांत पलायन केलें
तो सर्व समूह क्षुधेनें, तृषेनें पीडित झाला. सर्व दिशा
ठायीं जिकडे तिकडे हाहाःकार होऊन, पृथ्वी पर्वतांस
कंपित झाली. असा प्रकार झाला.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, त्या वेळे
देव, ऋषिगण, कोण पळाले, त्यांचा नामनिर्देश कृपा क
मला सांगितल्यास मजवर आपले फार उपकार होती
त्यांचें भाषण ऐकून व्यासोनारायण ह्मणाले, जे जे ऋ
देव, इत्यादि पळाले त्यांचीं नांवें ऐकाः—कश्यप, जमदग्नि
विश्वामित्र, गौतम, भारद्वाज, वशिष्ठ, गार्ग्य, परा
वत्स, बाभ्रव्य, भृगु, कपिल, मांडव्य, अत्रि, शाला
मार्कंडेय, कर्दम, शातातप, शौनक, शांडिल्य, नंदन, च्यव
दाल्भ्य, कुत्स, कौंडिण्य, नारद इत्यादि बहुत ऋषी
पलायन केलें. कोणी गृहस्थधर्मी ऋषी होते, त्यांनीं आप
स्त्रिया, पुत्रादिकांसह अरण्यमार्ग स्वीकारून स्वाश्रम स



डिले. इंद्रानें ऐरावतास सोडून पादचारीच पलायन केलें.
भयभीत झाल्याच्या योगानें कोणी कोणी अतित्वरा करून
एकेकटेच पळूं लागले. अग्निनारायण घामाघूम होऊन
मेषावर बसून पळाले. उत्तरदिशेकडे पळावयास लागले
तो प्रदेश तृणहीन होता. यमानें आपलें वेषांतर करून
तो पळाला. सर्व ऋषि, देव हे त्या राक्षसाच्या भयानें
भयाकुल होऊन नीच जनांसारखे स्वच्छंद पळूं लागले.
सशावर वायूनें आरोहण करून तो पळाला. कोणी आ-
काशमार्गानें, कोणी गुप्तरूपानें पळाले. सर्व धर्मांचें आदि-
कारण जें होमद्रव्य तें त्या कलिकालानें लुटिलें. कुबेरानें
द्रव्याचा लोभ सोडून अश्वावरोहण करून पलायन केलें.
दैत्याला वर देणारे जे शंकर ते सुद्धां आपल्या ह्मातान्या
नंदीवर बसून पळाले. त्या वेळेस वस्त्र सुद्धां शंकरांच्या अं-
गावर नव्हतें. अशा स्थितींत ते गहन अरण्यांत आले. अ-
श्विनीकुमार, सूर्य, चंद्र, विश्वेदेव, मरुद्गण, किंनर, यक्ष,
गंधर्व इत्यादि सर्व देव, ऋषि त्या अरण्यांत एकवटून
त्यांनीं दैत्यविध्वंसनार्थ आराध्यदेवतेची प्रार्थना करून
यज्ञ केला. त्याप्रमाणें त्या यज्ञांतीं जगद्धात्री विश्वमाया,
त्रैलोक्यपालिनी प्रत्यक्ष प्रगट झाली. तिला पाहून अति-
हर्षानें इंद्रादिदेवांनीं व ऋषिगणांनीं त्या जगन्मातेची
स्तुति केली. याप्रमाणें हा देवपलायननामक द्वितीय अ-
ध्याय समाप्त झाला.

## भाग तिसरा—श्रीजगदंबस्तुति.

### पद. (पंचतुंड०–ही चाल.)

श्रीजगदंबे नमन तुला हें सद्भावें आह्मी करितों ॥
तव गुणप्रेमामृत निजभावें सेवन करुनी सुख वरितों ॥ध्रु
तूंच जगाची माय पाय हे तव भवतारण ही तरणी ॥
नुरे पातकध्वांत जईं तव शौर्य वीर्य उगवे तरणी ॥
फार पीडिली कलिकालाच्या त्रासानें माये धरणी ॥
ह्या त्रासाच्या विमुक्ततेस्तव शरण तुझ्या आलों चरणीं॥
गिरीकंदरीं जरि लपलों ह्या पृष्ठिं उभा दुष्टचि तरि तो॥
पुण्यमार्ग धन सर्व आमचें दुष्ट बळें स्वकरें हरितो ॥ श्री०१॥

### श्लोक–शार्दूलविक्रीडित.

विद्यांची गति तूं तशीच सगळ्या लोकां गती सत्य तूं॥
देहींची गति तूं ऋषि प्रमुख जे यांची गती अंब तूं ॥
शक्तींची गति तूं जगांत अवघ्या थोरांतही थोर तूं ॥
तूं हें संकट वारुनी झडकरी देईं सुखा आजि तूं ॥ २

### श्लोक–वसंततिलका.

तूं एक सत्य वरदा जगतांत माये ॥
उद्धारकारिणि दुजी जरि ती रमा ये ॥
नाहीं तुझ्यासम तरी भवसागरांत ॥
संरक्षि अंब कलिदुःखमहागरांत ॥ ३ ॥

### साकी.

सर्व चराचरगतिव्यापिनी पूज्य परा तूं शक्ती ॥
त्रयलोकीं आराध्यदेवता ध्याल्या देशी मुक्ती ॥
शोभसि ह्या जगतीं ॥ देशी निजभक्तां प्रगती ॥ ध्रु० ॥४



### पद. (वसंतीं बघुनि मेनकेला–ही चाल.)

राक्षसें बहुत ताप दिधला ॥
सर्व ऋषी इंद्रादि देवतागण दुःखित झाला ॥ ध्रु० ॥
पीडिलें अति ब्राह्मणांला ॥
गाई मारुनि चरचर कापी. त्यांच्या वत्सांला ॥
विध्वंसिल्या यज्ञशाला ॥
भ्रष्टविल्या किति कलिकालानें अग्निहोत्रशाला ॥
कोणी निवारी न ज्याला ॥
हविर्भाग तो सुरां न देतां स्वयें भक्षि त्याला ॥
कितिक त्या हरुनि नेइ बाला ॥
स्थानभ्रष्टा करुनि देवता दैत्य मत्त झाला ॥ रा०॥५॥

### दिंडी.

शंकरानें वरदान दिलें त्यास ॥
परी तोही पावला अतित्रास ॥
ह्मणुनि अंबे स्मरतसों तुझ्या पाया ॥
त्राहि त्राहि जगदंब महामाया ॥ ६ ॥

### ओवी.

अपूर्वशक्ति त्रयलोकांत ॥ तूंच जगदंब साक्षात ॥
तुजवांचूनि अन्य दैवत ॥ ह्या भूवरी नसेचि ॥ ७ ॥

### श्लोक–अनुष्टुप्.

खड्गिनी पाशिनी तूंच ॥ तूं करीं शरधारिणी ॥
चापिनी एकवीरा तूं ॥ महारात्री तपस्विनी ॥ ८ ॥

## श्लोक–कामदा.

कालरात्रि तूं मोहरात्रि तूं ॥
चातुरीयका तुष्टिदात्रि तूं ॥
पुष्टिदात्रि तूं प्रीतिदात्रि तूं ॥
हे परात्परे नित्य सत्य तूं ॥ ९ ॥
मानदा तशी कांतिसौख्यदा ॥
सर्वमंगला ज्ञानसिद्धिदा ॥
बुद्धिवर्द्धिनी सर्वशर्मदा ॥
यापरी तुझें वृत्त कामदा ॥ १० ॥

**पद. ( राजाहूमै कौमका–ही चाल. )**

सर्व जनांची माता तूं तुजला ध्यातों आज ॥
सुरवर ऋषिवर रक्षुनियां राखिं आमची लाज ॥
जयदात्री तूं सर्वांची जयदा हें तव नाम ॥
सौम्यतरा श्री वंद्या तूं आद्यपीठ तव धाम ॥
तूं स्वाहा तूं स्वधाच तूं तूं सर्वां आराम ॥
सुबोधिनी तूं विधारिणी लोकत्रितयविराम ॥ ११

## दिंडी.

अमृताची चंद्रिका असिसि अंबे ॥
महातेजोमय मूर्ति तव सदंबे ॥
महाकालाच्या संकटीं तुझ्यावीण ॥
आमचा हा वारील कोण शीण ॥ १२ ॥



## साकी.

कामद्वीप निवासस्थल हें अंबे तव जन वदती ॥
वरदायक तूं सर्व सुरांची ह्या असुरांची शास्ती ॥
पीडित विश्वातें ॥ तारीं तारीं तूं माते ॥ ध्रु० ॥१३॥

## अंजनीगीत.

दैत्यानें बहु पीडा दिधली ॥ देवांची धुळधाणी केली ॥
इंद्राचीही महती हरिली ॥ पहा पहा माये ॥ १४ ॥

## ओवी.

घेतले देवांचे अधिकार ॥ कोणी न करी यत्प्रतिकार ॥
तूं देवी होय मेघाची धार ॥ चातक आह्मी तवाग्रीं ॥१५॥

## श्लोक–शुद्ध कामदा.

तव दयामृता वर्षवीं त्वरें ॥
विष हरीं कृपें लोकसुंदरे ॥
हरण तूं करीं दुष्ट आपदा ॥
कृतिहि दाखवीं शुद्ध कामदा ॥ १६ ॥

## श्लोक–शिखरिणी.

भवानी तूं सर्वां सुखकर करीं वेळ जयदे ॥
ऋषी देवां विप्रां जननिसम सर्वांस सुख दे ॥
वधोनीयां दैत्यां सुजनजनिं हो सौख्यकरिणी ॥
सुभोक्तया विप्रांना तव यश गमे ही शिखरिणी॥१७॥

## श्लोक–शार्दूलविक्रीडित.

देवी वरदे तुझ्याविण दुजी कोणी नसे तारिणी ॥
हें जगरक्तपें पिडियलें तेव्हां तुझ्यावांचुनी ॥

### श्लोक–कामदा.

कालरात्रि तूं मोहरात्रि तूं ॥
चातुरीयका तुष्टिदात्रि तूं ॥
पुष्टिदात्रि तूं प्रीतिदात्रि तूं ॥
हे परात्परे नित्य सत्य तूं ॥ ९ ॥
मानदा तशी कांतिसौख्यदा ॥
सर्वमंगला ज्ञानसिद्धिदा ॥
बुद्धिवर्द्धिनी सर्वशर्मदा ॥
यापरी तुझें वृत्त कामदा ॥ १० ॥

### पद. ( राजाहूमै कौमका–ही चाल. )

सर्व जनांची माता तूं तुजला ध्यातों आज ॥
सुरवर ऋषिवर रक्षुनियां राखिं आमची लाज ॥
जयदात्री तूं सर्वांची जयदा हें तव नाम ॥
सौम्यतरा श्री वंद्या तूं आद्यपीठ तव धाम ॥
तूं स्वाहा तूं स्वधाच तूं तूं सर्वां आराम ॥
सुबोधिनी तूं विधारिणी लोकत्रितयविराम ॥ ११

### दिंडी.

अमृताची चंद्रिका असिसि अंबे ॥
महातेजोमय मूर्ति तव सदंबे ॥
महाकालाच्या संकटीं तुझ्यावीण ॥
आमचा हा वारील कोण शीण ॥ १२ ॥



### साकी.

कामद्वीप निवासस्थल हें अंबे तव जन वदती ॥
वरदायक तूं सर्व सुरांची ह्या असुरांची शास्ती ॥
पीडित विश्वातें ॥ तारीं तारीं तूं माते ॥ ध्रु० ॥१३॥

### अंजनीगीत.

दैत्यानें बहु पीडा दिधली ॥ देवांची धुळधाणी केली ॥
इंद्राचीही महती हरिली ॥ पहा पहा माये ॥ १४ ॥

### ओवी.

घेतले देवांचे अधिकार ॥ कोणी न करी यत्प्रतिकार ॥
तूं देवी होय मेघाची धार ॥ चातक आह्मी तवाग्रीं ॥१५॥

### श्लोक–शुद्ध कामदा.

तव दयामृता वर्षवीं त्वरें ॥
विष हरीं कृपें लोकसुंदरे ॥
हरण तूं करीं दुष्ट आपदा ॥
कृतिहि दाखवीं शुद्ध कामदा ॥ १६ ॥

### श्लोक–शिखरिणी.

भवानी तूं सर्वां सुखकर करीं वेळ जयदे ॥
ऋषी देवां विप्रां जननिसम सर्वांस सुख दे ॥
वधोनीयां दैत्यां सुजनजनिं हो सौख्यकरिणी ॥
सुभोक्त्या विप्रांना तव यश गमे ही शिखरिणी॥१७॥

### श्लोक–शार्दूलविक्रीडित.

देवी वरदे तुझ्याविण दुजी कोणी नसे तारिणी ॥
ीं हें जगरक्तपें पिडियलें तेव्हां तुझ्यावांचुनी ॥

कोणी संकटिं धांवला न दुसरा केले तुवां खंडित ॥
दावीं ह्या समयीं निशाचरवृकां शार्दूलविक्रीडित ॥ १८
जेव्हां दानवसंगरीं विकलता होई सुरांची तदा ॥
त्वेशी तूं अवतार थोर जननी टाळीशि ही आपदा ॥
हाहाःकारहि संप्रति प्रगटुनी होतो जनांचा लय ॥
ह्यासाठीं जगदंबिके द्रुत करीं ह्या राक्षसांचा क्षय ॥ १९

**पद.** (हा ऋतु ग्रीष्मही प्रखर–ही चाल.)

कलिकालदैत्य ह्या जगतितलीं मातोनी ॥
त्रासवी सर्व ह्या सुरां ऋषींलागोनी ॥ ध्रुवपद ॥
अह्मि शिशू असंसि तूं सत्य आमची जननी ॥
मग पुत्रपालनीं किंतु धरिशि कां स्वमनीं ॥
हे माये बहु राक्षसां स्वयें त्वां वधुनी ॥
अर्पिलें सौख्य गे पूर्वि बहुत ह्या भुवनीं ॥
मग धांवसि आतां कां न आमच्या अवनीं ॥
कलिकालरोग हा पीडि फार ही अवनी ॥
चाल ॥ थोर तूं असंसि जगदंबे । त्रिजगतीं ॥
घे खड्ग करामधिं अंबे । भगवती ॥
हो जनांस ह्या अविलंबें । जगवती ॥
मिळवणी ॥ ह्या दैत्यभयें सुरराजऋषी त्रासोनी ॥
पावलों वनीं ह्या रक्षि भयापासोनी ॥ कलिका० ॥२

**साकी.**

मारुनियां कलिकाल तयाचें प्राशन करिशी रक्त ॥
तेव्हां आह्मी स्वकीय कर्मीं होउं सर्व अनुरक्त ॥
त्वां हा वर द्यावा ॥ होइल सौख्य तईं देवा ॥ ध्रु० ॥२



**गीति.**

मग उगवतील नेमें अवदानें तुष्ट हे शशी सूर्य ॥
देव द्विज ऋषि ह्यांचें जाइल कीं शेवटास सत्कार्य॥२२॥
स्वस्थानीं जाय तईं होउनियां त्रासमुक्त हर्यक्ष ॥
तसाच हा उमापति यम गुरु देवादि तो सहस्राक्ष॥२३॥
तेणें सृष्टिवरी मग नेमें वृष्टी करील मेघ तदा ॥
पृथ्वी सस्यांकुरवति वृक्ष फलित धेनु विपुल पायसदा ॥२४॥

**पद.** (भला जन्म हा–ही चाल.)

ही रसभरिता वाणि ऐकुनी तुष्ट होय देवि का ॥
प्रगटली भुवनत्रयपालिका ॥ ध्रु० ॥
श्रीदेवीमुखचंद्रा पाहुनी चकोर सुर हर्षले ॥
प्रेम बहु हृदयांतरिं दाटलें ॥
साह्य कराया आह्मांस्तव हें रूप जगीं दाविलें ॥
असें हें त्यांनीं मनिं भाविलें ॥
चाल ॥ इंद्रादि देव हे नमस्कार करुनियां ॥
राहिले उभे कीं हस्तां जोडूनियां ॥
मिळवणी ॥ तुष्ट होउनी बोले तेव्हां देवां सुरनायका ॥
वचन तें सज्जन हो आयका ॥ ही रस० ॥१॥ ॥२६॥

**ओवी.**

तुष्ट होउनी जगन्माता ॥ अभय दे सुरवरां समस्तां ॥
म्हणे नका करूं मनीं चिंता ॥ शत्रु आतां वधीन मी॥२७॥

## भाग चवथा—वज्रेश्वरीच्या उत्पत्तीचें देवीनें सांगितलेलें भविष्य.

इंद्रादिदेवांस श्रीजगदंबेनें अभय देऊन असें सांगितलें कीं, मी तुह्मांवर प्रसन्न झाल्यें. आतां तुह्मी आपल्या स्व- स्थानीं निर्भय होऊन जा; आणि आपापलीं स्वकर्मे करा. ऋषींनो, तुह्मीही मनांतलें भय सोडून यज्ञयागादि स- त्कर्मे आचरा. तुह्मां सर्वांच्या अंतःकरणांतली इच्छा मी पूर्ण करीन.

हें देवीचें भाषण ऐकून सर्व देव ह्मणाले, मातुश्री, ह्या दैत्यरूप धूमकेतु उत्पन्न होऊन त्यानें आह्मां सर्वांस दीन करून स्थानभ्रष्ट केलें आहे. ह्या पृथ्वीतलावर ह्यास शिक्षा करणारा कोणीच नसल्यानें तो अत्यंत बळी झाला आहे, सर्व ऋषींना पीडा देऊन, गंधर्व, अप्सरा, दि- क्पालादि त्यानें दीन केले. अग्निहोत्रादि संस्था छिन्न- भिन्न करून, धर्माचा लोप करून टाकिला आहे. यज्ञ- पुरोडाश स्वतां भक्षण करून आपणांस त्रिभुवनाचा ई- तो स्वतां मानीत आहे. तर हे शिवे, ह्या कलिकालना- मक शूर राक्षसाचा नाश करून आह्मां सर्वांचें संरक्षण कर, हीच तुझ्या चरणांपाशीं प्रार्थना आहे.

देवी ह्मणाली, ऋषि, देवादि विप्र हो, ह्या कलिकाल- दैत्याशीं तुमचें एकवीस वेळ युद्ध होणार. नंतर त्या युद्धाचे शेवटीं महाभयंकर दोन भुजांची माझी विभू- अवतरणार. मग ह्या कलिकालराक्षसाचा व ह्याचे जे दु-



सैनिक त्यांच्यासह सर्वांचा नाश करणार आहें. ही पृथ्वी फार आक्रांत झाली आहे. ह्याचें दूरीकरण मी करीन. देव, ऋषी, ब्राह्मण यांस निर्भय करून सौख्य देईन. दुर्धर, लो- हिताक्ष, सिंहवक्र, चंडवेग इत्यादि राक्षसांचा नाश करून ऋषिदेवगणादिकांच्या स्तुतीस पात्र होईन.

आतां तुह्मां सर्वांस एक वर देतें. तो असा कीं, तुह्मी सर्व ह्या अरण्यांत न रहातां हा मंदाग्निपर्वत व तुंगाद्रि- पर्वत ह्यांवर खुशाल वास्तव्य करा. तेथें माझ्या वर- प्रभावेंकरून ह्या राक्षसांची तुह्मांस बिलकूल पीडा होणार नाहीं. तुह्मी सर्व ह्या निर्भय स्थलीं गेल्यावर मग कांहीं दिवसांनीं तुंगभद्र, सिंहवक्र नांवाचे कलिकाल- राक्षसाचे सैनिक युद्धाकरितां येतील; ते आपलें चतुरंग दळ सिद्ध करून प्रथम कार्तिकस्वामीबरोबर, नंतर इंद्राबरोबर युद्ध होईल. राक्षस महामायावी, भयंकर वेषधारी, महाबलिष्ठ, खड्ग, धनुष्य, गदा, मुद्गल, तोम- रादि शस्त्रें घेऊन युद्धाची पराकाष्ठा करून कार्तिके- याचा पराजय केल्यावर इंद्रावर चाल करितील. मग इंद्र त्यांच्याशीं युद्धास सिद्ध होईल. इंद्राचीं सर्व आयुधें तो कलिकाल गिळून टाकील; फक्त एक वज्र मात्र इंद्राच्या हातीं शिल्लक राहील. अशा वेळीं देव, ऋषी, ब्राह्मण इत्यादि फार भयभीत होऊन जातील. कारण जो महान् दैत्य सहस्रभुजबलगर्विष्ठ; तो अनावर होईल. मग दे- वादि माझी स्तुति करतील कीं, हे माते, इंद्राच्या हातीं

फक्त एक वज्र आहे, इतक्यानें तरी ह्या दुष्ट राक्षसाचा पराजय होवो. हे जगदंबे, तूं महाविद्या, महामाया, चैतन्यरूपिणी अशी असून त्वां चंड, मुंड, शुंभ, निशुंभादि राक्षसांचा नाश करून पूर्वीं आह्मांस सौख्य दिलें आहे आतां ह्या कलिकालापासून आमचें रक्षण करणें तुला अशक्य नाहीं. इतकी स्तुति झाली तरी इंद्राचें व कलिकालाचें युद्ध चालूच राहील. मग इंद्रास अति त्वेष येऊन तो आपलें एकटें राहिलेलें वज्र त्या कलिकालदैत्याचे मानेवर जोरानें टाकील. तें वज्र राक्षसाच्या मानेवर पडल्याबरोबर तत्काल भिन्न होऊन त्या वज्रापासून माझी अद्वितीय विभूति वज्रेश्वरीनामक उत्पन्न होईल.

---

## भाग पांचवा—कलिकालदैत्याचें भ्रमण.

श्रीभारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, शंकरांनी कलिकालदैत्यास वरप्रदान व सहस्र भुजा दिल्यानंतर त्यानें काय काय केलें; तें सर्व मला आपण विस्तारपूर्वक सांगावें. हें ऐकून श्रीव्यास ह्मणाले, त्या कलिकालाच्या त्रासामुळें ऋषिदेव, ब्राह्मण त्या तुंगाद्रिपर्वतावर व दाग्नीवर ज्या वेळीं देवीच्या वाक्याप्रमाणें निर्भय जाऊन बसले, त्या वेळीं ह्या कलिकालास यज्ञभाग वगैरे मिळेनासे झाल्यामुळें तो फार चिंताग्रस्त होऊन त्यानें देवऋषिगणांचा शोध करण्याकरितां आपले हेर सर्व दिशांकडे पाठविले. त्या हेरांनीं हूण, वंग, कलिंग, मागध, मालव, अंग, सौराष्ट्र, द्रविड, कर्नाटकादि देश धुंडाळले;



कोठेंच ऋषी वगैरे त्यांस आढळले नाहींत. ते वेळेस ते हेर मनांत खिन्न झाले. त्यांनीं आपल्या हिरमुसल्या तोंडांनीं हें वर्तमान कलिकालदैत्यास सांगितलें. त्या वेळीं तो प्रतापी कलिकाल मोठा क्रोधाविष्ट होऊन, डोळे अग्नीसारखे लाल करून, स्वतांच देव, ऋषि वगैरेंचा शोध करण्यास निघाला. तो अनेक देश फिरतां तुंगारण्यांत आला. त्या अरण्यांत आल्यावर त्यानें सर्व अरण्य धूम्रमय अवलोकन केलें. त्या वेळेस क्रोधाच्या आवेशासरसा धांवत धांवत तुंगाद्रिपर्वतावर चढला. त्याचा तो पर्वतप्राय देह पाहून तेथील तापसादिकांस मोठें भय वाटलें. मरुद्गण विव्हल झाले. ऋषि, मुनि आपल्या पुत्रकलत्रांसह अत्यंत भयाभीत होऊन त्यांच्या मनांत असें आलें कीं, हें मूर्तिमान् शेंडे नक्षत्रच आलें कीं काय? मग तेथून त्या दैत्याच्या भयानें निघून इंद्रादिदेव मंदाग्निपर्वतावर होते तेथें हे सर्व गेले. त्या पर्वतावर देवीच्या वरप्रभावें त्या सर्वांस भूकतहान वगैरेंची पीडा न होतां दैत्याचीही गति कुंठित झाली. ही स्थिति पाहून तो कलिकाल आपल्या अंतःकरणांत खिन्न झाला; व इतके श्रम करून कांहींच फळ झालें नाहीं असें त्यास वाटलें. अशा संतप्तावस्थेंत तो क्षुधातृषादिकांनीं पीडित होऊन त्या तुंगारण्यांत भ्रमण करूं लागला. हातांत कुऱ्हाड घेऊन त्यानें अरण्य तोडण्यास आरंभ केला. नैमिष, तुंग, दंडकादि सप्त अरण्यांचा फडशा पाडिला. असें करण्याचें कारण

हेंच कीं आपल्या फराळाकरितां गाई, ब्राह्मण, ऋषि वगैरे सांपडावे. पण त्यास इतकीं अरण्यें फस्त करतांना एकही ब्राह्मण मिळाला नाहीं. तेव्हां तो कलिकाल चिंतातुर होऊन फिरत फिरत भागीरथीच्या कांठीं आला. तेथें जे ऋषि वगैरे होते, ते पूर्वींच मंदाचलावर देवीच्या आज्ञेप्रमाणें गेले होते; ह्यामुळें त्या ठिकाणीं कलिकाल-राक्षसास कांहींच फायदा झाला नाहीं. क्षुधेनें अत्यंत त्रस्त होऊन क्षुधानिवारणाची चिंता करूं लागला. त्या अरण्यांत भयंकर वाघ, रानडुकरें, महिष, चितळे, रानगवे, मृग, वनगाई, वानरें, कस्तुरी मृग, इत्यादि पशूंचे शब्द मात्र भरपूर ऐकूं येत. हें पाहून त्या राक्षसानें आपल्या करजालानें चार कोस जागा अडवून त्यांत शतशः पशु धरिले. तें पशुरूप इंधन तो आपल्या जठरानलास अर्पू लागला. त्या सर्व पशूंचा फराळ तो करीत असतां त्यांतच एक ब्राह्मण त्या पशूंबरोबर ह्या कलिकालाच्या उदरदरींत गेला; व तेथूनच तो ब्राह्मण राक्षसास ह्मणू लागला कीं, अरे राक्षसा, मी गरीब ब्राह्मण असून झाडाचीं गलितपत्रें, कंद, मूळें इत्यादिकांवर निर्वाह करून राहत होतों; अशा स्थितींत त्वां मला गिळिलेंस; मी जरेनें पीडित आहें; माझी मुक्तता कर ?

कलिकालदैत्यास मोठें आश्चर्य वाटलें कीं मी ह्यास गिळिलें असून हा माझ्या उदरांतून कसा बोलतो! त्यानें त्या ब्राह्मणास कलिकाल विचारितो कीं, अरे ब्राह्मणा,



तूं जारणमारणादि कर्में, मंत्र, तंत्र जाणतोस किंवा कसें ? ब्राह्मण ह्मणाला, अरे बाबा, मला विद्या कशाबरोबर खातात हें सुद्धां ठाऊक नाहीं. मी केवळ फक्त शिखासूत्र धारण करणारा मनुष्य आहें. शिखासूत्र हेंच ब्राह्मणाचें चिन्ह इतकें ठाऊक आहे, त्याशिवाय दुसरी विद्या मला स्वप्नांत देखील ठाऊक नाहीं. आतां तूं ह्मणतोस यावरून अशा विद्या असाव्या असें वाटतें; तरी तूं मला कृपा करून सोड, ह्मणजे मी विद्या साध्य करून ईश्वरास प्रसन्न करीन. मी तुझ्या पायां पडतों, हे महाबाहो, मला बाहेर काढ ? इतकें त्या उदरस्थ ब्राह्मणाचें दीनवचन ऐकून त्या कलिकालाच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न झालें. "आतां प्रेम उत्पन्न झालें ह्याचें कारण असें दिसतें कीं, तो ब्राह्मण राक्षसाचें खाद्य तर खराच; पण ह्या वेळीं तो पोटचा गोळा होता. तेव्हां पोटच्या गोळ्यावर प्रेम किती असतें ह्याचा अनुभव सर्व मुलांच्या आईबापांस आहे." कलिकालानें त्या ब्राह्मणाची ती दीन स्थिति पाहून मोठ्या जोरानें फूत्कार केला, त्यासरसा तो ब्राह्मण चार कोस लांब अरण्यांत जाऊन पडला, सगळें शरीर ठेंचलें, अंगावर गलत्कुष्ट व रक्तपित्त वगैरे दिसूं लागल्यामुळें त्या ब्राह्मणास फार वाईट वाटलें.

ह्याप्रमाणें हा कलिकालवर्णननामक पांचवा भाग झाला.

---

हेंच कीं आपल्या फराळाकरितां गाई, ब्राह्मण, ऋषि
वगैरे सांपडावे. पण त्यास इतकीं अरण्यें फस्त करतांना
एकही ब्राह्मण मिळाला नाहीं. तेव्हां तो कलिकाल
चिंतातुर होऊन फिरत फिरत भागीरथीच्या कांठीं आला.
तेथें जे ऋषि वगैरे होते, ते पूर्वींच मंदाचलावर देवीच्या
आज्ञेप्रमाणें गेले होते; ह्यामुळें त्या ठिकाणीं कलिकाल
राक्षसास कांहींच फायदा झाला नाहीं. क्षुधेनें अत्यंत त्रस्त
होऊन क्षुधानिवारणाची चिंता करूं लागला. त्या अर-
ण्यांत भयंकर वाघ, रानडुकरें, महिष, चितळे, रानगवे,
मृग, वनगाई, वानरें, कस्तुरी मृग, इत्यादि पशूंचे शब्द
मात्र भरपूर ऐकूं येत. हें पाहून त्या राक्षसानें आपल्या
करजालानें चार कोस जागा अडवून त्यांत शतशः प[शु]
धरिले. तें पशुरूप इंधन तो आपल्या जठरानलास अ[र्पूं]
लागला. त्या सर्व पशूंचा फराळ तो करीत असतां त्य[ां]-
तच एक ब्राह्मण त्या पशूंबरोबर ह्या कलिकाला[च्या]
उदरदरींत गेला; व तेथूनच तो ब्राह्मण राक्षसास ह[्मणूं]
लागला कीं, अरे राक्षसा, मी गरीब ब्राह्मण असून इ[...]
डाचीं गलितपत्रें, कंद, मूलें इत्यादिकांवर निर्वाह कर[ून]
राहत होतों; अशा स्थितींत त्वां मला गिळिलेंस; [...]
जरेनें पीडित आहें; माझी मुक्तता कर ?

कलिकालदैत्यास मोठें आश्चर्य वाटलें कीं मी ह्या[स]
गिळिलें असून हा माझ्या उदरांतून कसा बोलतो! त्या[नें]
त्या ब्राह्मणास कलिकाल विचारितो कीं, अरे ब्राह्म[णा]



तूं जारणमारणादि कर्में, मंत्र, तंत्र जाणतोस किंवा कसें ?
ब्राह्मण ह्मणाला, अरे बाबा, मला विद्या कशाबरोबर खातात
हें सुद्धां ठाऊक नाहीं. मी केवळ फक्त शिखासूत्र धारण कर-
णारा मनुष्य आहें. शिखासूत्र हेंच ब्राह्मणाचें चिन्ह इतकें
ठाऊक आहे, त्याशिवाय दुसरी विद्या मला स्वप्नांत दे-
खील ठाऊक नाहीं. आतां तूं ह्मणतोस यावरून अशा
विद्या असाव्या असें वाटतें; तरी तूं मला कृपा करून सोड,
ह्मणजे मी विद्या साध्य करून ईश्वरास प्रसन्न करीन.
मी तुझ्या पायां पडतों, हे महाबाहो, मला बाहेर काढ ?
इतकें त्या उदरस्थ ब्राह्मणाचें दीनवचन ऐकून त्या कलि-
कालाच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न झालें. "आतां प्रेम
उत्पन्न झालें ह्याचें कारण असें दिसतें कीं, तो ब्राह्मण
राक्षसाचें खाद्य तर खराच; पण ह्या वेळीं तो पोटचा
गोळा होता. तेव्हां पोटच्या गोळ्यावर प्रेम किती असतें
ह्याचा अनुभव सर्व मुलांच्या आईबापांस आहे." कलि-
कालानें त्या ब्राह्मणाची ती दीन स्थिति पाहून मोठ्या
[ज]ोरानें फूत्कार केला, त्यासरसा तो ब्राह्मण चार कोस
[ल]ांब अरण्यांत जाऊन पडला, सगळें शरीर ठेंचलें, अं-
[गा]वर गलत्कुष्ट व रक्तपित्त वगैरे दिसूं लागल्यामुळें त्या
[ब्रा]ह्मणास फार वाईट वाटलें.

[ये]णेंप्रमाणें हा कलिकालवर्णननामक पांचवा
[अध्याय संप]ला.

---

## भाग सहावा—वज्रेश्वरीक्षेत्रवर्णन.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, जो गलत्कुष्ट विप्र कलिकालदैत्यानें आपल्या फुंकाराबरोबर चार कोस दूर झोंकिला, तो कोठें गेला व त्यानें कोणत्या देवाची सेवा केली, हें सविस्तर वर्तमान मला कृपा करून सांगावें. हें भाषण ऐकून श्रीव्यासांनीं सांगितलें कीं, जो ब्राह्मण कलिकालानें फुंकून बाहेर टाकिला, तो विश्वामित्रवंशीय होता. त्याला त्या राक्षसानें फुंकून एक योजन टाकिलें; तेणेकरून सर्व अंग ठेंचून गेलें, देहाची स्मृति राहिली नाहीं. तो ब्राह्मण पंगुस्थितींत असल्यामुळें त्याला मंदाग्निपर्वतावर ऋषिदेवादिकांच्या समुदायांत जाववेना; ह्मणून तो ब्राह्मण त्या मंदाग्निपर्वताच्या दक्षिणेस उपोषित राहून श्रीरामचंद्राची उपासना करून राहिला. त्या श्रीरामनामाच्या जपानें तो ब्राह्मण क्षुधादिविकाररहित झाला. त्यानें ह्याप्रमाणें एक हजार वर्षें तपश्चर्या केली. शुद्धांतःकरणानें राहून, स्नानसंध्या, ईश्वराराधन, वैदिक कर्माचरणानें त्या ब्राह्मणानें तप केलें. तो तपःप्रभाव पाहून करुणाशाली श्रीरामचंद्र, जगन्माता जनकनंदिनी, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, आणि मारुति ह्यांसहवर्तमान प्रगट झाले. त्या वेळेस त्या ब्राह्मणानें अनन्यभावें अनेकोपचारें पूजा करून श्रीरामपंचायतनाची स्तुति केली. तो ब्राह्मण आनंदमय होऊन ह्मणाला, हे श्रीराम, करुणासागरा, देवादिकांच्या आराध्या, निर्गुणा, तुला माझा नमस्कार असो.



देव, ऋषि हे आपणांस देवत्व प्राप्त व्हावें ह्मणून रात्रंदिवस तुझी तपश्चर्या करितात. तूं साक्षात् सच्चिदानंदस्वरूप परमेश्वर आहेस. तूं निर्गुण, निराकार असून सर्व चराचरास शक्तिदाता असा परब्रह्मस्वरूप आहेस, तूं एकरूप असून जगास ब्रह्माविष्णुशिव ह्या त्रिविध रूपांनीं दृश्यमान होत आहेस. तूं साक्षात् पुराणपुरुष असून दुष्ट दानव यांचा नाश करणारा, तूं युगायुगीं धर्मग्लानि होतांच अवतार धरणारा, दीनांचें संरक्षण करणारा, आणि यज्ञयागादिकांचा प्रवर्तक आहेस. मी एक तुझा दीन सेवक आहें, मजवर तूं अनुग्रह कर. हे भक्तवत्सल, मी गलितकुष्टानें पीडलों आहें. मला ह्या रोगांत शीतोदकाचें स्नान अत्यंत ताप देतें; ह्यास्तव माझ्या रोगाची निवृत्ति होऊन ह्या जगावर उपकार होईल असें तीर्थ तुझ्या प्रसादानें उत्पन्न कर.

ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणाची दीनवाणी ऐकून तो करुणाब्धि श्रीराम संतुष्ट होऊन त्या ब्राह्मणास ह्मणाला, हे ब्राह्मणा, पूर्वसंचितानें हा भयंकर रोग तुला उत्पन्न झाला आहे. तत्राप आतां तूं काडीभर चिंता न करितां स्वस्थ रहा. मी तुला सांगतों ह्याप्रमाणें पवमानाचा प्रयोग कर. हें वाक्य ऐकतांच ब्राह्मणास अत्यानंद झाला. त्यानें श्रीरामाज्ञेप्रमाणें करितांच त्या ठिकाणीं उष्णोदकाचीं कुंडें उत्पन्न झालीं. प्रथम रामकुंड, त्याचे शेजारीं सीताकुंड, लक्ष्मणकुंड, भरतकुंड, शत्रुघ्नकुंड, मारुतिकुंड

हीं कुंडें उष्णोदकानें भरलेलीं उत्पन्न होऊन तेथेंच श्रीरामांनीं रामेश्वरनामक महादेवाची स्थापना केली. त्या रामेश्वराचें अर्चन केल्यास सकल कामना पूर्ण होतात; व ह्या उष्णोदककुंडांत स्नान केल्यापासून रोगादिकांचा नाश होऊन मनुष्य निष्पाप होतो.

ह्याच ठिकाणीं ज्ञानवापी नांवाचें तीर्थ स्नान करणारांस ज्ञान देणारें उत्पन्न केलें आहे. तसेंच ब्रह्मकुंड, विष्णुकुंड, शिव, वरुण, अग्नि, शामन, इंद्र, ईशान, सौम्य, वायु, अत्रेय, काश्यप, भारद्वाज, बिंदु, सूर्य, चंद्र, विश्वामित्र, गौतम, वशिष्ठ, परशुराम, मार्कंडेय, भृगु, गर्ग, पाराशर, वात्स्य, बाभ्रव्य, मांडव्य, कपिल, शांतेय, कर्दम, शालाक्ष, शौनक, शांडिल्य, वामन, दाल्भ्य, कौत्स्य, कौंडिण्य, नारद, मत्स्य, गोरक्ष, ह्या नांवांचीं कुंडें ह्या नदीतीरीं त्या त्या ऋषिदेवादिकांनीं निर्माण केलीं.

अशा प्रकारें हें वज्रेश्वरी अविमुक्त क्षेत्र देवादिकांनीं पापशांत्यर्थ व राक्षसांचा विनाश करणाऱ्या जगदंबेचें स्थान उत्पन्न केलें आहे. तेथें नजीकच गणेशाची स्थापना केली आहे. तो कुष्टी ब्राह्मण तुष्टि पावून सृष्टिलकाची इष्टी करून परमेष्ठीपदाप्रत पावला. असें आहे वज्रेश्वरीनामक दुर्लभ क्षेत्र जें भुक्तिमुक्ति देणारें आहे ज्याच्या उत्तरेस भागीरथीनामक तीर्थ आहे, ज्या भागीरथीच्या दर्शनानें पापें कंपायमान होऊन पळतात; ज्या ठिकाणीं रेणुका, वज्रेश्वरी, कालिका ह्या देवीत्रयीनें



मूर्तिमंत वास केला आहे; जेथें जमदग्निऋषींनीं वास केला. लोकांना वर देणारा परशुराम तेथें राहिला. ह्याचे पश्चिमेस तुंगाद्रिनामक पर्वत आहे, जो सर्व ऋषींनीं युक्त, ज्यावर पुष्करनामक सरोवर, ज्याचे समीप सूर्यतीर्थ, जें गलत्कुष्ट निवारण करणारें असें आहे. निर्मल नांवाचें तीर्थ अति विमलोदकानें तुडुंब भरलेलें जेथें आहे, जेथें शूलेश्वरनामक महादेव नरांना प्रत्यक्ष दर्शन देणारा वसतो. अशा प्रकारचें पावन तीर्थ व्याधि हरण करणारें ज्या वज्रेश्वरीसंनिध आहे.

ह्याप्रमाणें वज्रेश्वरीमहात्म्यांतील वज्रेश्वरीक्षेत्रवर्णननामक हा सहावा भाग संपूर्ण झाला आहे.

---

## भाग सातवा—दैत्यसेनाप्रबंध.

भारद्वाजऋषींनीं पुनः व्यासांस विचारिलें कीं, त्या द्विजास राक्षसानें तोंडांतून दूर टाकिल्यावर मग तो कलिकाल कोठें गेला; व त्यानें काय काय केलें तें मला सर्व सांगावें. व्यासऋषि ह्मणाले, त्या कलिकालानें आपले सर्व सैनिक जे उमावरप्रसादें मिळविलेले ते सर्व आपल्यासमोर बोलावून त्यांचें एकीकरण केलें. ते सैनिक येणें प्रमाणें—दंतुर, तुंगभद्र, कुशील, कोल, दुर्धर, चंडवक्र, सिंहवक्र ह्या नांवाचे मोठे पराक्रमी व महारथी असे होते. ह्या सैनिकांनीं आपापली सेना जी देवांशीं युद्ध करणारी ती ती आपल्या ताब्यांत घेतली, व देवांशीं युद्ध करण्या-

करितां सर्व सिद्ध केली. ती युद्धविद्याविशारदसेना आ- पल्या शस्त्रास्त्रांसह तयार झाली. त्या राक्षसांचीं तीं भयं- कर रूपें असून ते मोठे शौर्यशाली होते. असे कोट्या- वधि राक्षस सज्ज होऊन त्यांनीं मोठे सिंहनाद करून तें सर्व अरण्य दणाणविलें. ह्याप्रमाणें चतुरंगसेनेनें वेष्टिलेला तो कलिकाल शंभर इंद्रांसारखा शोभूं लागला.

अशा प्रकारें सेनापति व सैन्य सिद्ध झाल्यावर त्या क- लिकालानें इंद्राकडे दूत पाठविण्याचा विचार करून त्या दूतास आपल्यासमोर आणविलें. दूत आल्यावर त्यानें राक्षसेंद्रास नमस्कार केल्यानंतर तो महाबली काल त्या- ह्मणाला, तूं ह्या वेळीं मंदाग्निपर्वतावर जा, मा- शत्रु इंद्र तेथें आहे त्यास सांग कीं, तूं ह्या पर्वतावर स- देवांसह निर्भय होऊन माझा हविर्भाग ग्रहण करितो- हें चांगलें नाहीं. तो भाग तूं कोणत्या मुखानें खातो- हें मला लवकर सांग, जर तुझ्यांत शक्ति असेल त- युद्धास ये, तसें न होईल तर शरण येऊन माझ्या पा- यांवर डोकें ठेव. कारण मी स्वतः तुझा इंद्र आहें. असतां माझ्या समोर तूं दुसरा इंद्र कोण आहेस? मी त्रैलोक्याचा अधिपति असून सर्व विश्व माझ्या आज्ञेंत वागत आहे.

दूतानें दानवेंद्राचा निरोप घेऊन देवेंद्रासमीप मंदाग्नि- पर्वतावर तो प्राप्त झाला. त्यानें कलिकालाचा निरोप इंद्राला यथातथ्य सांगितला. त्या दूतानें तो मंदाग्निपर्वत



हिला तों त्यावर देवांचीं, ऋषींचीं, ब्राह्मणांचीं वेदोक्त- कर्में निर्भय चाललीं आहेत. सर्वांस इंद्रानें निरोप कळ- विल्यावर देवांची सभा झाली. नंतर इंद्रानें त्या दूतास मोठ्या गंभीरपणानें प्रत्युत्तर दिलें कीं, अरे दूता! तूं त्या मदोन्मत्त कलिकालास असें सांगः—एक इंद्र, एक चंद्र, एक सूर्य, एक शंकर असे एक एक असतां इंद्रा- मध्यें तूं रे वांटेकरी कोण? सर्व यक्षराक्षस, पन्नग, दैत्य, दानव, हे सर्व माझ्या चरणाचे दास आहेत. असें असतां हा कलिकालराक्षस मला कांहीं अनावर योद्धा नाहीं. युद्धास सिद्ध हो. हे दूता, आलास त्या स्थळीं परत जा व त्यास माझा निरोप कळीव.

अशा प्रकारचा इंद्राचा निरोप पुनः कलिकालास त्या दूतानें कळविला. तो निरोप ऐकून कलिकालास हर्ष झाला व त्यानें युद्धाची नौबद वाजविली. सर्व राक्षससैन्य सिद्ध केलें. त्या राक्षसांचीं शरीरें कोणी सप्तताल उंच, कोणी पर्वतासारखा, कोणी योजनभर लांब, कोणी सात तोंडांचा, कोणी महाभुज, कोणी दहा भुजांचा, कोणी चार मुखांचा, कोणी सिंहमुख, कोणी ऊर्ध्वकेशी, कोणी महान्केशी, कोणी अतिबलाढ्य! कोणी मुद्गर धारण केलेला, असें सर्व सैन्य सिद्ध झालें. त्या राक्षसांनीं आ- पल्या आरोळयांनीं तें सर्व अरण्य दणाणविलें. तें राक्षसांचें सैन्य नव्हतें; तर चालणारे पर्वतच होते कीं काय असें वाटे! असें तें सर्व सैन्य व्यवस्थेनें उभें करून त्यावर जे जे सै-

करितां सर्व सिद्ध केली. ती युद्धविद्याविशारदसेना आ-
पल्या शस्त्रास्त्रांसह तयार झाली. त्या राक्षसांचीं तीं भयं-
कर रूपें असून ते मोठे शौर्यशाली होते. असे कोट्या-
वधि राक्षस सज्ज होऊन त्यांनीं मोठे सिंहनाद करून तें
सर्व अरण्य दणाणविलें. ह्याप्रमाणें चतुरंगसेनेनें वेष्टिलेला
तो कलिकाल शंभर इंद्रांसारखा शोभूं लागला.

अशा प्रकारें सेनापति व सैन्य सिद्ध झाल्यावर त्या क-
लिकालानें इंद्राकडे दूत पाठविण्याचा विचार करून त्या
दूतास आपल्यासमोर आणविलें. दूत आल्यावर त्यानें
राक्षसेंद्रास नमस्कार केल्यानंतर तो महाबली काल त्या
ह्मणाला, तूं ह्या वेळीं मंदाग्निपर्वतावर जा, माझा
शत्रु इंद्र तेथें आहे त्यास सांग कीं, तूं ह्या पर्वतावर
देवांसह निर्भय होऊन माझा हविर्भाग ग्रहण करितोस
हें चांगलें नाहीं. तो भाग तूं कोणत्या मुखानें खातोस
हें मला लवकर सांग, जर तुझ्यांत शक्ति असेल
युद्धास ये, तसें न होईल तर शरण येऊन माझ्या
यांवर डोकें ठेव. कारण मी स्वतः तुझा इंद्र आहें
असतां माझ्या समोर तूं दुसरा इंद्र कोण आहेस
त्रैलोक्याचा अधिपति असून सर्व विश्व माझ्या
वागत आहे.

दूतानें दानवेंद्राचा निरोप घेऊन देवेंद्रासमीप मंदाग्नि
पर्वतावर तो प्राप्त झाला. त्यानें कलिकालाचा निरोप इंद्रा
यथातथ्य सांगितला. त्या दूतानें तो मंदाग्निपर्वत



हिला तों त्यावर देवांचीं, ऋषींचीं, ब्राह्मणांचीं वेदोक्त-
कर्में निर्भय चाललीं आहेत. सर्वांस इंद्रानें निरोप कळ-
विल्यावर देवांची सभा झाली. नंतर इंद्रानें त्या दूतास
मोठ्या गंभीरपणानें प्रत्युत्तर दिलें कीं, अरे दूता ! तूं
त्या मदोन्मत्त कलिकालास असें सांगः—एक इंद्र, एक
चंद्र, एक सूर्य, एक शंकर असे एक एक असतां इंद्रा-
मध्यें तूं रे वांटेकरी कोण ? सर्व यक्षराक्षस, पन्नग, दैत्य,
दानव, हे सर्व माझ्या चरणाचे दास आहेत. असें असतां
हा कलिकालराक्षस मला कांहीं अनावर योद्धा नाहीं.
युद्धास सिद्ध हो. हे दूता, आलास त्या स्थळीं परत जा
व त्यास माझा निरोप कळीव.

अशा प्रकारचा इंद्राचा निरोप पुनः कलिकालास त्या
दूतानें कळविला. तो निरोप ऐकून कलिकालास हर्ष झाला
व त्यानें युद्धाची नौबद वाजविली. सर्व राक्षससैन्य
सिद्ध केलें. त्या राक्षसांचीं शरीरें कोणी सप्तताल उंच,
कोणी पर्वतासारखा, कोणी योजनभर लांब, कोणी सात
तोंडांचा, कोणी महाभुज, कोणी दहा भुजांचा, कोणी
चार मुखांचा, कोणी सिंहमुख, कोणी ऊर्ध्वकेशी, कोणी
महान्केशी, कोणी अतिबलाढ्य ! कोणी मुद्गर धारण
केलेला, असें सर्व सैन्य सिद्ध झालें. त्या राक्षसांनीं आ-
पल्या आरोळ्यांनीं तें सर्व अरण्य दणाणविलें. तें राक्षसांचें
सैन्य नव्हतें; तर चालणारे पर्वतच होते कीं काय असें वाटे !
असें तें सर्व सैन्य व्यवस्थेनें उभें करून त्यावर जे जे सै-

निक ज्या ज्या स्थानीं उभे राहण्यास योग्य त्या त्या स्थानीं उभे करून युद्धास तयार झाले.

इकडे इंद्रानें आपल्या सैन्यावर स्वामिकार्तिक यांची सेनापतीच्या जागीं योजना करून सर्व अस्त्रें शस्त्रें यांसह सैन्य सिद्ध केलें. त्या इंद्रसैन्यांत सर्व देव, अग्नि, वायु, मेघ इत्यादि अस्त्रांच्या साक्षात् देवताच उभ्या होत्या! मग अस्त्रांची वेगळी गरज ती कोणास नव्हती. ह्याप्रमाणें त्या दैत्यांचें व ह्या देवांचें अशीं दोन्ही सैन्यें युद्धास समोरासमोर येऊन भिडलीं.

---

## भाग आठवा—दंतुरनामक राक्षसाचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारलें—कलिकालराक्षसाच्या सैन्याची सर्व तयारी झाल्यावर इंद्राचें व कलिकालाचें पुढें कसें कसें झालें तें आपण सांगावें. व्यास ह्मणाले त्या कलिकालराक्षसानें, प्रथम आपला एक वीर दंतुर नामक होता त्याजबरोबर हत्ती, घोडे, रथ, पायदळ सैन्य देऊन इंद्रासीं युद्ध करण्यास पाठविलें. तो भयंकर दंतुरराक्षस युद्धाचे तयारीनें सिद्ध झाला. वीर कोणी भाले, कोणी तरवारी, कोणी धनुष्यबाण, कोणी दगड, कोणी मुद्गल, कोणी गोफणी, कोणी अशीं शस्त्रें घेऊन युद्धभूमीचे ठायीं तयार झाले. हा ज्या वेळेस युद्धास पाठविला; त्या वेळेस कलिकालानें सांगितलें कीं, जर देवांचा पराजय करशील तर मला



दाखीव, नाहींपेक्षां तिकडेच मर. हें वाक्य ऐकून खिन्नचित्त झालेला दंतुर युद्धास आला. राक्षसांची तयारी पाहून इकडे देवसेनापति कार्तिकस्वामी युद्धास सिद्ध झाले. तेही महापराक्रमी व मोठे युद्धकुशल होते. सर्व राक्षसकानन दग्ध करण्यास प्रत्यक्ष अग्नीसारखे असून त्यांनीं आपलें धनुष्य सज्ज करून वीरासन घालून धनुष्यास बाण लाविला. एक बाण त्या दंतुरराक्षसावर मोठ्या वेगानें सोडल्यावर तो दंतुर क्षणभर मूर्च्छित झाला. पुनः दैत्यांनीं एकवटून त्या दंतुरास सावध केल्यावर दंतुरानें एक बाण कार्तिकस्वामींवर सोडिला. नंतर कार्तिकस्वामींनीं अर्धचंद्रबाण त्या दंतुरावर सोडतांक्षणीं तापल्या अग्नीप्रमाणें राक्षस क्षुब्ध झाला. तो व्याकुल होऊन मोठ्या स्वरानें ह्मणाला कीं, दैत्यांची विजयश्री गेली ह्यांत संशय नाहीं. इतकें बोलून दंतुरराक्षसानें देवसैन्यावर सर्पास्त्र सोडिलें. तें सोडतांक्षणींच सर्व देवसैन्यांत साप प्रगटले. ते अक्राळविक्राळ विषधर सर्व सैन्यांत पसरतांच देवांचे सैनिक फारच घाबरून गेले. अशा प्रकारें आपल्या सैन्यांत सर्व सर्प पसरलेले कार्तिकेयांनीं पाहिले. त्या वेळीं स्कंदांनीं गरुडास्त्राची योजना केली. तें महान् दारुण गरुडास्त्र सुटतांच ते सर्व सर्प नाश पावले. हें पहातांच तो देवद्वेषी राक्षस दंतुर फारच चवताळून आपल्या सैनिकांशीं बोलूं लागला. सैनिक हो, हे देव फारच शेफारले, ह्यांना एका क्षणांत नाहींसे करून टाकितों पहा! तुह्मी

घाबरूं नका. ह्याप्रमाणें आश्वासन देऊन तो दंतुर व इतर सैनिक यांनीं आपल्या हातांत कोणी मुद्गल, कोणी ताडवृक्ष, कोणी पाषाण, कोणी इतर वृक्ष असे हजारों ग्रहण करून त्या देवसैन्यावर केवळ दगड, वृक्ष ह्यांचा पर्जन्य पाडिला. ह्याप्रमाणें होतांच देवांच्या सैन्यानें थोडा माघार घेतला. सर्व हाहाःकार करूं लागले. ह्या प्रकारची देवांच्या सैन्याची स्थिति पहातांच सर्व ऋषींनीं त्या सैन्यास आश्वासन देऊन इंद्रानें कार्तिकस्वामींच्या साह्यास आणखी दिक्पाळ पाठविले. ते मोठे धुरंधर योद्धे होते. त्यांनीं दैत्यांचा थोडा वरचढपणा पहातांच मनांत फारच संतापले. हे सर्व दिक्पाल व देवसैन्य एकत्र होतांच कार्तिकस्वामींनीं पुनः दैत्यांशीं युद्ध आरंभिलें. प्रथम महान् शर घेऊन तो समंत्रित करून धनुष्यापासून सोडिला, तेणेंकरून त्या दंतुराचें धनुष्य छेदन केलें. चार बाण सोडून त्याच्या रथाचे घोडे मारिले. तेणेंकरून तो दंतुर विरथ होऊन भग्नचाप झालेला युद्ध करूं लागला. अशा स्थितींत जरी तो होता तरी त्यानें एक मोठा भयंकर मुद्गर उचलून तो स्वामिकार्तिकेयांवर धांवला. पण त्या चपळ महावीर कार्तिकस्वामींनीं शरवर्षाव करून त्याच्या मुद्गराचें चूर्ण करून टाकिलें. हें पाहून सगळे राक्षस मोठे संतापले. परंतु देवांनीं नाना शस्त्रें धारण करून ते सगळे राक्षस हतवीर्य केले. पुष्कळ सैन्य खपविलें. ह्याप्रमाणें त्या कार्तिकस्वामींच्या हस्तलाघवानें राक्षसास मृत्युनगरची वाट धरावी लागली.



पादचारी दंतुरराक्षस स्वामींनीं नष्ट केला. त्या वेळीं सर्व देवता आनंदित झाल्या; गंधर्व गायन करूं लागले; ऋषि, साधक, महान् तापसी हे हर्षित होऊन श्रीदेवीची स्तुति करूं लागले.

---

## भाग नववा—तुंगभद्रराक्षसाचा वध.

भारद्वाजऋषि व्यासास ह्मणाले, दंतुरराक्षसाचा पराजय झाल्याचें वर्तमान ऐकून पुढें त्या कलिकालानें काय केलें, व पुढें युद्धास कोण पाठविला तें मला कृपा करून सर्व आपण सांगा. हें भारद्वाजांचें वाक्य ऐकून व्यास ह्मणाले, तो महारथी दंतुर पराजित होऊन मृत्यु पावला, हें वर्तमान ऐकून कलिकाल फारच खिन्नचित्त झाला; व त्यासरसा मोठा क्रोधाविष्ट होऊन पुष्कळ सैन्य बरोबर देऊन त्यानें त्याचा दुसरा सैनिक तुंगभद्र नांवाचा देवांशीं युद्ध करण्यास पाठविला. तो तुंगभद्रराक्षस मोठा बलिष्ठ होता, तशांत बरोबर सैन्यही मोठें होतें. अशा सैन्यासह कार्तिकस्वामींस जिंकण्याच्या इच्छेनें तो युद्धभूमीचे जागीं प्राप्त झाला. तो आंगामध्यें कवच चढवून सर्व सैन्यासह रणभूमीवर येतांच देवसैन्य थरथरां कांपूं लागलें. आपसांत एकमेकांशीं देवांकडील लोक बोलूं लागले कीं, हें केवढें मोठें सैन्य आहे!! परंतु स्वामी कार्तिक मोठे धुरंधर योद्धे, ते तिळमात्र न घाबरतां त्यांनीं रणभेरीचा नाद करविला व युद्ध

करण्यास सिद्ध झाले. अशी स्वामींची युद्ध करण्याची उत्सुकता पाहून तो तुंगभद्रराक्षस मनांत संतापून मोठ्या गंभीर स्वरानें कार्तिकस्वामींशीं शरयुद्धाच्या अगोदर वाग्युद्ध करूं लागला.

तुंगभद्र ह्मणाला, अरे, माझा भाऊ दंतुर यास तुह्मी दुष्टांनीं छल करून मारिला. अरे, तूं गरीब बापडा, हीन, दीन, तुला सेनापति कोणीं केलें? हे षंढ मरुद्गणांनो! अरे, तुह्मीं अझून रणपंडित भट पाहिला नाहीं. तुमचें देवांचें वीरत्व, युद्धकौशल्य, तुमचें सैन्य, ह्यांची महती कोठपर्यंत? जोंपर्यंत माझी भोंवई क्रोधाविष्ट होऊन नाचूं लागली नाहीं तोंपर्यंत. तुह्मां देवांच्या अंगांत जर कांहीं शूरपणाचें पाणी असेल तर मला दाखवा. नाहीं तर माझें हस्तकौशल्यकौतुक पहा. इतकें बोलून धनुष्याची प्रत्यंचा चढवून बाण लाविला, तेणेंकरून कार्तिकस्वामींस त्या बाणघातानें मूर्च्छा आली. ही मुख्य सेनापतीची अवस्था पाहून देवसैन्य दशदिशा पळू लागलें, सर्व सैन्य थरथर कांपूं लागलें. ज्याप्रमाणें वायूच्या योगानें केळीचीं पानें कंपायमान होतात तसें देवसैन्य त्या तुंगभद्रराक्षसाच्या भयानें कंपायमान झालें. अशा भयंकर स्थितींत आपलें सैन्य पडलेलें पहातांच सेनापति कार्तिकेय आपली मूर्च्छा सांवरून, सावध होऊन त्यांनीं आपलें धनुष्य सज्ज केलें; व एक अर्धचंद्र बाण अशा जोरानें मारिला कीं, प्रथमच त्या तुंगभद्राचा



रथाचा ध्वज कमलाच्या तंतूप्रमाणें छेदून टाकिला; व असा कांहीं अपूर्व पराक्रम दाखविला कीं, जो वर्णितां येत नाहीं. त्या तुंगभद्राचे कितीक रथ भग्न केले. शंभर धनुष्यें एकामागून एक अशीं कार्तिकस्वामींनीं भग्न केलीं. हा स्वामींचा पराक्रम पाहून देवांचें सैन्य पुनः स्वामी-भोंवतीं साह्यार्थ जमा झालें. स्वामींनीं ह्या तुंगभद्रयोद्ध्याबरोबर तुमुल युद्ध केलें. त्याचे घोडे चार बाणांनीं मारिले. जेव्हां तो तुंगभद्र विरथ झाला, तेव्हां एका मोठ्या घोड्यावर बसून तो कार्तिकस्वामींशीं लढूं लागला. सर्व देवसैन्यानें श्रीदेवीची स्तुति करून हातांत धनुष्य, बाण, भाले, बरच्या, चक्रें, फरशा, इत्याद्यनेक शस्त्रें घेऊन दैत्यसेनेचा नाश करूं लागले. हें देवसेनेचें कृत्य पाहून तो प्रतापी तुंगभद्र हातांत गदा घेऊन देवसैन्यावर आला. त्यासरसें सर्व दैत्यसैन्य एकदम देवसैन्यावर चाल करून आलें. कोणी देवसैन्यावर बाण टाकूं लागले; कोणी बरच्या, भाले, मुद्गल, ताडवृक्ष, पर्वतांचे कडे, झाडें, इत्यादि वर्षाव करून पुनः देवसैन्य भयाभीत केलें. असे ते तुंगभद्र व स्वामीकार्तिक ह्यांचें महान् भयंकर युद्ध चाललें. अशा भयंकर युद्धांत स्वामीकार्तिकेयांनीं न गडबडतां त्या प्रतापवान् राक्षसावर इंद्रानें दिलेली शक्ती, जी त्रिभुवनांत विख्यात, ती मंत्रून सोडिली. ती अघटित शक्ती मोठ्या वेगानें जाऊन त्या तुंगभद्रराक्षसाच्या डोक्यावर अदळली! त्यासरसा मोठ्या

करण्यास सिद्ध झाले. अशी स्वामींची युद्ध करण्याची उत्सुकता पाहून तो तुंगभद्रराक्षस मनांत संतापून मोठ्या गंभीर स्वरानें कार्तिकस्वामींशीं शरयुद्धाच्या अगोदर वाग्युद्ध करूं लागला.

तुंगभद्र ह्मणाला, अरे, माझा भाऊ दंतुर यास तुह्मी दुष्टांनीं छल करून मारिला. अरे, तूं गरीब बापडा, हीन, दीन, तुला सेनापति कोणीं केलें? हे षंढ मरुद्गणांनो! अरे, तुह्मीं अझून रणपंडित भट पाहिला नाहीं. तुमचें देवांचें वीरत्व, युद्धकौशल्य, तुमचें सैन्य, ह्यांची महती कोठपर्यंत? जोंपर्यंत माझी भोंवई क्रोधाविष्ट होऊन नाचूं लागली नाहीं तोंपर्यंत. तुह्मां देवांच्या अंगांत जर कांहीं शूरपणाचें पाणी असेल तर मला दाखवा. नाहीं तर माझें हस्तकौशल्यकौतुक पहा. इतकें बोलून धनुष्याची प्रत्यंचा चढवून बाण लाविला, तेणेंकरून कार्तिकस्वामींस त्या बाणघातानें मूर्च्छा आली. मुख्य सेनापतीची अवस्था पाहून देवसैन्य दशदिशा लागलें, सर्व सैन्य थरथर कांपूं लागलें. ज्याप्रमाणें वायूच्या योगानें केळीचीं पानें कंपायमान होतात तसें देवसैन्य त्या तुंगभद्रराक्षसाच्या भयानें कंपायमान झालें. अशा भयंकर स्थितींत आपलें सैन्य पडलेलें पहातांच सेनापति कार्तिकेय आपली मूर्च्छा सांवरून, सावध होऊन त्यांनीं आपलें धनुष्य सज्ज केलें; व एक अर्धचंद्र बाण अशा जोरानें मारिला कीं, प्रथमच त्या तुंगभद्राच्या



रथाचा ध्वज कमलाच्या तंतूप्रमाणें छेदून टाकिला; व असा कांहीं अपूर्व पराक्रम दाखविला कीं, जो वर्णितां येत नाहीं. त्या तुंगभद्राचे कितीक रथ भग्न केले. शंभर धनुष्यें एकामागून एक अशीं कार्तिकस्वामींनीं भग्न केलीं. हा स्वामींचा पराक्रम पाहून देवांचें सैन्य पुनः स्वामीभोंवतीं साह्यार्थ जमा झालें. स्वामींनीं ह्या तुंगभद्रयोद्ध्याबरोबर तुमुल युद्ध केलें. त्याचे घोडे चार बाणांनीं मारिले. जेव्हां तो तुंगभद्र विरथ झाला, तेव्हां एका मोठ्या घोड्यावर बसून तो कार्तिकस्वामींशीं लढूं लागला. सर्व देवसैन्यानें श्रीदेवीची स्तुति करून हातांत धनुष्य, बाण, भाले, बरच्या, चक्रें, फरशा, इत्याद्यनेक शस्त्रें घेऊन दैत्यसेनेचा नाश करूं लागले. हें देवसेनेचें कृत्य पाहून तो प्रतापी तुंगभद्र हातांत गदा घेऊन देवसैन्यावर आला. त्यासरसें सर्व दैत्यसैन्य एकदम देवसैन्यावर चाल करून आलें. कोणी देवसैन्यावर बाण टाकूं लागले; कोणी बरच्या, भाले, मुद्गल, ताडवृक्ष, पर्वतांचे कडे, झाडें, इत्यादि वर्षाव करून पुनः देवसैन्य भयाभीत केलें. असे ते तुंगभद्र व स्वामीकार्तिक ह्यांचें महान् भयंकर युद्ध चाललें. अशा भयंकर युद्धांत स्वामीकार्तिकेयांनीं न गडबडतां त्या प्रतापवान् राक्षसावर इंद्रानें दिलेली शक्ती, जी त्रिभुवनांत विख्यात, ती मंत्रून सोडिली. ती अघटित शक्ती मोठ्या वेगानें जाऊन त्या तुंगभद्रराक्षसाच्या डोक्यावर अदळली! त्यासरसा मोठ्या

पर्वताचा कडा ढांसळतो ह्याप्रमाणें तो तुंगभद्रराक्षस गतप्राण होऊन भूमीवर अचेतन पडला. अशी राक्षसाची मृतावस्था पाहून त्याचें सैन्य हाहाकार करून दाही दिशांकडे पळूं लागलें. कोणी तर जागच्या जागींच मृत झाले. कोणी अर्ध मेले, कोणी मूर्च्छित, कोणी कंपित असे ते राक्षस भयभीत झाले.

ऋषींना अत्यानंद झाला. यक्ष, गंधर्व, किन्नर इत्यादिकांनीं तुंगभद्राच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून पुष्पवृष्टि केली. इंद्रास सेनापतिविजयाची सुवार्ता कळून मोठा हर्ष झाला.

कलिकालराक्षसास दूतांनीं हें वर्तमान कळवितांच तो अंतःकरणांत खिन्न होऊन क्षणभर मुक्यासारखा तटस्थ झाला. नंतर अत्यंत क्रोधाविष्ट होऊन डोळे गृध्रासारखे करून त्यानें कुशील नांवाचा तिसरा योद्धा पाचारिला. तो कुशील परम दारुण वीर होता. ती समोर येऊन त्यानें कलिकालास वंदन केलें; व समोर बसला. तेव्हां राक्षसेंद्र त्या कुशीलास ह्मणाला, हे कुशीला, तूं आतांचे आतां आपलें सैन्य घेऊन इंद्रास बांधून एथें आण ? अथवा त्याला मारून टाक ? सर्व दे- मार; हें कार्य तूं करशील काय ? देवपत्न्या माझ्या दासी होतील काय ? इतकें बोलणें ऐकून त्या कुशील राक्षसानें कलिकालास नमन केलें.

---



## भाग दहावा—कुशीलराक्षसाचा वध.

भारद्वाज ऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, त्या युद्धांत तुंगभद्रराक्षसाचा वध कार्तिकस्वामींनीं केल्यावर कुशीलराक्षस युद्धाकरितां समरांगणांत आला; त्याचें वर्तमान सर्व सांगावें. व्यास ह्मणालेः—त्या कलिकालानें तो कुशील सशस्त्र, ससैन्य देवसेनेच्या पराजयाकरितां पाठविला. तो कुशील पेटलेल्या अग्निज्वालेसारख्या लालभडक डोळयांचा, युद्धविद्यानिपुण, त्या रणांगणांत येऊन उभा राहिला. सर्व देवांस युद्धाकरितां त्या राक्षसानें पाचारण केलें. इकडे तो प्रतापी इंद्र ऐरावतावर बसून सर्व शस्त्रास्त्रांनिशीं सिद्ध झाला. इंद्राचें सैन्य असें होतेंः—तीनकोटी वायुवेगासारखे रथ, सहा कोटी हत्ती, नऊ कोटी घोडे, अठरा कोटी पायदळ; ह्यांत हत्ती महा मदोन्मत्त, रथांवर रथी तसेच योद्धे, घोडे अत्यंत वेगवान्, पायदळ तसेंच युद्धकुशल; अशा सैन्यासह तो सुरपति इंद्र चतुरंग सेना सज्ज करून युद्धास आला. गंधर्व गायन करूं लागले. अप्सरा नृत्य करूं लागल्या. दोन्हीकडचे वीर महान् भयंकर सिंहनाद करूं लागले. देवदैत्यांचीं दोन्ही सैन्यें युद्धास तयार झालीं. कुशील वीर आलेला पाहून इंद्रानें आपले सेनापति यांस सैन्याची रचना करण्यास सांगितलें. सेनापति कार्तिक यांनीं वरुणासह रणांत ठाण दिलें. आपलीं सुवर्णकोटीचीं धनुष्यें सज्ज केलीं. प्रथमतः त्या दैत्याचा ध्वज देवांनीं

अद्भुत कर्म करून छेदिला. हें पाहून त्या कुशील-
राक्षसास अत्यंत क्रोध येऊन त्याचें सर्व सैन्यही फारच
क्रोधाविष्ट झालें. मुद्गरबाण हजारों सुटूं लागले. देवांचा
घात करण्याकरितां शेंकडो शक्ति, हजारों पट्टे, शत्रूवर
सोडूं लागले. कोणी पाशांनीं आपापले शत्रू बद्ध करूं
लागले. कोणी हत्तींचे अंकुश हातीं धरून त्यांनीं देवांस
ओढूं लागले. कोणी मोठमोठे दंड घेऊन चंड पराक्र-
मानें देवांस खंडविखंड करूं लागले. कोणी तरवारीनें
शत्रू ताडूं लागले. कोणाच्या शरीरांतून रक्ताचे पूर
वाहूं लागले. कोणाच्या कटि भग्न झाल्या. कोणाच्या
छातीस भोकें पडलीं. कोणाचीं शरीरें द्विभाग झालीं.
कोणाचे हात तुटले. कोणाचीं मस्तकें तुटलीं. ह्याप्रमाणें
त्या देवसैन्यावर कुशीलराक्षसानें मोठा जुलूम केला.
देवांचें सैन्य आठ कोस हटविलें. देवांनीं हाहाकार क-
रून संकटकाळीं श्रीदेवीचें स्तवन केलें तें:—हे जननी,
ह्या दुःखांत तुजवांचून दुसरें कोण आह्मांस तारणार
आहे ? ह्याप्रमाणें देवांनीं हातपाय गाळलेले पाहून इंद्र
अति संतापून सर्व देवांची निर्भत्सना करूं लागला. तो ह्म-
णाला, अरे, तुह्मी देव असून ह्या असुरांस भिऊन पळतां
काय ? इंद्राचें भाषण ऐकून देवांच्या सैन्यानें उल्हसून
आतां राक्षसांचा नाश करूं अशा प्रतिज्ञेनें दानवसैन्या-
वर शस्त्रास्त्रांचा भडिमार केला. भाले, तरवारी, चक्रें,
बाण, गोफणी, गदा, तोमरें, मुसळे, ह्या शस्त्रांच्या मारांनीं



राक्षस बेजार केले. तरवारीनें कोणाचे हात, पाय, कान,
नाक, कंबर इत्यादि अवयव तोडिले. कोणाचे अश्व
मारिले; कोणीं हत्तींचे शुंडादंड तोडिले. कोणाचे रथ
मोडून फस्त केले. ह्या प्रकारचें तुमुल रणकंदन अवलोकन
करून कुशीलराक्षस फार संतापला. तो आपल्या सै-
न्यास ह्मणाला, अरे महादैत्यांनो, तुह्मी मोठे योद्धे ह्म-
णून कलिकालानें मला तुमचा सेनापति करून ह्या दे-
वांवर पाठविलें; असें असतां तुह्मी आपलें भयंकर स्वरूप
टाकून पळतां हें काय ? तुह्मां सगळयांना ह्या देवांनीं
जर्जर करावें ह्या गोष्टीची तुमच्या मनांत लाज वाटत
नाहीं काय ? अरे, हे देव ह्मणजे आपलें भक्ष्य ! ह्या भ-
क्ष्यानें भक्षकांवर प्रहार करणें हें किती शरमेचें काम आहे ?
आतां तुह्मी पुनः देवांवर चाल करा व माझा पराक्रम पहा ?

ह्याप्रमाणें त्या कुशीलराक्षसानें भाषण करून आपलें
धनुष्य हातांत घेऊन त्यास अति तीक्ष्ण बाण लाविला.
तो बाण देवसैन्याचा मुख्य जो कुबेर त्या कुबेरावर सो-
डिला. त्या बाणाच्या योगानें एक पलभर कुबेरास
मूर्च्छा आली. ती मूर्च्छा सांवरून कुबेर सावध झाल्यावर
पुनः राक्षसासीं युद्धाकरितां तयार झाला. त्या राक्ष-
साचा पराक्रम पाहून कुबेर अति संतापून त्यानें आपल्या
धनुष्यास बाण लावून तो आकर्ण ओढून कुशीलराक्ष-
सावर सोडिला. हा बाण नव्हता तर साक्षात् यमाचा
पाशरूप होता. त्या बाणानें कुशीलराक्षसाचा कंठनाल

एकदम उडविला व वरुणानें आपला शत्रु जो कुशील तो गतप्राण केला. त्याचें मस्तक छेदिल्याबरोबर तो म-हावळी कुशील प्राणास मुकून त्याचें तें धड युद्धभूमीवर धाडदिशीं आपटलें. कुशील मरण पावला हें ऐकून सर्व देव, ऋषि, तपोधन, सर्व लोक, दिक्पालादिकांस अत्या-नंद झाला.

कुशीलराक्षस मेल्याचें वृत्त ऐकून कलिकालराक्षस फारच खिन्न झाला. नंतर त्या बुद्धिमान् कलिकाल-राक्षसानें देवांशीं युद्ध करण्यास कोलासुरनामक प्रचंड वीर बोलाविला. स्वामिआज्ञेप्रमाणें तो कोलासुरदैत्य दे-वांशीं युद्ध करण्याची स्वामीची इच्छा तृप्त करण्यास कलिकालाच्या समोर प्राप्त झाला. असा हा कुशील दैत्य वरुणाच्या हस्तें मरण पावला, हा ह्या भागांतील सारांश आहे.

---

## भाग अकरावा—कोलासुरसेनासज्जीकरण, व त्याचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारिलें कीं, वरुणानें पाशबंध करून त्या कुशीलदैत्यास मारिल्यानंतर पुढें काय झालें तें सांगावें. तेव्हां व्यास ह्मणाले, तो कुशील मेल्या-नंतर कलिकालानें कोलासुर नांवाचा मोठा योद्धा देवां-वर पाठविला. तो कलिकालाच्या समोर येतांच त्याला



त्यानें मोठें सैन्य दिलें. साठ हजार रथ, मत्त झालेले हत्ती साठ हजार, दोन लक्ष घोडे, अमित पायदळ असें अमित सैन्य घेऊन तो कोलासुर ज्या वेळीं रणांत येण्यास निघाला, त्या वेळीं त्या वीरांचे सिंहनाद, घोड्यांचें खिखाळणें, भेरींचे दणदण आवाज, ह्यांनीं सर्व दशदिशा व आकाश गर्जवून सोडिलें! सूर्य निस्तेज झाला! आकाश धुळीनें व्यापिलें! सर्व पृथ्वी कंपायमान झाली! पर्वतही दोल्यांसारखे डोलूं लागले! ऋषिगण त्रस्त झाले! ऋषिपत्न्या भयकंपित झाल्या! ह्याप्रमाणें तें टोळधाडीसारखें सैन्य देवांबरोबर युद्ध करण्यास निघालें. हें इंद्रानें पाहून त्या कोलासुर-राक्षसास मारण्यास समर्थ असा जो जयंत नांवाचा प्रिय पुत्र त्यास पाचारण करून इंद्र त्यास ह्मणाला, पुत्रा, आज आपणाशीं युद्ध करण्यास कोलासुर नामक योद्धा तयार होऊन आला आहे. ह्या दुष्ट राक्षसांनीं देव, ऋषि, तपोधन वगैरे सात्विकांस अत्यंत पीडा दिली आहे. यज्ञ विध्वंसिले, आपणां सर्वांचे हविर्भाग ह्यांनीं नेले, अग्निहोत्रें छिन्न केलीं, पुण्यक्षेत्रें दूषविलीं; ह्याप्रमाणें शेंकडों प्रकारें आपणां सर्वांस त्रास दिला. ह्या राक्षसांचा मुख्य नायक कलिकाल अत्यंत दुष्ट आहे. त्याचाच हा आलेला राक्षस मोठा आवडता मित्र आहे. ह्या राक्ष-साशीं युद्ध करण्यास तूं जाऊन ह्याचा नाश कर. ह्यांनीं जे मोठमोठे हत्ती आणिले आहेत, ते दिग्गज असून त्यानें बलात्कारानें नेऊन हल्लीं आपणांबरोबर लढण्यास ते

एकदम उडविला व वरुणानें आपला शत्रु जो कुशील तो गतप्राण केला. त्याचें मस्तक छेदिल्याबरोबर तो महाबळी कुशील प्राणास मुकून त्याचें तें धड युद्धभूमीवर धाडदिशीं आपटलें. कुशील मरण पावला हें ऐकून सर्व देव, ऋषि, तपोधन, सर्व लोक, दिक्पालादिकांस अत्यानंद झाला.

कुशीलराक्षस मेल्याचें वृत्त ऐकून कलिकालराक्षस फारच खिन्न झाला. नंतर त्या बुद्धिमान् कलिकालराक्षसानें देवांशीं युद्ध करण्यास कोलासुरनामक प्रचंड वीर बोलाविला. स्वामिआज्ञेप्रमाणें तो कोलासुरदैत्य देवांशीं युद्ध करण्याची स्वामीची इच्छा तृप्त करण्यास कलिकालाच्या समोर प्राप्त झाला. असा हा कुशीलदैत्य वरुणाच्या हस्तें मरण पावला, हा ह्या भागांतील सारांश आहे.

---

## भाग अकरावा—कोलासुरसेनासज्जीकरण व त्याचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारिलें कीं, वरुणानें पाशबद्ध करून त्या कुशीलदैत्यास मारिल्यानंतर पुढें काय झालें तें सांगावें. तेव्हां व्यास ह्मणाले, तो कुशील मेल्यानंतर कलिकालानें कोलासुर नांवाचा मोठा योद्धा देवांवर पाठविला. तो कलिकालाच्या समोर येतांच त्यास



त्यानें मोठें सैन्य दिलें. साठ हजार रथ, मत्त झालेले हत्ती साठ हजार, दोन लक्ष घोडे, अमित पायदळ असें अमित सैन्य घेऊन तो कोलासुर ज्या वेळीं रणांत येण्यास निघाला, त्या वेळीं त्या वीरांचे सिंहनाद, घोड्यांचें खिंखाळणें, भेरींचे दणदण आवाज, ह्यांनीं सर्व दशदिशा व आकाश गर्जवून सोडिलें! सूर्य निस्तेज झाला! आकाश धुळीनें व्यापिलें! सर्व पृथ्वी कंपायमान झाली! पर्वतही दोल्यांसारखे डोलूं लागले! ऋषिगण त्रस्त झाले! ऋषिपत्न्या भयकंपित झाल्या! ह्याप्रमाणें तें टोळधाडीसारखें सैन्य देवांबरोबर युद्ध करण्यास निघालें. हें इंद्रानें पाहून त्या कोलासुरराक्षसास मारण्यास समर्थ असा जो जयंत नांवाचा प्रिय पुत्र त्यास पाचारण करून इंद्र त्यास ह्मणाला, पुत्रा, आज आपणाशीं युद्ध करण्यास कोलासुर नामक योद्धा तयार होऊन आला आहे. ह्या दुष्ट राक्षसांनीं देव, ऋषि, तपोधन वगैरे सात्विकांस अत्यंत पीडा दिली आहे. यज्ञ विध्वंसिले, आपणां सर्वांचे हविर्भाग ह्यांनीं नेले, अग्निहोत्रें छिन्न केलीं, पुण्यक्षेत्रें दूषविलीं; ह्याप्रमाणें शेंकडों प्रकारें आपणां सर्वांस त्रास दिला. ह्या राक्षसांचा मुख्य नायक कलिकाल अत्यंत दुष्ट आहे. त्याचाच हा आलेला राक्षस मोठा आवडता मित्र आहे. ह्या राक्षसाशीं युद्ध करण्यास तूं जाऊन ह्याचा नाश कर. ह्यांनीं जे मोठमोठे हत्ती आणिले आहेत, ते दिग्गज असून त्यानें बलात्कारानें नेऊन हल्लीं आपणांबरोबर लढण्यास ते

आणून आपणांस हे दुष्ट राक्षस लाजवीत आहेत. आतां तूं ह्या दुष्ट राक्षसांबरोबर युद्धास जा. हें पित्याचें भाषण ऐकून जयंतानें उठून पित्यास वंदन केलें, व आपणाबरोबर सैन्य घेतलें. तें दोन कोटी रथ, तीन कोटी हत्ती, पांच कोटी घोडे–हें सैन्य भेद करणारें–दहा कोटी घोडेस्वार, मोठे योद्धे, सर्व वीर युद्धकुशल असें हें सैन्य घेतल्यावर जयंत पित्याची आज्ञा मागूं लागला. तेव्हां इंद्रानें पुनः पुत्रास उपदेश केला कीं, हे शूर पुत्रा, तूं हें चतुरंगदळ घेऊन शत्रूस आपला पराक्रम दाखवून ये. हें ऐकून पुनः जयंतानें पित्यास वंदन करून त्या सर्व सेनेचें सेनापतित्व स्वीकारून युद्धभूमीच्या ठायीं तो जयंत आपल्या सेनेसह आला.

जयंतानें कोलासुराकडे आपला दूत पाठवून त्यास आपण युद्धास आल्याचें वृत्त कळविण्यास सांगितलें. कोलासुराचा दूतही त्याचप्रमाणें जयंताकडे आला. जयंताकडील दूतानें कोलासुरास सैन्याची स्थिति, युद्धास आलेला जयंतवीर वगैरे सांगितल्यावर तो मदोन्मत्त कोलासुर मोठी गर्जना करून ह्मणाला, अरे, मी प्रतापी वीर असून माझ्यासमोर हें मूल युद्धाकरितां येत आहे! ह्या मुलानें कोणाशीं युद्ध केलें? निजलेल्या सिंहास पाय लावून जी स्थिति त्या पादस्पर्श करणाराची होते, तीच स्थिति ह्याची होईल. हें मूर्ख पोर कापसासारखें असून मी मेरूसारखा हें न जाणून मजशीं तुलना करण्यास प-



हात आहे काय? किंवा ह्याचें आयुष्य सरलें ह्मणून हें महाभुजंगाचा मुका घेण्यास धांवत आलें आहे! असो. आतां ह्यास मी कौतुक दाखवितों. ह्याप्रमाणें दूताशीं भाषण केल्यावर त्या दूतानें हें सर्व वर्तमान जयंतास कळविलें. जयंतानें हें ऐकून राक्षसाच्या मूर्खत्वाचें दिग्दर्शन समजून समाधान मानिलें. व आपलें सैन्य सिद्ध करून युद्धाकरितां तो सिद्ध झाला.

पुनः भारद्वाजऋषींनीं व्यासांस प्रश्न केला कीं, त्या कोलासुराशीं जयंताचें युद्ध कोणत्या प्रकारानें झालें तें मला सांगावें. व्यास ह्मणाले, तो युद्धविद्यानिपुण कोलासुर सैन्यानिशीं जयंतावर चालून आला. तेव्हां नौबदी, रणभेरी, युद्ध करणारांस स्फुरण आणणारीं वाद्यें, ह्यांचा एकच घोष झाला. हत्तीशीं हत्ती, घोडेस्वाराशीं घोडेस्वार, रथ्याबरोबर रथी, पायदळाबरोबर पायदळ असे एकवटून मोठें तुंबळ युद्ध झालें. शेंकडों, हजारों वीर महावेगानें इकडून तिकडे व तिकडून इकडे धांवूं लागले. जयंताकडील वीर कोणी भाले, कोणी गदा, कोणी तरवारी, कोणी तोमरें, कोणी मुसळें, कोणी गोफणी, कोणी शक्ति, कोणी पट्टिश इत्यादि शस्त्रें घेऊन राक्षसांबरोबर युद्ध करूं लागले. हजारों राक्षसांचीं मस्तकें तुटून पडलीं. ह्याप्रमाणें हें मोठें तुमुल व भयंकर युद्ध झालें. एकमेकांचीं तोंडें एकमेकांस दिसेनाशीं झालीं. कोणाचीं धनुष्यें मोडलीं. कोणाच्या घोड्यांचे लगाम

तुटून घोडे सैरावैरा पळूं लागले. कोणी भाल्यांनीं टोंचल्यामुळें विव्हळ होऊन पडले. कोणी रथांच्या चाकांखालीं चेंगरले. कोणी मुसळांच्या दणक्यानें घायाळ होऊन पडले. कांहीं हत्ती भग्नदंत होऊन पळूं लागले. कोणी राक्षस गोफणगुंड्यांच्या सपाट्यासरसे पडले. कोणाच्या शरीरांतून रक्त वाहूं लागलें. कोणाचें अर्धेंच शरीर तुटून गेलें. ह्याप्रकारें देवसैन्यानें राक्षससैन्याची धूळधाण केली.

दैत्यसेनेच्या आक्रोशानें सर्व युद्धभूमि नादित झाली. ज्या राक्षसास जी वाट दिसेल त्या वाटेनें ते भयभीत होऊन पळूं लागले. पुष्कळ सैन्य तर खपलेंच, परंतु जें राहिलें त्यांतील वीर फुललेल्या पळसाच्या झाडासारखे रक्तमय दिसूं लागले. ही सैन्याची दीनावस्था पाहून कोलासुरराक्षस मोठ्यानें ओरडला. त्यानें आपल्या वीरांस धिक्कारून ह्मटलें, अरे, तुह्मी वीर असून पळतां, ह्याची लाज वाटत नाहीं काय ? हें आपल्या सेनापतीचें भाषण ऐकून ते महाबलवान् दैत्य एकदम उलटले. त्यांत कोणी पंचतालासम उंच, कोणी दीर्घदंत, कोणी रक्तनेत्र, कोणी महाक्रोधी, कोणी मोठे वेगवान्, कोणी ऊर्ध्वकेशी, कोणी मोठमोठे मुद्गल हातीं घेतलेले, कोणी तालवृक्ष हातांत घेऊन, कोणी मोठमोठे पाषाण घेऊन देवसैन्यावर धांवले. कोणी ढालीतरवारी, कोणी तोमरें, कोणी मुसळें घेऊन युद्ध करूं लागले. कोणी महाभयंकर, कोणाचें पोट जसा मोठा तलाव, कोणी सिंहासारख्या तोंडाचे, कोणी नानारूपें धरणारे असे लक्षावधि राक्षस देवांबरोबर युद्ध करूं लागले. तोमरें, कुऱ्हाडी, मुद्गल, अंकुश इत्यादि शस्त्रांनिशीं देवांवर राक्षस चालून आले. त्या वेळीं सर्व पृथ्वींत अंधकार पडला; इतका धुरळा त्या युद्धामध्यें झाला. त्या राक्षसांनीं एकच गर्दी केली. पण जयंतवीर महान् पराक्रमी ! त्यानें अगदीं न गडबडतां आपला रथ ह्या राक्षसांच्या मध्यभागीं आणून उभा केला; व असें भयंकर कर्म केलें कीं ज्यानें सर्व देवांस हर्ष दिला. दैत्यांस आधीं थोडी भाषणांची मात्रा देऊन मागाहून मृत्युलोकाची यात्रा दाखविली. जयंत त्या कोलासुरास ह्मणाला, अरे, तूं माझा पराक्रम न जाणून युद्धाचे अगोदर वाटेल तशी वल्गना केलीस. आतां तुला पराक्रम दाखवितों तो पहा. असें बोलून अर्धचंद्र बाण धनुष्याशीं लावून त्या कोलासुरावर सोडिला. त्या बाणानें त्या राक्षसास मूर्च्छा आली. पुनः दुसऱ्यानें आपल्या धनुष्यास बाण लावून तें आकर्ण ओढून अशा जोरानें कोलासुरावर बाण सोडिला कीं, त्या बाणासरसें त्या राक्षसाचें हृदय विदारण होऊन तो जमिनीवर मरून पडला. त्या वेळीं त्याच्या सैन्यांत हाहाःकार होऊन उरलेलें सैन्य पळूं लागलें. देवांचा जय झाल्याचें पाहून ऋषि, मुनि आनंदित झाले. आकाशांतून जयंतवीरावर व देवसैन्यावर पुष्पवृष्टि झाली. गंधर्व गायन करूं लागले. ह्याप्रमाणें सर्व आनंदीआनंद झाला.



---

## भाग बारावा—कलिकालराक्षसाचें वर्णन आणि वज्रेश्वरीप्रादुर्भाव.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें कीं, कोलासुर-राक्षसास जयंतानें मारिल्यानंतर पुढें युद्धाचें कसें वर्तमान झालें तें कृपा करून मला सांगा. हें भारद्वाजऋषींचें भाषण ऐकून त्यांस व्यास ह्मणाले, त्या महाबलवान् कलिकालास कोलासुर मरण पावल्याचें वर्तमान ऐकून फार वाईट वाटलें. जलावांचून जसा मासा तडफडतो, त्याप्रमाणें तो कलिकाल तडफडूं लागला. कोणांशीं भाषण न करितां जागचे जागीं तटस्थ झाला. आणि आपल्या मनांत ह्मणूं लागला कीं, काय, माझ्या तपश्चर्येचें हेंच फळ ! शंकरानें कांहींच केलें नाहीं ! अशी चिंता करून शुद्ध मनानें त्या कलिकालराक्षसानें श्रीशंकराचें चिंतन केलें. तें असें—जय जय उमापति शंभो, महारुद्रा, चंद्रशेखरा, त्वां दिलेला वर कांहींच फलद्रूप झाला नाहीं. हे देव तर जो जो वीर मी पाठवितों त्याचा नाश करीत आहेत, हा माझ्या मनाचा पूर्ण निश्चय झाला आहे. आतां मी तुझ्या चरणाचा सेवक वर मागतों तो कृपा करून मला दे. मला सहस्रभुजा शस्त्रसहित देऊन देवांच्या शस्त्रांनीं माझ्या देहास किंचित् इजा होऊं नये हें देणें दे. देवांचीं आयुधें मी गिळून टाकीन असें मला शक्तिमान् कर. शेंकडोंशें देवांचा मीं पराजय करावा, इंद्राची शक्ति मजपुढें कुंठित व्हावी, त्या इंद्राचा मज-



कडून पराजय व्हावा. ही त्या कलिकालाची प्रार्थना ऐकून तो कृपानिधि सांब कौतुक करिता झाला. तें असें कीं, त्या राक्षसास सहस्रभुजा शस्त्रांसहित अर्पण केल्या, त्यास शंभर मस्तकें दिलीं, त्या शंभर मस्तकांवर शंभर सुशोभित मुगुट दिले; त्याचप्रमाणें त्या मुगुटांवर छत्रें दिलीं. जें जें त्या कलिकालानें मागितलें तें तें शंकरानें त्यास तत्काल दिलें. एक योजन विस्तीर्ण असा देह त्या कलिकालास प्राप्त झाला. महाभयंकर भुजा, नानाविध भूषणें, चतुरंग बळ असें शंकरकृपेनें त्यास प्राप्त झालें. शंभर इंद्रांस न जुमानील असा तो बलिष्ठ झाला. महामदोन्मत्त हत्ती जसा आपलें देहभान विसरतो, त्याप्रमाणें तो कलिकाल मदोन्मत्त झाला. त्याचें तें सर्व सैन्यही मोठमोठ्या शस्त्रांनिशीं सिद्ध झालें. तो कलिकाल असें ह्मणाला कीं, मजवांचून आतां दुसरा कोणीच मोठा नाहीं. त्यानें एक विशाल दर्पण आपल्यापुढें ठेवून आपलें तें अक्राळविक्राळ रूप पाहिलें, त्या वेळीं तो गर्जना करून मोठ्या स्वरानें ह्मणाला, अरे, केवढें हें माझें थोर रूप ! किती माझें शरीर उंच ! ही रावणाची लंका मला किती जवळ दिसते ! हा सोन्याच्या शिखरांचा मेरुपर्वत ! ही वाराणशी मोक्षपुरी ! हें बदरीवन ! हें मानससरोवर, पहा एका लहानशा बिंदूसारखें दिसतें ! ही भागीरथी समुद्रास मिळाली आहे ! असे चमत्कार तो आपल्या उंच शरीरप्राप्तीच्या योगानें पाहून लोकांस

सांगूं लागला. अशा प्रकारचें अद्भुत रूप पाहून तो राक्षस मोठा आनंदित झाला; व शंभर मुखांनीं हास्य करून त्यानें मोठा सिंहनाद केला. तो नाद होतांच समुद्र खवळले. पृथ्वी, पर्वत डोलूं लागले. त्याचें तें भयंकर रूप इंद्रानें पाहून जशी वाऱ्यानें केळ थरथरां कांपते तसा इंद्र कांपूं लागला. सर्व ऋषि मूर्च्छित झाले. कोणी कंपायमान झाले. कांहीं तपोधन विप्र त्या तुंगपर्वतावर जाऊन बसले. तो कलिकाल आतां सर्व जग भक्षितो कीं काय, असें सर्व जनांस वाटूं लागलें. त्या राक्षसाच्या सैन्याच्या नादानें पृथ्वी व आकाश दणाणून गेलीं. सर्व दशदिशांस सैन्यच सैन्य होऊन गेलें. सैन्यरूपानें ही पृथ्वी चालते कीं काय असें वाटलें. त्या कलिकालाच्या आज्ञेप्रमाणें सैन्याचा व्यूह करून युद्धास तयार झाल्यावर तें सैन्य मोठें प्रचंड दिसूं लागलें. इंद्रानें ह्याप्रमाणें दैत्याच्या सैन्याची स्थिति पाहून आपल्या वीरांस पाचारिलें. तेव्हां इंद्र ह्मणाला, हें अजिक्य सैन्य व हा भयंकर राक्षस आपणांस सहज पराजित करील; ह्यास्तव आपण श्रीदेवीचें स्तवन करावें. त्या वेळीं इंद्रादिदेवांनीं देवीचें स्तवन केलें तें:—हे जगद्धात्रि, सृष्टिस्थित्यंतकारिणि, आदिमाये, विशालनेत्रे, आमच्या ह्या संकटाचा क्षय कर. अशी प्रार्थना करून आपल्या चतुरंग दळाचा व्यूह केला. ऐरावतावर बसून इंद्र युद्धास तयार झाला. ह्याप्रमाणें हें कलिकालवर्णन व्यासांनीं सांगितल्यावर पुनः भारद्वाजऋ-



षींनीं व्यासांस प्रश्न केला कीं, दोन्ही दळें सिद्ध होऊन पुढें युद्ध कशा प्रकारचें झालें तें सांगा. व्यास ह्मणाले, देव तें राक्षसांचें भयंकर सैन्य पाहून मोठ्या धैर्यानें युद्धास सिद्ध झाले.

कलिकालानें पूर्वीं देवांनीं केलेला पराक्रम मनांत आठवून विचार केला कीं, ह्या देवांच्या ठायीं इतका प्रताप असण्याचें कारण मला हे ब्राह्मणांचे पुण्यमार्ग दिसतात. तर हें युद्ध समाप्त होईपर्यंत हे ब्राह्मण आणून कोंडावे ह्मणजे बरें होईल. हें कलिकालाचें वाक्य त्याच्या प्रधानानें ऐकून तो ह्मणाला, महाराज, अशा क्षुल्लक कारणानें शत्रूस जिकणें चांगलें नाहीं. शूरांचा पुरुषार्थ हाच कीं, युद्ध करून शत्रु जिंकावे. हें भाषण ऐकून कलिकालानें मंत्र्याची स्तुति केली. नंतर तो मंत्र्यास ह्मणाला, आजच्या युद्धांत देवांची पूर्ण विटंबना करीन. दिक्पालांस धुळीस मिळवीन. ह्या देवांची काय स्थिति होईल ती मला सांगतां येत नाहीं. असें भाषण करून दोन्ही सैन्यें युद्ध करूं लागलीं. असंख्य रथ, पायदळ, घोडेस्वार सिद्ध झाले. भाले, बरच्या, मुसळें, मुद्गल, गदा, गोफणी, चक्रें, बाण, अशीं अनेकविध शस्त्रें वीरांनीं हातांत घेऊन ते तयार झाले. ह्या वीरांच्या चरणधूलीनें सूर्य दिसेनासा झाला. रथावरून युद्ध करणारे वीर रथ्यांबरोबर युद्ध करूं लागले. हजारों बाणांची वृष्टि होऊं लागली. दोहींकडचे मोठमोठे वीर रणांत पडूं ला-

गले. राक्षससैन्य देवांनीं पुष्कळच घायाळ केलें. हें पाहून त्या कलिकालानें आपला रथ पुढें आणिला. नंतर त्यानें असें भयंकर युद्ध केलें कीं, तें सांगतांच येत नाहीं. तो हजार भुजांचा महावीर फार चवताळला. मुद्गलांच्या योगानें पर्वतांचें चूर्ण केलें. ताडवृक्षांनीं व गदेच्या घायानें त्यानें देवसैन्य जर्जर केलें. देवांनीं त्या राक्षसांवर मोठमोठे पाश टाकावे, पण त्यांनीं ते सहज कमलनालासारखे तोडून फेंकून द्यावे. इतक्यांत हातांत तोमर घेऊन मेषावर आरूढ होऊन अग्नि त्या दैत्याशीं लढूं लागला. वायु आपलें भयंकर झंझास्वरूप धारण करून राक्षसाशीं युद्ध करूं लागला. त्यानें आपल्या अतुल शक्तीनें जशी कुऱ्हाड झाडें तोडिते, त्याप्रमाणें पुष्कळ राक्षससैन्य पाडिलें. त्या वायूवर दैत्य फारच प्रहार करूं लागले व त्यास आकर्षूं लागले. इतक्यांत तो कुंभकरूप वायु त्यांच्या गुदद्वारांतून बाहेर निघून गेला. अशा भयंकर समयास इंद्रानें त्या कलिकालावर नागास्त्र मंत्रून टाकिलें. तेणेंकरून कोट्यावधि नाग त्या दैत्याचे सेनेस वेढून टाकूं लागले. त्या कलिकालास तर त्या नागांनीं असें त्रासविलें कीं सांगतां पुरवत नाहीं. कोणी त्याच्या कानांत, कोणी नाकांत, कोणी कोठें, कोणी कोठें असे शिरूं लागले. इंद्रानें आणखी बाण सोडून त्या नागांची वृद्धि केली. त्या कलिकालाचीं छत्रें छेदून खालीं पाडिलीं. हें पाहून तो राक्षस इंद्रावर फार क्रो-



धायमान झाला. नंतर इंद्रही त्यावर अनेक अस्त्रें सोडूं लागला. तेव्हां त्या कलिकालानें शक्राचीं नानाप्रकारचीं शस्त्रें व अस्त्रें गिळून टाकिलीं. अशा प्रकारें त्या कलिकालराक्षसाशीं एकवीस दिवस इंद्रानें युद्ध केलें. इंद्राचीं कोट्यावधि शस्त्रेंअस्त्रें गिळून फक्त एक वज्र मात्र त्याजपाशीं शिल्लक राहिलें. सर्व देव, ऋषि त्रासून गेले. इंद्र अत्यंत संतापला, व आपलें तें वज्र इंद्रानें अति जोरानें त्या कलिकालाच्या मस्तकावर आपटिलें. तें वज्र अशा जोरानें मारिल्यावर भग्न झालें. भग्न होण्याबरोबर महान् तेजस्वी, महद्रूप अशी वज्रेश्वरी नामक देवी त्या भग्न झालेल्या वज्रांतून एकदम प्रगट झाली. ती महादेवी वज्रेश्वरी प्रगट होऊन भाषण करूं लागली कीं, 'मी द्विभुजांची देवी सर्व देवांस व ऋषींस वरदायिनी आहें. भक्तांच्या अभयार्थ व दैत्यांच्या प्राणनाशार्थ मी अवतीर्ण झालें.' त्या वेळीं सर्व देवऋषी त्या देवीच्या रूपास पाहून हर्षित झाले. देवांनीं वस्त्रें, समुद्रानें रत्नें, हिमवानानें भूषणें, बसण्यास सिंह, भूषणार्थ काजळ वगैरे, चंद्रानें चंद्रलांछन, सहस्राक्षानें आयुधें, कुबेरानें पानपात्र, अशा प्रकारचे सर्व पदार्थ देऊन, गंध, पुष्पें, धूप, दीप, नैवेद्यादि अर्पून पूजा केली. ह्याप्रमाणें दुःखदारिद्र्यनाशन करणाऱ्या जगदंबेचा देवांनीं पूर्ण सन्मान केला. जी वज्रेश्वरी महामाया, भक्तांचें संकट हरण करण्याकरितां, दैत्यांचा दर्पनाश करण्यास्तव, देवांचें व ऋषींचें भय दूर

करावें ह्मणून ह्या लोकीं अवतीर्ण झाली, ती अवलोकन करून सर्व देवगणांनीं पुनःपुनः तिला नमस्कार केला. ह्याप्रमाणें वज्रेश्वरी देवी उत्पन्न झाली. हा सारांश ह्या भागांत आला आहे.

---

## भाग तेरावा.

## श्रीवज्रेश्वरीच्या हस्तें दुर्धर, सिंहवक्र आणि लोहिताक्ष राक्षसांचा वध.

इंद्राच्या वज्रापासून श्रीवज्रेश्वरी देवी उत्पन्न झाल्याबरोबर सर्व देवांस अत्यानंद झाला, व ते देव श्रीदेवीची स्तुति करूं लागले. ती स्तुति अशीः—'हे महामाये वज्रेश्वरी देवी, तुला नमस्कार असो. तूं भक्तांची वरदायिनी व सर्व जनांची जननी आहेस. तूं सर्व देवऋषि, शुद्ध मनाचे नर ह्यांची गति, तूं दीनजनांचें भयनाशन करणारी, अशी आहेस. सांप्रत ह्या कलिकालराक्षसानें आह्मांस फार क्लेश दिले आहेत; ह्या क्लेशांचें निवारण करून ह्या दुःखांतून आमचें रक्षण कर. तूं स्वतः निर्गुण असून आह्मांस्तव सगुण रूप धरिलें आहे. हें सर्व चराचर तुझ्या स्वाधीन असून तूं संतुष्ट झाल्यावर हें सर्व जग संतुष्ट होतें. हें तुझें अद्भुत रूप कोण वर्णन करील! अशा प्रकारची परात्परदेवता तूं असून सर्व मुनीश्वर तुझें ध्यान करितात. सर्व लोकांस वरप्रदान द्यावें, ह्याप्रमाणें तुझें मानस उदार आहे. आह्मी सर्व



अत्यंत क्लेशानें पीडित झालों आहों!! हें कलिकालराक्षसरूप शेंडेनक्षत्र सर्व लोकांस पीडित आहे. ह्याचा नाश कर.

हें देवांचें स्तुतिपर भाषण ऐकून मेघासारख्या गंभीर वाणीनें श्रीदेवी बोलती झाली. आज सर्व देव निष्काळजी झाले, आजपासून तुमचें भय पळालें. सिद्ध, साधक, ऋषि हे सर्व निःशत्रु झाले. आतां ब्राह्मण सुखानें यज्ञकर्मे करतील व त्यांचे हविर्भाग देव गृहण करतील. निश्चयानें तुह्मां सर्वांस मी वरप्रदान देतें कीं, तुह्मी सर्व निर्भय रहा. आतां ह्यापुढें मी माझा शत्रु जो कलिकाल ह्याचा नाश करितें. असें बोलून श्रीवज्रेश्वरी युद्धभूमीचे स्थानीं प्राप्त होऊन युद्धाचे आरंभीं दैत्याकडे एक दूत तिनें पाठविला. त्या दूतास सांगितलें कीं, तूं दैत्याकडे जा, व त्यास असें सांगः—हे महाअसुरा, तूं गर्वानें उन्मत्त झाला आहेस. तर तुझ्या सर्व मदोन्मत्त राक्षसांसुद्धां युद्धास ये. तुह्मां सर्वांचा नाश मी करीन. ह्याप्रमाणें दूतानें राक्षसास वृत्तांत कळविला. दैत्यांनीं आपल्या मंडळींत दूताच्या मुखचें वर्तमान ऐकून हास्य केलें; व त्या कलिकालानें दूतास प्रत्युत्तर दिलें तेंः— अरे, मी हजार बाहू धारण करणारा! शंभर मुखांचा, तीव्र शस्त्रें एक सहस्त्र धारण करणारा, दंड, मुद्गल धारण करणारें मोठें सैन्य मजपाशीं! तूं दोन हातांची लहान मुलगी, तूं तुझ्या स्त्रीस्वभावाप्रमाणें लहान मुलीं बडब-

डतात तशी बडबड करितेस, स्त्रिया स्वभावतः लज्जा-युक्त असणाऱ्या, त्यांत तूं रणांत युद्ध कसें करणार ?

ह्या प्रकारचें प्रत्युत्तर युद्धभूमीचे स्थानीं देवीस सांगतांच श्रीवज्रेश्वरी संतप्त होऊन त्या दैत्यास ह्मणाली:—अरे मूर्खा ! मी दोन हातांची एकटी मुलगी काय ? तूं पहा आतां माझें सैन्य ! असें बोलून तिनें युद्धभूमीवर आपल्या मातृका, चामुंडा, कात्यायनी, ह्यांस पाचारण केलें. त्या वेळीं हें मातृकासैन्य कोट्यावधि शस्त्रास्त्रांसहित प्राप्त झालें. भूमि, आकाश त्या सैन्यानें व्यापून गेली ? हें पहातांच तें दैत्यसैन्य भयचकित झालें, व ह्मणालें कीं, हा काय विचित्र व अद्भुत प्रकार ! असें बोलून सर्व दैत्य थरथरां कांपूं लागले. अशी आपल्या सैन्याची दशा पाहून तो कलिकाल ह्मणाला—अरे, तुह्मी असे धिप्पाड पुरुष असून असें हें बायकांचें सैन्य पाहून भितां हें काय ? शत्रु आपल्यासमोर आल्यावर तो बायको, पुरुष, मुलगा, निर्बळ कसा ही असला तरी त्याजबरोबर युद्धच केलें पाहिजे. हें सैन्य पाहून आश्चर्य कशाचें करितां ? युद्धास कंबर बांधा ? हें आपल्या नायकाचें भाषण ऐकून सर्व सैन्यानें सिंहनाद केला. घोडे खिंकाळले, हत्तींनीं चीत्कार केले. आपल्या मातृकांनीं वेष्टित श्रीदेवी युद्धभूमीचे स्थानीं सिद्ध झाली. कलिकालानें दुर्धर नांवाचा प्रतापी राक्षस होता त्यास देवीशीं युद्ध करण्यास पाठविलें. तो राक्षस आल्यावर महान् भयंकर



युद्ध झालें. त्या दुरात्म्या दानवाचें देवीनें पुष्कळ सैन्य मारिलें. त्या वेळीं तो दुर्धर राक्षस कोपाविष्ट होऊन देवीशीं लढूं लागला. देवीनें धनुष्यास बाण लावून अशी बाणांची वृष्टि केली कीं, दैत्याचें भान हरपविलें. असें युद्ध चाललें असतां देवीनें अत्यद्भुत कर्म केलें. एक चक्र घेऊन तें त्या दुर्धर राक्षसावर सोडिलें. तेणेंकरून त्याचा कंठनाळ तुटून जमिनीवर पडला. दुर्धर राक्षसाचें सैन्य मातृकांनीं मारिलें. दुर्धर राक्षस मरतांच देवांनीं वज्रेश्वरीची स्तुति केली. किन्नरांनीं पुष्पवृष्टि केली. ह्याप्रमाणें दुर्धर दैत्याचा वध श्रीवज्रेश्वरीनें केला.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें, तो महाभयंकर योद्धा दारुण पराक्रमी दुर्धर श्रीदेवीनें मारल्यानंतर काय झालें तें मला सांगा. ऐसें भारद्वाजांचें वचन ऐकून व्यास ह्मणाले, दुर्धर राक्षस मारल्याचें वर्तमान ऐकून कलिकाल क्रोधानें दांत ओंठ खाऊं लागला. त्या रागाच्या आवेशांत त्यानें सिंहवक्त्र नांवाचा राक्षस बोलावून त्यास सेनापति करून श्रीजगदंबेशीं युद्धाकरितां जाण्यास आज्ञा केली. त्याच्या बरोबर दहाहजार हत्ती, दहालक्ष रथ, दोन कोटी घोडे, कोट्यावधि राक्षस देऊन त्या सिंहवक्त्रास सांगितलें कीं, हें सैन्य घेऊन जा, व मातृकासहित देवीस बद्ध करून आण. राक्षसानें कलिकालाचें भाषण ऐकून सैन्यासह श्रीदेवीच्या समीप आला. दैत्यसेनेनें तें मातृकासैन्य पाहतांच अत्यंत घाब-

डतात तशी बडबड करितेस, स्त्रिया स्वभावतः लज्जायुक्त असणाऱ्या, त्यांत तू रणांत युद्ध कसें करणार ?

ह्या प्रकारचें प्रत्युत्तर युद्धभूमीचे स्थानीं देवीस सांगतांच श्रीवज्रेश्वरी संतप्त होऊन त्या दैत्यास ह्मणालीः— अरे मूर्खा ! मी दोन हातांची एकटी मुलगी काय ? तू पहा आतां माझें सैन्य ! असें बोलून तिनें युद्धभूमीवर आपल्या मातृका, चामुंडा, कात्यायनी, ह्यांस पाचारण केलें. त्या वेळीं हें मातृकासैन्य कोट्यावधि शस्त्रास्त्रांसहित प्राप्त झालें. भूमि, आकाश त्या सैन्यानें व्यापून गेली ? हें पहातांच तें दैत्यसैन्य भयचकित झालें, व ह्मणालें कीं, हा काय विचित्र व अद्भुत प्रकार ! असें बोलून सर्व दैत्य थरथरां कांपूं लागले. अशी आपल्या सैन्याची दशा पाहून तो कलिकाल ह्मणाला—अरे, तुह्मी असे धिप्पाड पुरुष असून असें हें बायकांचें सैन्य पाहून भितां हें काय ? शत्रु आपल्यासमोर आल्यावर तो बायको, पुरुष, मुलगा, निर्बळ कसा ही असला तरी त्याजबरोबर युद्धच केलें पाहिजे. हें सैन्य पाहून आश्चर्य कशाचें करितां ? युद्धास कंबर बांधा ? हें आपल्या नायकाचें भाषण ऐकून सर्व सैन्यानें सिंहनाद केला. घोडे खिंकाळले, हत्तींनीं चीत्कार केले. आपल्या मातृकांनीं वेष्टित श्रीदेवी युद्धभूमीचे स्थानीं सिद्ध झाली. कलिकालानें दुर्धर नांवाचा प्रतापी राक्षस होता त्यास देवीशीं युद्ध करण्यास पाठविलें. तो राक्षस आल्यावर महान् भयंकर



युद्ध झालें. त्या दुरात्म्या दानवाचें देवीनें पुष्कळ सैन्य मारिलें. त्या वेळीं तो दुर्धर राक्षस कोपाविष्ट होऊन देवीशीं लढूं लागला. देवीनें धनुष्यास बाण लावून अशी बाणांची वृष्टि केली कीं, दैत्याचें भान हरपविलें. असें युद्ध चाललें असतां देवीनें अत्यद्भुत कर्म केलें. एक चक्र घेऊन तें त्या दुर्धर राक्षसावर सोडिलें. तेणेंकरून त्याचा कंठनाळ तुटून जमिनीवर पडला. दुर्धर राक्षसाचें सैन्य मातृकांनीं मारिलें. दुर्धर राक्षस मरतांच देवांनीं वज्रेश्वरीची स्तुति केली. किन्नरांनीं पुष्पवृष्टि केली. ह्याप्रमाणें दुर्धर दैत्याचा वध श्रीवज्रेश्वरीनें केला.

भारद्वाजऋषींनीं व्यासांस विचारिलें, तो महाभयंकर योद्धा दारुण पराक्रमी दुर्धर श्रीदेवीनें मारल्यानंतर काय झालें तें मला सांगा. ऐसें भारद्वाजांचें वचन ऐकून व्यास ह्मणाले, दुर्धर राक्षस मारल्याचें वर्तमान ऐकून कलिकाल क्रोधानें दांत ओंठ खाऊं लागला. त्या रागाच्या आवेशांत त्यानें सिंहवक्र नांवाचा राक्षस बोलावून त्यास सेनापति करून श्रीजगदंबेशीं युद्धाकरितां जाण्यास आज्ञा केली. त्याच्या बरोबर दहाहजार हत्ती, दहालक्ष रथ, दोन कोटी घोडे, कोट्यावधि राक्षस देऊन त्या सिंहवक्रास सांगितलें कीं, हें सैन्य घेऊन जा, व मातृकासहित देवीस बद्ध करून आण. राक्षसानें कलिकालाचें भाषण ऐकून सैन्यासह श्रीदेवीच्या समीप आला. दैत्यसेनेनें तें मातृकासैन्य पाहतांच अत्यंत घाब-

रून सर्वांस कंप सुटला. नंतर सर्वांनीं धनुष्यबाण घेऊन युद्धास आरंभ केला. शेंकडों बाण, हजारों तोमरें, लक्षावधि शक्ति, कित्येक गोफणगुंडे, कित्येक फरश, कित्येक गदा, अभेद्यशक्ति ह्यांच्या योगानें असंख्य राक्षसांचा संहार श्रीदेवीच्या सैन्यानें केला. कोणास खालीं पाडावें, कोणास लाथांनीं तुडवावें, कोणी शरण आला तर त्यास जीवदान द्यावें, ह्याप्रमाणें वज्रेश्वरी व मातृका ह्यांनीं त्या सिंहवक्रास मृगवक्र केलें. परंतु तो मोठा योद्धा होता. देवीनें त्रिशूल मारून त्यास खालीं पाडिलें. त्याचे पाय धरून गरगर फिरवून त्यास आकाशांत फेंकून दिला. तो निराधार अन्नपाण्यावांचून वरचेवर फिरत आहे अशा वेळीं, त्यास तीस घाय करून त्याचे तुकडे केले. पण तो मायावी सिंहवक्र पुनः युद्धास उभा राहिला. त्या वेळेस श्रीदेवी त्यास ह्मणाली, राक्षसा, उभा रहा. माझ्या युद्धाचें कौतुक पहा. असें ह्मणून एकदम मातृकासैन्य जें होतें तें एकाएकीं सर्व सिंहमुख झालें. मग काय जो चमत्कार झाला तो सांगतां येत नाहीं. त्या सिंहरूप सेनेनें कोणाचीं डोकीं तोडलीं, कोणाचीं नरडीं फोडिलीं, कोणाचीं पोटें फाडिलीं, कोणाचे हात तोडिले, कोणाचें रक्त प्राशिलें, कोणास कच्चेंच दांतानें चावून टाकलें. इतक्यांत वज्रेश्वरीनें चार बाण सोडून त्या सिंहवक्राचे चार घोडे मारून त्यास विरथ केलें. नंतर तो हत्तीवर बसला. इतक्यांत सिंहरूप मातृकासैन्यानें त्या हत्तीस मारिल्या-



वर तो दैत्य पादचारी युद्ध करूं लागला. त्या वेळीं देवीनें बाण सोडून त्यास दूर उडविलें. तिकडून तो तालवृक्ष घेऊन देवीवर चालून आला. पुनः देवीनें चक्र मारून त्यास हटविलें. तरी तो फिरून नानारूपें धरून युद्ध करूं लागला. पुनः देवीनें हुंकार करून त्यास पळविलें. नंतर देवीनें हातांत तरवार धरून त्या राक्षसाचें शरीर छेदून रक्तपान केलें; परंतु त्या अवसरांत तो राक्षस पर्वतावर पळाला. तेथें इंद्रादि देव भयभीत होतात, तोंच देवी तेथें जाऊन त्रिशूल हातीं घेऊन त्या राक्षसास मारिला. तेणेंकरून तो सिंहवक्र प्राणांस मुकला. देवांस फारच हर्ष झाला, किन्नर आनंदले, ब्राह्मणांची पीडा टळली. सर्व देव वज्रेश्वरीचा जयजयकार करूं लागले. ह्याप्रमाणें सिंहवक्र देवीनें मारिला.

श्रीभारद्वाजऋषींनीं व्यासांस प्रश्न केला कीं, संग्रामांत श्रीदेवीनें सिंहवक्रदैत्य मारिल्यावर पुढें देवीचें व राक्षसांचें युद्ध कसकसें झालें तें सगळें वृत्त सांगा. हें भारद्वाजऋषींचें वचन ऐकून श्रीव्यास ह्मणाले, कलिकालानें सहा हजार हत्ती, दहा हजार घोडे, दहा लक्ष रथ, असें सैन्य बरोबर देऊन लोहिताक्ष नांवाचा राक्षस देवीशीं युद्ध करण्याकरितां पाठविला. हा लोहिताक्ष मोठा बलिष्ठ होता. त्याजबरोबर जे वीर दिले तेही मोठे भयंकर, कोणी बाबरझोटीचे, कोणी लांब ओंठांचे, कोणी भयंकर वेष केलेले, कोणी पर्वत उचलून त्या पर्व-

तांनीं युद्ध करणारे, कोणी घोड्यांच्या तोंडाचे, कोणी हातांत ताडाचे वृक्ष धरलेले, असें सर्व सैन्य श्रीवज्रेश्वरीच्या समोर येतांच कित्येक राक्षसांस बांधून टाकिलें, कित्येकांचें मुसलांनीं कंडन केलें. पुनः दैत्य बाण घेऊन देवीवर चालून आले. देवीनें आपल्या बाणांनीं हजारों दैत्य जर्जर केले. दैत्यही अतिशय क्रुद्ध होऊन त्यांनीं गोफणी, तोमरें, पर्वताचीं शिखरें, वृक्ष इत्यादिकांचा देवीचे सैन्यावर मारा केला, व मोठा सिंहनाद केला आणि वज्रेश्वरीस युद्धास पाचारिलें. हें त्यांचें उद्धत वर्तन पाहून ती सिंहावर बसलेली श्रीवज्रेश्वरी कोपायमान होऊन तिनें मुखांतून एक हुंकार शब्द काढिला. त्याहुंकारशब्दाबरोबर हजारों राक्षसांचे जीव गेले. ही राक्षसांची अवस्था पाहून लोहिताक्षराक्षस रथावर बसून देवीशीं युद्ध करण्याकरितां समोर आला; आणि मेघासारख्या गंभीर स्वरानें देवीस ह्मणाला, तूं स्त्रीरूपी कोण आहेस ? सर्व राक्षसांचा संहार करण्यास प्रवृत्त झाली आहेस व हे सर्व देवऋषि आपल्या पाठीमागें बसविलेस ह्याचें कारण काय? बलवानाशीं स्पर्धा करून तुला कोणता फायदा मिळेल? हे मत्ते, आतां मजशीं युद्ध कर. ह्याप्रमाणें तो दैत्यशार्दूल मोठ्या नादानें देवीस ह्मणाला व नंतर युद्ध करूं लागला. त्यानें प्रथम धनुष्यास बाण लावून त्या बाणांचा देवीवर वर्षाव केला. परंतु श्रीवज्रेश्वरीनें त्याचे ते सर्व बाण एका क्षणांत चूर्ण करून टाकिले. त्या वेळीं



तो लोहिताक्ष तोंड गोरेंमोरें करून मनांत ह्मणाला कीं, काय दैवयोग उलटला पहा! पावलोंपावलीं पराजय जसा काय हात धुवून आमच्या मागें लागला आहे ! ही प्रत्यक्ष स्त्रीजाति ! वयानें लहान मुलगी ! असें असून हिचा जय, व आह्मी मोठे धिप्पाड ! खंदे लढाऊ ! असें असतां आमचा पराजय ! असा विसमयान्वित होऊन त्यानें हातांत खड्ग घेतलें, व मोठ्या वेगानें देवीस मारावें ह्मणून देवीवर धांवला. त्या वेळीं त्या महादेवीनें त्वरा करून एक गदेचा घाव त्याच्या हातावर असा मारिला कीं तेणेंकरून त्याच्या हातांतील खड्ग चूर्ण केलें. राक्षसानें पुनः मुद्गल घेऊन देवीवर चाल केली. देवीनें वेळूच्या पानासारखा बाण सोडून तो मुद्गलही चूर्ण केला. त्या लोहिताक्षानें तोमर व मुसळ घेतलें, तें देवीनें त्रिशूल व बाणानें छेदून टाकिलें. नंतर हातांत भयंकर खड्ग घेऊन श्रीवज्रेश्वरी त्या दैत्यावर धांवली; तेव्हां तो दैत्य आपल्या सैन्यांत पळूं लागला. सैन्याची अवस्था त्यानें पाहिली तीः—कोणाचीं मस्तकें तुटलेलीं, कोणाचे हात तुटलेले, कोणाच्या अंगावर क्षतें पडलेलीं ! कोणाचे पाय तुटलेले ! कोणाचीं कंबरें तुटलेलीं ! कोणी बाणाच्या योगें भिन्नशरीर झालेले ! वीरांच्या आंगांतून रक्त वाहून जमिनीवर सर्व तांबडा चिखल त्याच्या दृष्टीस पडला. ही स्वसैन्याची दैन्यावस्था पाहून तो लोहिताक्ष फार संतापला व त्यानें हातांत एक पर्वत घेऊन तो देवीवर

तांनीं युद्ध करणारे, कोणी घोड्यांच्या तोंडाचे, कोणी
हातांत ताडाचे वृक्ष धरलेले, असें सर्व सैन्य श्रीवज्रेश्वरीच्या
समोर येतांच कित्येक राक्षसांस बांधून टाकिलें, कित्ये-
कांचें मुसलांनीं कंडन केलें. पुनः दैत्य बाण घेऊन दे-
वीवर चालून आले. देवीनें आपल्या बाणांनीं हजारों
दैत्य जर्जर केले. दैत्यही अतिशय क्रुद्ध होऊन त्यांनीं गो-
फणी, तोमरें, पर्वताचीं शिखरें, वृक्ष इत्यादिकांचा देवीचे
सैन्यावर मारा केला, व मोठा सिंहनाद केला आणि
वज्रेश्वरीस युद्धास पाचारिलें. हें त्यांचें उद्धत वर्तन पा-
हून ती सिंहावर बसलेली श्रीवज्रेश्वरी कोपायमान होऊन
तिनें मुखांतून एक हुंकार शब्द काढिला. त्याहुंकारश-
ब्दाबरोबर हजारों राक्षसांचे जीव गेले. ही राक्षसांची
अवस्था पाहून लोहिताक्षराक्षस रथावर बसून देवीशीं युद्ध
करण्याकरितां समोर आला; आणि मेघासारख्या गंभीर
स्वरानें देवीस ह्मणाला, तूं स्त्रीरूपी कोण आहेस ? सर्व
राक्षसांचा संहार करण्यास प्रवृत्त झाली आहेस व हे सर्व
देवऋषि आपल्या पाठीमागें बसविलेस ह्याचें कारण काय?
बलवानाशीं स्पर्धा करून तुला कोणता फायदा मिळेल?
हे मत्ते, आतां मजशीं युद्ध कर. ह्याप्रमाणें तो दैत्य-
शार्दूल मोठ्या नादानें देवीस ह्मणाला व नंतर युद्ध करूं
लागला. त्यानें प्रथम धनुष्यास बाण लावून त्या बा-
णांचा देवीवर वर्षाव केला. परंतु श्रीवज्रेश्वरीनें त्याचे
ते सर्व बाण एका क्षणांत चूर्ण करून टाकिले. त्या वेळीं



तो लोहिताक्ष तोंड गोरेंमोरें करून मनांत ह्मणाला कीं,
काय दैवयोग उलटला पहा! पावलोंपावलीं पराजय
जसा काय हात धुवून आमच्या मागें लागला आहे ! ही
प्रत्यक्ष स्त्रीजाति! वयानें लहान मुलगी! असें असून
हिचा जय, व आह्मी मोठे धिप्पाड! खंदे लढाऊ!
असें असतां आमचा पराजय! असा विस्मयान्वित होऊन
त्यानें हातांत खड्ग घेतलें, व मोठ्या वेगानें देवीस मारावें
ह्मणून देवीवर धांवला. त्या वेळीं त्या महादेवीनें त्वरा
करून एक गदेचा घाव त्याच्या हातावर असा मारिला
कीं तेणेंकरून त्याच्या हातांतील खड्ग चूर्ण केलें. राक्ष-
सानें पुनः मुद्गल घेऊन देवीवर चाल केली. देवीनें वे-
ळूच्या पानासारखा बाण सोडून तो मुद्गलही चूर्ण केला.
त्या लोहिताक्षानें तोमर व मुसळ घेतलें, तें देवीनें त्रिशूल
व बाणानें छेदून टाकिलें. नंतर हातांत भयंकर खड्ग
घेऊन श्रीवज्रेश्वरी त्या दैत्यावर धांवली; तेव्हां तो दैत्य
आपल्या सैन्यांत पळूं लागला. सैन्याची अवस्था त्यानें
पाहिली तीः—कोणाचीं मस्तकें तुटलेलीं, कोणाचे हात
तुटलेले, कोणाच्या अंगावर क्षतें पडलेलीं! कोणाचे पाय
तुटलेले! कोणाचीं कंबरें तुटलेलीं! कोणी बाणाच्या
योगें भिन्नशरीर झालेले! वीरांच्या आंगांतून रक्त वाहून
जमिनीवर सर्व तांबडा चिखल त्याच्या दृष्टीस पडला.
ही स्वसैन्याची दैन्यावस्था पाहून तो लोहिताक्ष फार सं-
तापला व त्यानें हातांत एक पर्वत घेऊन तो देवीवर

टाकिला. पर्वत येतांच सर्व देव हाहाःकार करितात, तोंच देवीनें त्वरा करून त्यावर वज्रप्रहार करून त्या पर्वताचे तुकडे तुकडे केले; व क्रोधायमान होऊन देवीनें एक चक्र त्या राक्षसावर टाकिलें. तें टाकितांच तो देवीचें अनिष्ट इच्छिणारा लोहिताक्ष जमिनीवर पडून प्राणास मुकला. देवऋषिब्राह्मणांस आनंद झाला, गंधर्वांनीं पुष्पवृष्टि केली. ह्याप्रमाणें दुर्धर, सिंहवक्त्र व लोहिताक्ष ह्या राक्षसांचा वध श्रीवज्रेश्वरीनें केला ही कथा ह्या भागांत आहे.

---

## भाग चवदावा—श्रीवज्रेश्वरीच्या हस्तें चंडवेग आणि कलिकालराक्षसांचा वध.

भारद्वाजांनीं व्यासांस विचारलें, वज्रेश्वरीनें धुरंधर लोहिताक्षराक्षस मारिल्यानंतर देवी आणि दानव ह्यांचें युद्ध कसकसें झालें तें सर्व मला सांगा. हें ऐकून श्रीव्यास ह्मणाले, लोहिताक्ष श्रीवज्रेश्वरीनें मारिला हें ऐकून जसा सिंहाच्या धाकानें हत्ती मनांत भयाभीत होतो तसा तो कलिकाल भ्याला. मग त्यानें आपले मांडलिक राक्षस आपल्या समोर बोलावून आणविले. त्यांत मोठा बलिष्ठ चंडवेग नांवाचा राक्षस होता त्यास सैन्याचें आधिपत्य देऊन त्यास देवीवर युद्धाकरितां पाठविण्याचा विचार केला. त्याच्या बरोबर दहा हजार रथ, दहा हजार हत्ती, दहा लक्ष घोडेस्वार, एक कोटी पायदळ, असें सैन्य देऊन



त्यास देवीशीं युद्ध करण्यास पाठविलें. ती महाभयानक राक्षसांची सेना पाहून श्रीवज्रेश्वरी देवीनें हास्य केलें व ह्मणाली, अँः, ह्याचा नाश करण्यास मला काय वेळ आहे ? राक्षससेनेंत कोणीं ताडाचे वृक्ष धरिले, कोणी पर्वत, कोणी गोफणी, कोणी गदा, कोणी मोठाले पाषाण, कोणी ढाली, कोणी तरवारी, कोणी शक्ती, कोणी धनुष्यें, कोणी मोठमोठीं आयुधें, इत्यादि हातांत घेऊन नाचूं लागले, कोणी सिंहनाद करूं लागले. असें तें अद्भुताद्भुत सैन्य पाहून श्रीवज्रेश्वरीनें प्रथमच एक बाण मारून त्या प्रचंड चंडवेगाच्या रथाचा ध्वजच्छेद केला. हें श्रीदेवीचें भयंकर कृत्य अवलोकन करून सर्व दैत्य फारच संतापले; व आतां ह्या देवीस मारूं अशा हेतूनें देवीवर शस्त्रप्रहार करूं लागले. परंतु देवीनें त्वरा करून कित्येक राक्षस मारिले, कांहीं पायांखालीं तुडविले, कांहीं जणांस त्रिशूलानें मारिलें, कित्येक तरवारीनें तोडिले, कित्येक वज्रानें तोडिले. कित्येकांचीं मस्तकें चक्रानें तोडिलीं. कित्येक दैत्य पाशानें बद्ध केले, कित्येक मुसळानें ठार केले. ह्या प्रकारचे ते महाप्रचंड योद्धे, पण देवीनें युद्धांत पराजित केले. कोणांच्या तोंडांतून भडभडां रक्त येऊं लागलें. अशी सैन्याची दुर्दशा पाहून तो चंडवेग आपल्या सैनिकांस ह्मणाला, काय तुह्मी भ्याडासारखे पळतां ? पुनः देवीस तो चंडवेग ह्मणाला, हे देवीः— हें गरीब सैन्य मारून त्वां काय केलें ? तें सैन्य हीनबल,

त्यांत काय अर्थ ! आणि त्वां त्याच्यावर जय मिळविला ह्यांत काय आश्चर्य ! तूं आपल्या स्त्रीस्वभावाप्रमाणें सगळ्यांना ठकवूं पाहातेस हें योग्यच आहे. आतां माझें युद्धकौशल्य कसें आहे तें मनापासून अवलोकन कर. इतकें बोलून हातांत धनुष्यबाण घेऊन देवीवर बाणांची वृष्टि केली. तें त्याचें हस्तलाघव पाहून देवीनें आपलें धनुष्य चढवून त्या राक्षसाच्या शतपट बाणांचा त्यावर वर्षाव केला. त्याचे वायुवेगासारखे घोडे व चपल सारथी ठार मारिले. तेव्हां तो चंडवेग पादचारीच युद्ध करूं लागला. त्यानें हातांत तरवार घेतली व ती देवीला जों मारणार तोंच जगदंबेनें गदाघायानें तरवारीचे तुकडे केले. पुनः दैत्यानें मोठा मुद्गल उचलला व देवीवर टाकण्यास धांवला, इतक्यांत देवीनें मुसळासरसें त्या मुद्गलाचें चूर्ण केलें. नंतर त्या चंडवेगराक्षसानें अग्न्यस्त्र सोडिलें. हें पहातांच श्रीदेवीनें कालमेघास्त्राचें स्मरण करतांच त्या दैत्याचें अस्त्र थंड झालें. नंतर देवीनें एक तीव्र बाण त्या चंडवेगावर सोडून त्याचा प्राण त्या बाणानें एका क्षणांत घेतला. उरलेलें राक्षससैन्य जशा चिमण्या उडतात त्याप्रमाणें भयानें दशदिशांकडे पळालें. ही त्या चंडवेगाची प्राणांत अवस्था पाहून देवब्राह्मण आनंदित झाले. ऋषिपत्न्यादिकांनीं देवीची स्तुति केली. ह्याप्रमाणें चंडवेग श्रीवज्रेश्वरीनें मारिला.

श्रीभारद्वाजऋषींनीं व्यासांस पुनः प्रश्न केला कीं, म-



हाराज, हा वेळपर्यंत कलिकालराक्षसाचें अगणित सैन्य नाश पावलें व शेवटीं चंडवेगासारखा पराक्रमी वीर श्रीवज्रेश्वरीनें मारिला. नंतर उरलेल्या राक्षसांनीं काय केलें तें कृपा करून सांगा तेव्हां व्यासांनीं हा भारद्वाजांचा प्रश्न ऐकून ते त्यांस ह्मणाले. त्या दैत्यपति कलिकालानें युद्धभूमीवरचें वर्तमान श्रवण केलें. तेव्हां त्याचें अंतःकरण अत्यंत शोकाविष्ट झालें. मग जें उरलेलें सैन्य होतें तें त्यानें आपल्या समोर आणविलें. रणभेरी, नगारे वाजवून युद्धाचा कृतनिश्चय केला. पुढें आपले सहस्रध्वज फडकविले. साठहजार हत्ती, नाना प्रकारचे दिव्यरथ, पन्नासलक्ष घोडेस्वार आणि अपार पायदळ असें सैन्य घेऊन तो कलिकाल युद्धभूमीचे स्थळीं प्राप्त झाला. त्या वेळीं पृथ्वी-आकाश एक झालें. सर्व भुवनें थरथरां कांपूं लागलीं. देवांचीं अंतःकरणें भयाभीत झालीं. त्या वेळीं श्रीवज्रेश्वरी देवी युद्धास सिद्ध होऊन आपल्या अनंत मातृका युद्धास पाचारिल्या. दैत्याचे सेनेंन कोणी मुद्गल, परिघ, दंड, मुसळें, गदा, गोफणी, ताडांचे वृक्ष, झाडांच्या शाखा, खड्गें, ढाली, धनुष्यें, बाण, इत्यादि असंख्य शस्त्रें घेऊन सिद्ध झालेले वीर पहातांच, मातृकासैन्य फार क्षोभलें. मग काय ? मातृकासैन्यानें दैत्याच्या सेनेचा नाश केला. कोणाच्या हातांत बाण होता; त्याचे दोन तुकडे. कोणाच्या तरवारीचे तीन तुकडे केले. कोणाच्या गदेचें चूर्ण केलें, कोणाच्या गोफणीचे हात गोफणींसुद्धां

छेदून टाकिले. हजारों राक्षस पृथ्वीवर मरून पडले. दाही दिशांस राक्षसांच्या रक्ताचे पूर वाहूं लागले. अशी सर्व राक्षसांच्या वीरांची चंडिकेच्या मातृकासेनेनें धूळधाणी केली. कलिकालराक्षसानें आपल्या सैन्याची वाताहत स्थिति पाहिली; तेव्हां तो क्रोधाविष्ट होऊन दांतओंठ खाऊं लागला. नंतर तो स्वतः देवीबरोबर लढण्यास सिद्ध झाला. त्यानें आपल्या सहस्त्रकरांत पांचशें धनुष्यें घेतलीं व तितक्या धनुष्यांस एकसारखे बाण योजून श्रीवज्रेश्वरी देवीवर बाणांची वृष्टि केली. पण चमत्कार असा कीं, दोन हातांत एक धनुष्य, त्या धनुष्यापासून देवीनें अगण्य बाण सोडून त्या राक्षसाचे तितकेही बाण छेदून टाकिले! नंतर देवीनें त्या राक्षसास मारण्याकरितां आपली तरवार हातांत घेतली. इकडे राक्षसानें आपले बाण व्यर्थ गेलेले पहातांच हातांत मोठा पर्वत घेतला; व तो त्या बलिष्ठ राक्षसानें देवीवर टाकिला. तो पर्वत आपणावर येत आहे असें देवीनें पाहून आपल्या आयुधानें त्या पर्वताचें पिष्ट केलें. मग देवीनें एक चक्र हातीं घेऊन त्या राक्षसाच्या हजार हातांतलीं शस्त्रें त्या चक्राच्या योगानें छेदिलीं. शस्त्रें छेदिल्यावर दैत्य क्रोधाकुल होऊन त्यानें फार भयंकर कृत्य केलें. तें असें कीं, देवीचें मातृकासैन्य एकदम प्राशन करण्यास आरंभ केला. हें पाहून देवद्विजांची पांचांवर धारण बसली. पण ती महापराक्रमी श्रीवज्रेश्वरी हिनें अतित्वरा



करून अक्राळविक्राळ रूप धरून त्या राक्षसाच्या मानेवर असा भयंकर खड्गप्रहार केला कीं, तेणेंकरून त्या कलिकालाचीं शंभर मस्तकें धडापासून एकदम तुटून जमिनीवर पडलीं. त्याचें तें शरीर जसें मेरुपर्वताचें शिखर जमिनीवर कोसळावें तसें एकदम पडलें. तेणेंकरून भुवन कंपायमान होऊन, समुद्र खवळला! ह्याप्रमाणें तो देवशत्रु कलिकाल मरण पावला, तेव्हां देवांनीं श्रीवज्रेरीवर पुष्पवृष्टि केली. देव, ऋषि, ब्राह्मण वगैरे दुःखमुक्त झाले. देवादिक आनंदले. तपोधन ऋषि अत्यंत तुष्ट झाले. देवपत्न्या देवीचें स्तुतिपर गायन करूं लागल्या. दिक्पाल प्रमुदित झाले. इंद्राचा कांटा उपटला. चंद्रसूर्यांचे मार्ग निर्मल झाले. ब्राह्मण निर्भय झाले. सर्व जग निष्कंटक होऊन यथापूर्व वागणूक करूं लागलें. ते सर्व देव तुष्टचित्त होऊन त्यांनीं देवीचें स्तवन केलें. देवीला ब्राह्मणांनीं षोडशोपचारें पूजिलें. ब्राह्मण ह्मणाले, मातुश्री, आतां धर्ममार्ग मोकळा होऊन देव आपापला हविर्भाग निर्भयपणानें ग्रहण करितील. श्रीवज्रेश्वरीदेवीला ह्या कलिकालाची पूर्णाहुति त्या रणयज्ञकुंडांत दिल्यानें मोठा आनंद झाला.

---

## भाग पंधरावा—श्रीदेवीची स्तुति.

### ओव्या.

श्रीभारद्वाजऋषि प्रश्न करिती ॥ आदरें श्रीव्यासाप्रती ॥
देवांनें कलिकालास दिली गती ॥ नंतर काय जाहलें ॥१॥
भारद्वाजऋषीचें वचन ॥ ऐकूनि तुष्टलें व्यासाचें मन ॥
व्यासें केलें जें पुढें कथन ॥ तें ऐकावें श्रोत्यांनो ॥ २ ॥
एकत्र होऊनि सर्व देव ॥ ऋषि विप्र आणि वासव ॥
श्रीदेवीचा केला जो स्तव ॥ तो वास्तव परिसावा ॥ ३ ॥

### कटिबंध.

श्रीमद्वज्रेश्वरि अंबा ॥ स्तवितसों वरदा जगदंबा ॥ ध्रु०॥ श्रीत्रिगुणात्मक कामरूपिणी ॥ नमो नमो तूं सर्वसाक्षिणी ॥ अखिल त्रिविध हृत्तापनाशिनी ॥ काली विद्या प्रणतपालिनी ॥ कामादिक षड्रिपूदारिणी ॥ कलिकालादिक दैत्यमारिणी ॥ सुरमुनिसुभक्तवृंदतारिणी ॥ चरितगायका शर्मकारिणी ॥ विश्वईश्वरे जगदाधारे ॥ सृष्टिस्थितिचे हे संहारे ॥ तिन्ही मातृकांमधें अकारे ॥ तसे मकारे उकारकारे ॥ अर्धमातृका तशी विशाखा ॥ संध्या सावित्री अंबीका ॥ सुरवरजननी विश्वपालिका ॥ विष्णुतेजसम गळां मालिका ॥ असत्यनाशिनी भक्तआलिका ॥ तूंच जगीं ह्या महाकालिका ॥ माहुरगडची जया रेणुका ॥ नत वत्सांची तूंच धेनुका ॥ तुळजापुरची सत्य तूं तुका ॥ नसे अन्य ती तुझ्यासम तुका ॥ केलें अमुच्या कोडकौतुका ॥ सप्तशृंगची तूंच चंडिका ॥ सौ-



म्यतरा श्रीसौम्यशेखिनी ॥ सर्वशक्ति तूं चंडचक्रिणी ॥ सव्यकरांतरगता शूलिनी ॥ अखिलजगात्मक माय चापिणी ॥ राक्षसांतका अजितबाणिनी ॥ योगमातृका उदोकारिणी ॥ दुष्ट निशाचरगणां मर्दिनी ॥ हे अरिहृष्टे सिंहवाहिनी ॥ मायादेवी श्रीभद्राई ॥ सुदेवदेवी श्रीरुद्राई ॥ सुखशांतीचें रूप तुकाई ॥ भीम भैरवी तूं धर्माई ॥ ऋद्धिसिद्धि तूं हे करुणाई ॥ सौम्ये भद्रे श्रीदुर्गाई ॥ मायचंडिके चंडविक्रमे ॥ महाकालिके आदिआगमे ॥ शामविशाले सहस्त्रनामे ॥ दुर्धरहनने गौरी इष्टे ॥ सिंहवक्रमारिणी प्रतिष्ठे ॥ लोहिताक्षमर्दिनी वरिष्ठे ॥ चंडवेगअरि मारिसि तुष्टे ॥ पीडियलें कलिकालें दुष्टें ॥ त्यास मारिशी तूं शिपिविष्टे ॥ धूमकेतुसम दैत्य मारिले ॥ असत्संकट सत्य वारिलें ॥ करुणामृत आह्मांस चारिलें ॥ जगास त्वां ह्या सत्य तारिलें ॥ कार्य आमचें अंगिकारिलें ॥ तदनुरूप हें सर्व सारिलें ॥ आतां मागें कांहिं न उरलें ॥ सर्व आमचे हेतू पुरले ॥ सर्व दुष्ट राक्षसांस चुरिलें ॥ तेणें आह्मीं चिरसुख वरिलें ॥ महासुविद्या महाभगवती ॥ त्रिलोकमाता तूंच शुभासति ॥ कोटिरवीसम तेजें भासति ॥ परमानंदे अशी तुझी स्थिति ॥ शुद्धभैरवी मोहाशक्ति ॥ तुष्टिपुष्टिची असासि महास्मृति ॥ परिघआयुधीं मोठी ख्याति ॥ गातों त्रिपुरे तुला यथामति ॥ यापरि सुरवरिं मिळुनि समस्तीं ॥ वज्रेश्वरिची केलीसे स्तुति ॥ ती वानावी किति बलवंतीं ॥ निर्बल हा बलवंत

देविच्या ॥ पदीं वाहतो पत्र पुष्प फल अंभा ॥ स्तवितसों
वरदा जगदंबा ॥ श्रीमद्वज्रेश्वरी अंबा ॥ स्तवितसों० ॥ १ ॥ ४ ॥

## ओव्या.

देवद्विजऋषिप्रणित स्तुति ॥ ऐकूनि बोले श्रीभगवती ॥
नसे तुह्मांस किंचित भीति ॥ संकट तुमचें निवारिलें ॥ ५ ॥
निर्भय होऊनि द्विजोत्तमें ॥ करावीं यज्ञादिक कर्में ॥
सर्व वर्णांनीं स्वधर्में ॥ निर्भयचित्तें असावें ॥ ६ ॥
त्रिदशांनीं हविर्भाग घ्यावे ॥ इंद्रें स्वस्थलीं सुखें जावें ॥
आपले पदीं विचरावें ॥ यथाक्रमेंकरूनी ॥ ७ ॥
दिक्पालांनीं यावर ॥ सुखें करावे स्वाधिकार ॥
सर्व लोकांनीं पृथ्वीवर ॥ आनंदांत असावें ॥ ८ ॥
आणखी ऐका माझें वचन ॥ जेव्हां जेव्हां होय दुःखी भुवन ॥
तेव्हां तेव्हां मी अवतार घेऊन ॥ दैत्यांचा करीन संहार ॥ ९ ॥
व्याधींची जईं होईल पीडा ॥ दुष्काळाचा पडेल वेढा ॥
अरण्यांत शत्रुभूतांच्या दाढा ॥ जईं करकरा वाजतील ॥ १० ॥
तईं तईं घेईन अवतार ॥ दुष्टहनन करीन सत्वर ॥
रक्षीन सद्भक्त भाविक नर ॥ निःसंशयें सुरवर हो ॥ ११ ॥

## साकी.

श्रीव्यासें हें वृत्त कथियलें भारद्वाजऋषीतें ॥
कीं, श्रीवज्रेश्वरी देवता रक्षी जनलोकांतें ॥
समर्थ ऐशी ही ॥ हिच्या सम अन्या कुणि नाहीं ॥ १२ ॥



## श्लोक–चामरवृत्त.

ध्यान हें करा तुह्मीच हेतु हा धरूनियां ॥
सर्वकामदायिनी प्रसन्न होय दे जया ॥
बालसूर्यतेज जीस पीन ते पयोधर ॥
दोन हस्त शोभतें जिच्यावरीहि चामर ॥ १३ ॥

## श्लोक–पंचचामर.

वरप्रदा असे जगींच दैत्यदर्पहारिणी ॥
कृपाणशस्त्र घे करांत राक्षसांस मारिणी ॥
अलंकृतीं सुमंडिता जनांस तोषवी वरें ॥
अशी सुवज्रईश्वरी स्तवावि पंचचामरें ॥ १४ ॥

## श्लोक–अनुष्टुप्.

यापरि हें वज्रानंद स्तोत्र जो पढतो सदा ॥
वैभवें युक्त तो होई जाई त्याची भवापदा ॥ १५ ॥

## ओव्या–फलश्रुति.

नवरात्रमहोत्सव शारदीं ॥ जो पढेल हें स्तोत्र सुधी ॥
त्याची होऊनि स्थीर बुद्धि ॥ देईल गति देवी त्या ॥ १६ ॥
भक्तिमान होऊनि नर ॥ चैत्रमासीं पढेल हें स्तोत्र ॥
त्यातें देईल कन्या पुत्र ॥ जगज्जननी अंबिका ॥ १७ ॥
शिवविष्णूच्या देउळांत ॥ जो होऊनि स्थीरचित्त ॥
पाठ करील त्यातें वित्त ॥ विद्यावैभव प्राप्त होय ॥ १८ ॥
देव्यागारीं सरितातटीं ॥ पाठ करील जो गंगेच्या घांटीं ॥
वांचेल तो मोठ्या संकटीं ॥ शत्रुपासूनि निश्चयें ॥ १९ ॥

सर्व वैभव संपत्ति ॥ आरोग्य तशाच भुक्ति मुक्ति ॥
राजद्वारीं यशप्राप्ति ॥ त्यास निश्चयें होईल ॥ २० ॥
भूतवेतालपिशाचभय ॥ यापरी सर्व पापक्षय ॥
होईल न धरा संशय ॥ तिळभरी यांत सुजन हो ॥ २१ ॥
ऐसें ऐहिक पारमार्थिक ॥ होईल त्याचें जन्मसार्थक ॥
चारी मुक्तींचा सम्यक ॥ वांटेकरी होय तो ॥ २२ ॥

## ओव्या—कर्त्याची विज्ञप्ति.

व्यासें संस्कृतीं कथियलें ॥ त्यापरी प्राकृतीं लिहिलें ॥
न्यूनाधिक जरी झालें ॥ तरी मुज्ञें क्षमा कीजे ॥ २३ ॥
शक अठराशें अठराची ॥ मार्गशीर्ष पौर्णिमा साची ॥
वज्रेश्वरी कृपाळू दासाची ॥ त्या दिनीं प्रथम देखिली ॥ २४ ॥
त्या संस्थानचे अधिकारी ॥ बळिरामगिरी रामचंद्रगिरी ॥
त्यांची आज्ञा हें वज्रेश्वरी- ॥ चरित प्राकृतीं ल्याहावें ॥ २५ ॥
वज्रेश्वरी दृष्टीं पाहून ॥ करावें तिचें चरित्र कथन ॥
जनस्थानीं नंतर येऊन ॥ षण्मास मुग्ध राहिलों ॥ २६ ॥
कष्टमय ज्येष्ठमासांत ॥ पटकी उद्भवे नासिकांत ॥
त्या समयीं हें देवीचरित- ॥ लेखना केला आरंभ ॥ २७ ॥
संस्कृताचें ज्ञान नाहीं ॥ सहवासें जें कळे कांहीं ॥
तेंच विद्वज्जनसमूहीं ॥ लेखन करूनि दाविलें ॥ २८ ॥
प्रार्थना विद्वज्जनांस ॥ गुण घेऊनि त्यागा दोष ॥
आपण आहांत राजहंस ॥ घ्या दुग्ध त्यागा जलातें ॥ २९ ॥
तपोनिधि महंत बळिरामगिरी ॥ संस्थान श्रीवज्रेश्वरी ॥
यांनीं पोथी जगदीश्वरीं ॥ मुद्रित केलेली दिली मज ॥ ३० ॥



त्या पोथीचा मथितार्थ ॥ स्वार्थामध्यें परमार्थ ॥
करूनि दाविला यथार्थ ॥ अल्पमतीनें सज्जनां ॥ ३१ ॥
शक अठराशें एकुणवीस ॥ ज्येष्ठांतील वद्य षष्ठीस ॥
पूर्ण केलें चरित्रास ॥ रविवारीं सायंकाळीं ॥ ३२ ॥
सद्गुरु श्रीरामदासचरणीं ॥ अनन्य भावें शिर ठेवूनी ॥
सुज्ञ श्रोत्यांची आज्ञा घेऊनी ॥ चरित्रलेखन संपवितों ॥ ३३ ॥
वज्रेश्वरीप्रभाव अनंत ॥ झाली दैत्यांवरी जयवंत ॥
खंडूजीसुत बळवंत ॥ तेंच चरित्र वर्णितसें ॥ ३४ ॥
दुष्काळ बद्यताप महामारी ॥ निवारो श्रीवज्रेश्वरी ॥
ही विज्ञप्ति श्रीचरणीं करी ॥ दीन दास सप्रेमें ॥ ३५ ॥
इति श्रीवज्रेश्वरीचरित ॥ संमत व्यासप्रणीत ग्रंथ ॥
त्याचा मराठी भावार्थ ॥ पंधराव्या भागांत कथियला ॥ ३६ ॥

इति श्रीवज्रेश्वरीस्तुति समाप्त.

---

## आर्ति श्रीवज्रेश्वरीची.

(अश्विनशुद्धपक्ष अंबा बैसलि सिंहासनीं वो) ही चाल.

प्रेमें करितों आर्ती जय जय माते वज्रेश्वरी वो ॥
स्मरतां भक्तें तुजला धांउनि येशी तूं सत्वरी वो ॥ध्रुवपद॥
कलिकालानें जेव्हां सुरवर विप्रादिक गांजिले वो ॥
तेव्हां त्यांना अंबे त्वां तें अभयामृत पाजिलें वो ॥
बुडतां दुःखसमुद्रीं तेथें माये सुर तारिले वो ॥
स्वकीयदासांचें तें संकट अवघें त्वां वारिलें वो ॥प्रेमें० १॥

मंदाग्नी तुंगाद्री पर्वतिं निर्भय जागा दिली वो ॥
भगवति अंबे तेथें देवें सत्कार्यें साधिलीं वो ॥
कलिकालादिक राक्षस यद्गति तेथें ती खुंटली वो ॥
ऋषिदेवांना निर्भय पर्वत भूमी ही वाटली वो ॥ प्रेमें०॥२॥
दंतुर तुंगादिक त्या कुशील कोलासुर रक्तपें वो ॥
इंद्रा पीडा दिधली तइं तो त्वन्नामातें जपे वो ॥
वज्रीकुमार जयंत ऐशा शूरें सेनाधिपें वो ॥
युद्धीं हे मारिले राक्षस अंबे तूझ्या कृपें वो ॥ प्रेमें० ॥३॥
दुर्धर सिंहवक्र लोहित पिशिताशन मारुनी वो ॥
तैसे प्रचंड वेगा कलिकालातें संहारुनी वो ॥
झाली विजयी देवी वज्राबाई सुखदायिनी वो ॥
देवद्विज तुष्टले अंबे तवयश हें गाउनी वो ॥ प्रेमें० ॥४॥
मध्यें वज्रादेवी दक्षिणभागीं ती रेणुका वो ॥
उत्तरभागीं शोभे माया देवी श्रीकालिका वो ॥
पाहुनि सुमूर्ति तिन्हि ह्या वाटे हर्ष बहू भाविकां वो ॥
बळवंता दीनातें माते चरण पुन्हा दावि कां वो ॥
प्रेमें करितों आर्ती जय जय माते वज्रेश्वरी वो ॥
सरतां भक्तें तुजला धांवुनि येशी तूं सत्वरी वो ॥ प्रेमें० ॥ ५ ॥

---